CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २४ एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १६६ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आजचा सामना**

रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर वि. राजस्थान रॉयल्स

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : चिन्नास्वामी स्टेडियम, बेंगलोर

## विचारपुष्प



प्रचारक म्हणजे संघ समजून घेण्याचं स्थान. झोपणं, उठणं, भाषा, भूषा, आहार- विहार, विचार-व्यवहार अशा सर्वांचा अंतर्भाव प्रचारक जीवनात होतो. नित्य वेळेवर शाखा, स्वत:च्या शाखेत सदंड जाणं, प्रचारक म्हणजे प्रवासी - पूर्व नियोजित, पूर्वसूचित, निवासी, सार्वत्रिक, प्रचारक विभाग म्हणजे कार्यविस्तार व कार्यकर्ता देणारा, प्रचारक म्हणजे प्रत्येक स्तरावर समूह (टोळी -टीम) उभा करणारा, स्थानिक कार्यकर्त्यांचा विकास करणारा, 'बीजा'मध्ये 'वृक्ष' पाहणारा. खत, पाणी, संगोपन आणि विकास करणारा.

**- सुरेशराव केतकर**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

# पाकविरुद्ध कठोर कारवाईचा श्रीगणेशा

## मोदींच्या अध्यक्षतेत सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीच्या बैठकीत निर्णय

**बैठकीतील निर्णय**

- सिंधू पाणी करार स्थगित
- अटारी-वाघा बॉर्डर बंद
- पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द, ४८ तासांत देश सोडण्याचे आदेश
- नवी दिल्लीतील पाकिस्तानातील दुतावासातील संरक्षण, लष्करी, नौदल, हवाई सल्लागारांना एका आठवड्यात भारत सोडावा लागणार
- भारतही पाकिस्तानातील संरक्षण, लष्करी, नौदल, हवाई सल्लागारांना परत बोलावणार आहे.



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पहलगाम येथे मृतकांच्या नातेवाईकांशी संवाद साधत त्यांना धीर दिला

◆ **नवी दिल्ली, २३ एप्रिल**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेत बुधवारी सायंकाळी सुरक्षा विषयक कॅबिनेट समिती अर्थात् सीसीएसची बैठक पार पडली. अडीत तास चाललेल्या या बैठकीत पहेलगाल हल्ल्याचा निषेध करीत पाकिस्तानविरोधात कठोर कारवाईचा श्रीगणेशा करण्यात आला. दरम्यान उद्या,गुरूवारी सर्वदलीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

मोदी यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन्, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यासह सुरक्षा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव विक्रम मिस्री यांनी पत्रपरिषद घेऊन निर्णयाची घोषणा केली.

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह बुधवारी जम्मू-काश्मीरातील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथील अतिरेकी हल्ला झालेल्या बैसरन या ठिकाणी पोहोचले. त्यांनी घटनास्थळाची पाहणी केली आणि त्यानंतर त्यांनी हल्ल्यात मृत पावलेल्या कुटुंबीयांची आणि जखमींची भेट घेतली. यावेळी त्यांनी भारत दहशतवादापुढे मुळीच झुकणार नाही आणि हल्ला करणाऱ्या एकालाही सोडणार नसल्याचा शब्द पीडित कुटुंबीयांना दिला.

शाह यांनी मृतकांना आदरांजली वाहिली, कुटुंबीयांचे सांत्वन करताना शाह म्हणाले, दहशतवादी हल्ल्यात ज्यांचा मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबीयांना झालेले दुःख हे शब्दांत मांडता येणार नाही, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)



### चार दहशतवाद्यांचे छायाचित्र जारी

हल्ल्याचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात् एएनआयने सुरू केला असून, गुप्तचर यंत्रणांकडूनही अतिरेक्यांचा शोध घेतला जात आहे. लष्कर ए तोयबाशी संबंधित द रेझिस्टन्स फ्रंट्च्या चार दहशतवाद्यांची छायाचित्रे जारी करण्यात आली. यापैकी दोघे पाकिस्तानी तर दोघे स्थानिक असल्याचे उघड झाले आहेत. दोघा स्थानिक दहशतवाद्यांची नावे आदिल गुरी आणि आसिफ शेख असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले.

# मृतांच्या कुटुंबीयांना ५ लाखांची मदत

◆ **मुंबई, २३ एप्रिल**



पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यात प्राण गमवावे लागलेल्या महाराष्ट्रातील ६ जणांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत राज्य सरकारने जाहीर केली असून, जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. तर, महाराष्ट्रातील अडकलेल्या पर्यटकांना परत आणण्यासाठी एक विशेष विमान वापरण्यात येणार आहे आणि त्याचा खर्च राज्य सरकार करेल असेही ते म्हणाले.

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या झालेल्या दहशतवादी हल्ल्यात संजय लेले, दिलीप देसले, कौस्तुभ गणवते, संतोष जगदाळे, हेमंत जोशी आणि अतुल मोने या सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

**हेल्पलाइनवर संपर्क साधण्याचे आवाहन**

दहशतवादी हल्ल्यामुळे काश्मीरच्या विविध भागात अडकलेले महाराष्ट्रातील पर्यटक आणि त्यांचे नातेवाईकांच्या मदतीसाठी मंत्रालयातील महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या ०२२-२२०२७९९० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन, राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात आले आहे. मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्ष संपूर्ण वेळ कार्यरत आहे.

**आज ८३ प्रवाशांना घेऊन पहिले विमान येणार**

दहशतवादी हल्ल्यामुळे अडकलेल्र्‍या काश्मिरातील महाराष्ट्राच्या नागरिकांना परत आणण्यासाठी विशेष विमानाची व्यवस्था करण्यास सांगितल्यानंतर, उद्या दि. २४ एप्रिल २०२५ रोजी श्रीनगर येथून मुंबईसाठी विशेष विमानाची व्यवस्था झाली असून, इंडिगोचे हे विमान महाराष्ट्रातील ८३ प्रवाशांना घेऊन मुंबईत दाखल होणार आहे. (तभा वृत्तसेवा)

## एकनाथ शिंदे जाणार काश्मीरला



जम्मू काश्मिरात पर्यटनासाठी गेलेले शेकडो मराठी नागरिक अडकून पडले आहेत. सरकारने हे सर्वजण सुरक्षित असल्याचा दावा केला आहे, पण आता या प्रकरणी समन्वय साधण्यासाठी स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जम्मू-काश्मीरला जाणार आहेत. पहलगाम येथील हल्ल्यानंतर महाराष्ट्र सरकारने तिथे अडकलेल्या आपल्या पर्यटकांना सुखरूप परत आणण्यासाठी वेगवान पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याकामी समन्वय साधण्यासाठी मंत्री गिरीश महाजन यांना जातीने श्रीनगरला पाठवले आहे.

## महत्त्वाचे

### निर्देशांकाने ओलांडला ८० हजारांचा टप्पा



**मुंबई** : सलग सातव्या सत्रात देशांतर्गत शेअर बाजारात तेजी दिसून आली आणि निर्देशांकाने ८० हजारांचा टप्पा ओलांडला. निर्देशांक ५२१ अंकांनी वाढून ८०,११६ वर बंद झाला तर निफ्टीत १६२ अंकांची वाढ झाली आणि तो २४,३२९ वर बंद झाला. दिवसभरातील व्यवहारात एका क्षणी निर्देशांक ८०,२५४ च्या स्तरावर पोहोचला होता. मुंबई बाजारातील ३० पैकी २४ शेअर्स तेजीत राहिले. त्यातही एचसीएल टेकच्या शेअर्समध्ये सर्वाधिक वाढ दिसून आली. आयटी कंपन्यांचे शेअर्स तब्बल आठ टक्क्यांनी वधारले.

### नखगळती प्रकरणी गोदामातील रेशनच्या गव्हाचे नमुने सील

**खामगाव** : शेगाव तालुक्यातील काही गावांत केसगळतीनंतर उद्भवलेल्या नखगळती प्रकरणी केंद्रीय आरोग्य पथकाने वरखेड फाट्यावरील स्वस्त धान्य दुकानांना धान्य पुरवठा करणाऱ्या शासकीय गोदामातील गव्हाचे नमुने सील केले आहेत. सेलेनियम हा घटक मोठ्या प्रमाणात वाढल्याने शेगाव तालुक्यातील काही गावांतील गावकऱ्यांची केस आणि नखगळती होत असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. डॉ. हिंमतराव बावस्कर यांनी देखील सेलेनियम हाच घटक या समस्येला कारणीभूत असल्याचे म्हटले होते. काही वैद्यकीय तज्ज्ञांचा देखील तोच अंदाज आहे. याचा विचार करून केंद्रीय आरोग्य पथकाने रेशनच्या गव्हामुळे हा प्रकार घडत आहे का ? असा विचार करून खामगाव नजीक असलेल्या वरखेड फाट्यावरील शासकीय गोदामातील गव्हाचे नमुने सील करून ताब्यात घेतले आहेत.

# पाकचा सैफुल्लाह खालिद हल्ल्याचा मास्टरमाईंड

◆ **नवी दिल्ली, २३ एप्रिल**



टीआरएफचा दहशतवादी सैफुल्लाह खालिद हा पहलगाम हल्ल्याचा मास्टरमाइंड असल्याचा गुप्तहेरांचा दावा आहे. त्याला सैफुल्लाह कसुरी म्हणूनही ओळखले जाते. सैफुल्लाह हा लष्कर-ए-तोयबाचा उपप्रमुख आहे. तो लष्करचा संस्थापक दहशतवादी हाफिज सईदचा खूप जवळचा मानला जातो.

सैफुल्लाह हा व्याप्त काश्मीरमधील (पीओके) रावळकोटचा रहिवासी आहे. तेथून तो जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवादी कारवाया करत होता. त्याने मार्चमध्ये एक भाषण दिले होते, ज्याचा व्हिडीओ समोर आला आहे. यामध्ये तो पाकिस्तान सरकारला काश्मीर प्रश्न थंड होऊ देऊ नका असे कडक स्वरात बोलत आहेत. सैफुल्लाहचे हे भाषण मार्च २०२५ चे असल्याचे सांगितले जाते. तथापि, त्याची तारीख आणि ठिकाण माहित नाही.

जम्मू आणि काश्मीरमधून कलम ३७० हटवल्यानंतर २०१९ मध्ये रेझिस्टन्स फ्रंटची स्थापना करण्यात आली. त्याची सुरुवात लष्कराची ऑनलाइन युनिट म्हणून झाली, परंतु तहरीक-ए-मिल्लत इस्लामिया आणि गझनवी हिंद सारख्या विद्यमान संघटनांमध्ये विलीन झाल्यामुळे, तो लवकरच एक पूर्ण दहशतवादी गट बनला. सैफुल्लाह याचे काम पाहतो.

**काय म्हणाला होता सैफुल्लाह....**

आपल्या भाषणात, सैफुल्लाहने २०१९ मध्ये जम्मू आणि काश्मीरमधून कलम ३७० हटवण्याच्या भारताच्या निर्णयाविरुद्ध भाष्य केले. त्याने पाकिस्तान सरकार आणि तत्कालीन परराष्ट्र सचिव शहरयार खान यांना सांगितले की, तुम्ही काश्मिरी लोकांसाठी काहीही केलेले नाही. आम्ही त्यांच्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास तयार आहोत. भारत काश्मीरमधील लोकांवर अत्याचार करत आहे.

सैफुल्लाह म्हणाला की, पाकिस्तान सरकार आपल्या लोभामुळे काश्मीर मुद्यावर कमकुवत झाले आहे. भारत सरकारने ६ वर्षांपूर्वी कलम ३७० रद्द केले, पण तुम्ही (पाकिस्तान सरकारने) आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर काश्मीरबद्दल बोलले नाही. आपला पाकिस्तान जगासमोर नतमस्तक झाला. तुम्ही काश्मीर थंड कराल आणि ते बलुचिस्तानला तापवतील. (वृत्तसंस्था)

## पहलगाम हल्ल्याचा हिशेब होणार : राजनाथसिंह

◆ **नवी दिल्ली, २३ एप्रिल**

काश्मीरातील पहलगाममध्ये विशिष्ट धर्माला लक्ष्य करून दहशतवाद्यांनी भ्याड कृत्य केले. यामध्ये अनेक निष्पाप नागरिकांना प्राण गमवावे लागले. मी देशवासीयांना आश्वस्त करतो की, सरकार आवश्यक ती सर्व पावले उचलत आहे. अतिरेकी कारवायांना भारत घाबरणार नाही. हल्ला करणाऱ्यांना शोधून काढूच पण पडद्यामागे राहून ज्यांनी सूत्रे हलवली, अशा लोकांपर्यंतही पोहोचू. या हल्ल्याला जग लक्षात ठेवेल असे प्रत्युत्तर लवकरच दिले जाईल अशी ग्वाही संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दिली.

देशातील सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी राजनाथ सिंह यांनी बुधवारी संरक्षण प्रमुख आणि तीनही दलाचे प्रमुख तसेच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यासोबत बैठक घेतली. यावेळी लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आणि नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी पहलगाम आणि संपूर्ण जम्मू आणि काश्मीरमधील सुरक्षा परिस्थितीची माहिती संरक्षणमंत्र्यांना दिली.

जम्मू-काश्मीरमध्ये अडकलेल्या प्रवाशांच्या मदतीसाठी आणि अतिरिक्त गर्दी टाळण्यासाठी श्री माता वैष्णोदेवी कटरा ते नवी दिल्ली अशी विशेष रेल्वे सेवा सुरू करण्यात आल्याची माहिती यावेळी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. (वृत्तसंस्था)

# भारत, सौदी अरेबियात चार सामंजस्य करार

## अवकाश, दळणवळण, आरोग्य क्षेत्रात एकत्र काम करणार

### मोदींच्या उपस्थितीत स्वाक्षरी



◆ **जेद्दाह, २३ एप्रिल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सौदी अरेबियाचे क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांनी दोन्ही देशांमधील मैत्री आणखी मजबूत करण्याच्या उद्देशाने मंगळवारी उशिरा रात्री चार सामंजस्य करार करण्यास सहमती दर्शविली. अवकाश, दळणवळण, आरोग्य आणि डोपिंग शिक्षण या क्षेत्रात दोन्ही देश एकत्र काम करणार असून मोदींच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आल्या.

पंतप्रधान कार्यालयाने जारी केलेल्या निवेदनानुसार पंतप्रधान मोदी यांनी प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांच्यात झालेल्या चर्चेत भारत आणि सौदी अरेबियाने दोन नवीन मंत्रिस्तरीय समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला. दोन्ही बाजूंनी भारतात दोन रिफायनरीज उभारण्यासाठी सहकार्य करण्याचे मान्य केले. मोदींच्या उपस्थितीत द्विपक्षीय चर्चेत सहमती झाली. दोन्ही बाजूंनी अंतराळ, ड्रग्ज तस्करांच्या माहितीची देवाघेवाण, शिक्षण, आरोग्य आणि दळणवळण या क्षेत्रात चार सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. यावेळी मोदी आणि सलमान यांनी स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप परिषदेचे सहअध्यक्षपद भूषवले, ज्याचा उद्देश दोन्ही देशांमधील मैत्री आणखी मजबूत करणे आहे.

**संरक्षण सहकार्यासाठी मंत्रीस्तरीय समिती**

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने अधिकृत निवेदन जारी केले, त्यात म्हटले की, परिषदेने एसपीसी अंतर्गत विविध समित्या, उपसमित्या आणि कार्यकारी गटांच्या कामाचा आढावा घेतला. ज्यामध्ये राजकीय, संरक्षण, सुरक्षा, व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, तंत्रज्ञान, शेती, संस्कृती यांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)



### मुंबईने सलग चौथा सामना जिंकला; बोल्टच्या ४ विकेट

**हैद्राबाद** : आयपीएलच्या १८ व्या हंगामात सलग चौथा सामना जिंकून मुंबई इंडियन्सने पॉइंट्स टेबलच्या टॉप-३ मध्ये प्रवेश केला आहे. मुंबईने सनरायझर्स हैदराबादचा ७ विकेट्सने पराभव केला. मुंबईने माजी कर्णधार रोहित शर्माने सलग दुसऱ्या सामन्यात अर्धशतक झळकावले. ट्रेंट बोल्टने ४ विकेट घेतल्या. हैदराबादच्या राजीव गांधी स्टेडियमवर मुंबईने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हैदराबादने ३५ धावांच्या आत ५ विकेट गमावल्या. येथून, हेन्रिक क्लासेन आणि अभिनव मनोहर यांनी ९९ धावांची भागीदारी केली आणि संघाला १४३ पर्यंत पोहोचवले. मुंबईने १६ व्या षटकात केवळ ३ विकेट्स गमावून लक्ष्य गाठले.



# सोलापुरात तापमानाचा पारा ४३.८ अंशावर

● यंदाच्या वर्षातील सर्वोच्च तापमान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२३ एप्रिल-**

सोलापूरसह राज्यातील तापमानाचा पारा देखील उंचावला आहे. राज्यातील उन्हाची दाहकता वाढतच आहे. बुधवार (दि.२३) रोजी सोलापूरसह राज्यात किमान ४३.८ अंशांनी तापमानाच्या पाऱ्यात पुन्हा वाढ झाली आहे.

तर सोलापूर शहरात गेल्या आठवड्या भरात ४१ अंशाच्या वर तापमान पाहायला मिळाले. शहर व परिसरात उन्हाची तीव्रता वाढली असून या हंगामातील आतापर्यंतचे उच्चांकी कमाल तापमान पुन्हा मंगळवारी ४३.४ अंशावर गेले होते. आज बुधवारी ४३.८ अंश तापमान असले तरी सोलापूर शहरात बुधवारी दुपारी तीन साडेतीनच्या दरम्यान सोलापुरात हलक्या पावसाच्या सरी पडल्या त्यामुळे दोन दिवसाच्या उष्णतेनंतर सोलापूरकरांना काही काळ हवेत गारवा निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले.

**असे वाढत गेले एप्रिल महिन्यातील तापमान**

- १५ एप्रिल : ४२.८
- १६ एप्रिल : ४२.२
- १७ एप्रिल : ४२.८
- १८ एप्रिल : ४३.२
- १९ एप्रिल : ४२.८
- २० एप्रिल : ४३.0
- २१ एप्रिल : ४३.0
- २२ एप्रिल : ४३.४
- २३ एप्रिल : ४३.८

# अडीच लाख काश्मिरींच्या पोटावर लाथ

## १२००० कोटींच्या काश्मिरी अर्थव्यवस्थेचा मोडणार कणा?

◆ **श्रीनगर, २३ एप्रिल**

जम्मू आणि काश्मीर येथील अनंतनाग जिल्ह्यातील बैसरन खोऱ्यात निर्दोष पर्यटकांवर भ्याड हल्ला करण्याला आला. या ठिकाणाला 'मिनी स्वित्झर्लंड' असेही म्हणतात, जे इतके सुंदर आहे की येथे अनेक बॉलिवूड चित्रपटांचे चित्रीकरण झाले आहे. पहलगाम व्हॅलीला मेंढपाळांची व्हॅली किंवा वैली ऑफ शेफर्ड म्हणूनही ओळखले जाते कारण गुज्जर-बकरवाल समुदाय येथे उंच पर्वतांवर असलेल्या तलावांच्या काठावर राहतात. एप्रिल-मे हंगामात ही लोक वर जातात आणि ऑक्टोबरमध्ये परत खाली येतात. येथे मेंढ्यापालन अधिक प्रमाणात होते. जगप्रसिद्ध पश्मीना शाल या मेंढ्यांच्या लोकरीपासून बनवल्या जातात, जे जगभर प्रसिद्ध आहेत आणि त्यांची किंमत २० हजार रुपयांपासून सुरू होऊन लाखो रुपयांपर्यंत जाते.

पहलगाममधील हल्ल्याच्या घटनेमुळे पर्यटकांचा विश्वासच डगमगला नाही तर खोऱ्याचा आर्थिक कणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पर्यटन उद्योगालाही गंभीर संकटात टाकले आहे. पर्यटकावर झाडलेली प्रत्येक गोळी काश्मीरची अर्थव्यवस्था अनेक वर्षे मागे टाकलत आहे.



**काश्मीरातील पर्यटनाची आकडेवारी**

| वर्ष | पर्यटकांची संख्या (कोटींमध्ये) |
|---|---|
| २०२१ | १.१३ |
| २०२२ | १.८८ |
| २०२३ | २.११ |
| २०२४ | २.३६ |

**अर्थव्यवस्थेत पर्यटनाचा वाटा**

| आर्थिक वर्ष | मिळाले उत्पन्न | राज्याच्या जीडीपीत वाटा |
|---|---|---|
| २०१८-१९ | ११,००० कोटी | ७ टक्के |
| २०१९-२० | १२,५०० कोटी | ७.८४ टक्के |
| २०२२-२३ | १४,३०० कोटी | ८.४७ टक्के |
| २०२३-२४ | १६,८०० कोटी | १०.५ टक्के |

**१२,००० कोटी रुपयांचा काश्मीरचा वार्षिक पर्यटन उद्योग**

पृथ्वीवरील स्वर्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काश्मीरच्या उत्पन्नाच्या प्रमुख स्त्रोतांपैकी पर्यटनाचे विशेष महत्त्व आहे. काश्मीरचा वार्षिक पर्यटन उद्योग १२,००० कोटी रुपयांचा असून एका अंदाजानुसार, २०३० पर्यंत २५,००० कोटी ते ३०,००० कोटी रुपयांपर्यंत वाढणार होता आणि काश्मीरमधील पर्यटन राज्याच्या एकूण जीडीपीमध्ये ७-८ टक्के योगदान देतो. पण, मंगळवारी पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याने केवळ निष्पाप लोकांचा बळीच घेतला नाही तर या उद्योगाची कबरही खोदली आहे. (वृत्तसंस्था)



### दल लेकमध्ये १५०० हून अधिक हाऊस बोट

काश्मीरमध्ये अडीच लाखांहून अधिक लोकांचा रोजगार पर्यटनावर होतो. अशा स्थितीत, या हल्ल्यामुळे या सर्व अडीच लाख लोकांचे जीवनमान धोक्यात येईल आणि कुटुंबांना दोन वेळचे जेवण मिळण्याची समस्या भेडसावू शकते. काश्मीरमध्ये अनेक लहान-मोठी हॉटेल्स आहेत, ज्यात ३००० हून अधिक खोल्या आहेत. या हल्ल्याचा येथील हॉटेल उद्योगावर विपरीत परिणाम होईल आणि हॉटेलमध्ये काम करणाऱ्या लोकांच्या रोजगारावरही परिणाम होईल. एवढेच नाही तर एकट्या दाल सरोवरात १५०० हून अधिक हाऊस बोट चालतात, ज्यामुळे हजारो लोकांना लोकांना दोन वेळच जेवण मिळतं पण, आता त्यांनाही अडचणींना सामोरे जावे लागू शकते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



### रेकॉर्डवरील गुन्हेगारास शहर गुन्हे शाखेकडून अटक; घरफोडीचा गुन्हा उघडकीस

**सोलापूर, दि. २३ एप्रिल -**

सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयातील गुन्हे शाखेकडून पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगारास अटक करून घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणला. बसवराज मलप्पा पुजारी (वय ३०, रा. तडवळगा, ता. इंडी, जि. विजापूर, कर्नाटक) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. घरफोडीचे गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार बसवराज पुजारी हा शहरातील मंगळवेढा रोडवरील सीएनएस हॉस्पीटलच्या परिसरात असल्याची माहिती शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली होती. त्यावरुन शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी मंगळवेढा रोडवरील सीएनएस हॉस्पीटलजवळवून बसवराज पुजारी यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली. त्यावेळी त्याने सोलापुरात सन २०२२ मध्ये एका ठिकाणी घरफोडी केल्याचे सांगून ते ठिकाण दाखविले. बसवराज पुजारी याने दाखविलेल्या ठिकाणी झालेल्या घरफोडीबाबत सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून तो गुन्हा उघडकीस आला आहे. या गुन्ह्यातील १ लाख ५१ हजार २५० रुपये किंमतीचे ६०.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने पोलिसांनी हस्तगत केले आहेत. बसवराज पुजारी यास सलगर वस्ती पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आलेले आहे. ही काम गिरी पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक संदीप पाटील, पोलिस अंम लदार विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, सायबर पोलिस ठाण्याकडून प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड, घोळकर यांनी केली.



### सराईत गुन्हेगारास अटक; तीन गुन्हे उघडकीस : गुन्हे शाखेची कामगिरी

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सराईत गुन्हेगारास अटक करून तीन गुन्हे उघडकीस आणले. या कारवाईत पोलिसांनी सोन्याचे दागिने, रोख रक्कम, दुचाकी असा सुमारे १ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. शुभम अशोक मडीवाळ (वय २०, सध्या रा. १ नंबर कॉलनी, १ नंबर लेन, टेकवडे पेट्रोल पंपामागे, आकाशवाणी, हडपसर, पुणे, कायम रा. हनुमान मंदीराजवळ, दोड्डी रोड, कुंभारी, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी महालक्ष्मी मंदीर ते मार्केट यार्ड या रस्त्यावर पहाटेच्या सुमारास शुभम मडिवाळ यास ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतल्यानंतर त्याच्याजवळ रोख २५ हजार रुपये व एक सोन्याचा बदाम मिळून आला. त्यामुळे त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याच्याकडे दोन दुचाकी मिळून आल्या. त्या त्याने साईबाबा चौक आणि अरमान रेसिडेन्सी येथून चोरट्याचे सांगितले. त्याच्याकडे मिळून आलेले सोन्याचे बदाम व रोख ४० हजार रुपये समर्थ रेसिडेन्सी येथील बंद घरातून चोरल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी त्याच्याकडून एमआयडीसी पोलिस ठाण्यातील २ आणि जेलरोड पोलिस ठाण्यातील एका गुन्ह्यांमधील ९५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अल्फाज शेख, पोलिस अमंलदार बापू साठे, वसीम शेख, सुभाष मुंढे, सैपन सय्यद, सतीश काटे, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली.

### दाराशा हॉस्पीटलमधून बाळाच्या चोरीचा प्रयत्न; सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २३ एप्रिल -**

शहरातील महानगरपालिकेच्या दाराशा हॉस्पीटलमधील महिला वॉर्डमधील जन्मलेल्या बाळाच्या चोरीचा प्रयत्न करणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत लक्ष्मीबाई गणेश हजारीवाले (वय ३८, रा. घर नं. ७३, उत्तर सदर बझार, लोधी गल्ली, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून संतोष प्रभाकर सातपुते (वय ५३, रा. घर नं. १७९, लोणार गल्ली, उत्तर सदर बझार, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लष्कर परिसरातील महानगरपालिकेच्या दाराशा हॉस्पीटलमध्ये लक्ष्मीबाई हजारीवाले यांची मुलगी भारती चौधरी ही प्रसुतीसाठी ॲडमिट झाली होती. ती २२ एप्रिल रोजी प्रसुत झाली. २२ एप्रिल रोजी दुपारी पावणे एकच्या सुमारास दाराशा हॉस्पीटलमधील महिला वॉर्डमध्ये असलेल्या भारती चौधरी हिच्या जन्मलेल्या बाळास संतोष सातपुते हा बेडवरून चोरी करून घेऊन जात असताना मिळून आला. पोलिस हवालदार मनोहर पुढील तपास करीत आहेत.

### कामगार महासंघाचा आज रास्ता रोको

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

सर्वोच्च न्यायालय व महाराष्ट्र शासनाचे आदेशाची अंमलबजावणी करुन इतर आर्थिक लाभ व भांडे संच वाटपाचे कामकाज गेल्या ६ महिन्यापासून बंद असल्यामुळे शासनास अनेक वेळा निवेदन देवूनही दखल न घेतल्यामुळे गुरुवारी २४ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद समोर चौकात कामगार संघटना महासंघाचे अध्यक्ष बशीर अहमद यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. यात १२ संघटनेने सहभागी व्हावे, असे आवाहन सायबण्णा तेगेळ्ळी, सिद्धार्थ बोराडे, रफिक हणगी यांनी केले आहे.

# सोलापूर बस स्थानकावर एसटी बसेसचा दुष्काळ

## प्रवासी ताटकळत उभे; फलाट मात्र रिकामे




**सोलापूर : बस स्थानकावर प्रवासी चातक पक्ष प्रमाणे एसटी बसची वाट पाहत असताना टिपलेले छायाचित्र.तर दुसऱ्या छायाचित्रात झाडाच्या सावलीत ताटकळत उभारलेले प्रवासी.**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ एप्रिल-**

प्रवाशांच्या सेवेसाठी ब्रीदवाक्य घेऊन तत्पर असणाऱ्या एसटी महामंडळाचे दळणवळण व्यवस्था कोलमडलेली दिसत आहे. सोलापूर बस स्थानकावर बसच उपलब्ध नसल्याने अनेक प्रवाशांना फलाटावर तसेच झाडाच्या सावलीम ध्ये प्रवासी बॅगाचे वजन घेऊन ताठकाळत उभे राहावे लागल्याचे चित्र दिसून येत आहे.

उन्हाळी जादा हंगामासाठी सोलापूर विभागामार्फत विशेष गाड्यांचे नियोजन करण्यात आले होते. या विशेष एसटी बसेसच्या नियोजनामध्ये लांब पल्ल्याच्या बसेसचा जादा समावेश होता. लांब पल्ल्याच्या जादा बसेसमुळे जिल्ह्यातील दळणवळण व्यवस्थेवर ताण निर्माण झाला आहे. याचेच फलित म्हणून सोलापूर बस स्थानकावर बसच उपलब्ध नसल्याने फलाट रिकामे दिसून आले. आता एसटी येईल... मग एसटी येईल... आता आपण जाऊया... या विचारात प्रवासी उभा असलेला दिसून आला. मात्र एसटी काही केल्या वेळेवर येईना. त्यामुळे प्रवासी राजा देखील हैराण झाला आहे. ऐन उन्हाळ्यामध्ये जादा एसटी बसेस नियोजन कोलमडले आहे. लांब पल्ल्यांच्या गाड्यांचे वेळापत्रक बिघडलेले आहे. त्याचा विपरीत परिणाम जिल्ह्यातील तसेच शेजारील जिल्ह्यात जाणाऱ्या एसटी बसेस वर जाणवत आहे. विविध मार्गावर धावणाऱ्या एसटीचे प्रमाण कमी झाल्याने आहे त्या धावणाऱ्या एसटी बसेस वर प्रवाशांचा ताण वाढलेला आहे. सर्वच एसटी बसेस हाउसफुल झाल्याने प्रवाशांना उकाडा व घामाच्या धारामध्ये तसेच उन्हाच्या झळा सहन करत प्रवास करावा लागत आहे.

सोलापूर आगार तसेच विभाग यांच्या माध्यमातून सुमारे ६० ज्यादा एसटी बसेसचे नियोजन करण्यात आले होते. सोलापूर जिल्हा तसेच पुणे, धाराशिव व लातूर या शेजारील जिल्ह्यांच्या मार्गावरून या बसेस धावणार होत्या. त्यासोबतच लांब पल्ल्याच्या मुंबई, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजी नगर, अशा विविध मार्गावर या बसेस सोडण्यात येत आहेत. लांब पल्ल्याच्या एसटी बसेसना परतीचा प्रवास करताना वेळेची मर्यादा येत आहे. अशातच जुन्या बसेस स्क्रॅप केल्यामुळे बसेसच्या कमतरतेमुळे बसेस वेळेवर उपलब्ध होत नसल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तर दुसरीकडे खाजगी एजंट एसटी स्टँडवर येऊन प्रवासी पळवण्याचा प्रयत्न करत आहेत. एसटी पेक्षा कमी भावात घेऊन जातो असे सांगून प्रवासी नेण्याचा प्रकार स्टँडवर घडत आहे. याकडे देखील एसटी प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. अशा परिस्थितीत प्रवासी अडकून गेला आहे. एसटीच्या कमतरतेमुळे सर्वच एसटी हाऊसफुल भरून येत आहेत. त्यामुळे प्रवास करताना अनेकांना अडचणी सहन करावे लागत आहेत.

> **उन्हाळ्यात एसटी बसेसचे नियोजन योग्य पद्धतीने करा**
>
> शासनाने गेल्या काही दिवसांपासून नवीन एसटी बसेस प्रवाशांच्या सेवेसाठी रुजू केलेल्या आहेत. त्यामध्ये आणखीन वाढ करावी, ऐन उन्हाळी हंगामात एसटी बसेसच्या कमतरतेमुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. आपल्या रात्री महिलांना प्रवास करताना जीव मुठीत धरावा लागत आहे. त्यामुळे जादा एसटी बसेस नियोजन योग्य पद्धतीने करावे.
>
> **- नीता देशपांडे, महिला प्रवासी**

# पुण्याच्या समर्थ डेव्हलपर्सच्या भागीदारांचा जामीन फेटाळला

## सहा कोटींचे फसवणूक प्रकरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

नेहरू नगर व सलगर वस्ती येथील शेतजमीनीचे दस्तामध्ये परस्पर फेरबदल करून मोबदल्याची रक्कम न देता शेतजमीन स्वतः चे नावे लिहून घेऊन दोघां भावांची फसवणूक केल्याप्रकरणी पुणे येथील समर्थ डेव्हलपर्सचे भागीदार राहुल विष्णु लाड (रा. सर्व्हे नं. ११६, रिलायन्स टॉवरजवळ, वाल्हेरवाडी, चिंचवड, पुणे) आणि राजेंद्र तुकाराम थोरवे (रा. सर्व्हे नं. १८/९, गणेश नगर, दुर्गा कॉलनी, डांगे चौक, थेरगाव, पुणे) यांचा दोन वेगवेगळ्या गुन्ह्यात अटक झाल्यानंतर त्यांनी दाखल केलेला जामीन अर्ज प्रथम न्यायदंडाधिकारी विक्रमसिंह भंडारी यांनी फेटाळला.

रघुनाथ आनंदा रोकडे यांच्या मालकीची नेहरु नगर येथील शेतजमीन व संदीप गोविंद रोकडे यांच्या मालकीची सलगर वस्ती येथील शेतजमीन दोघा भावांनी आरोपींना १६ मार्च २५ रोजी रजिस्टर खरेदी दस्तान्वये लिहून दिली व सदर दस्त रजिस्टर कार्यालयात नोंद केल्याची झेरॉक्स प्रत त्याचदिवशी आरोपींनी फिर्यादीस दिली व फिर्यादीस मोबदल्यापोटी दिलेला धनादेश मुद्दामपणे व जाणूनबुजून न वटविण्याकराता पेमेंट थांबविले. त्यानंतर फिर्यादीने आरोपींना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या सोबत संपर्क झाला नाही. त्यावेळी आपली फसवणूक झाली हे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने कायदेशीर कारवाई करण्याकरिता रजिस्ट्रार कार्यालयातून दस्तांची नक्कल काढली असता त्यामध्ये आरोपींनी खरेदीखताची रक्कम देणे टाळण्यासाठी परस्पर वर नमूद मिळकतीबाबत दिवाणी दावा प्रलंबित असल्यास तो निकाली निघेपर्यंत रक्कम देणार नाही, असा मजकूर फसवून समाविष्ट केल्याचे दिसून आले. त्यामुळे फिर्यादीची आर्थिक फसवणूक करून जमीन बळकविल्याप्रकरणी आरोपींविरुद्ध रघुनाथ आनंदा रोकडे व संदिप गोविंद रोकडे यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल आहेत. दोन्ही आरोपींनी जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. फिर्यादी व सरकारी वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य मानून न्यायालयाने दोन्ही आरोपींचा जामीन अर्ज फेटाळला. यात सरकार पक्षातर्फे ॲड. अमर डोके, मुळफिर्यादीतर्फे ॲड. संतोष न्हावकर, ॲड.राहुल रुपनर, ॲड. शैलेश पोटफोडे यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड. लोंढे-पाटील यांनी काम पाहिले.

# सोलापुरात महाविद्यालयाच्या वसतीगृहात विद्यार्थीनीची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ एप्रिल-**

सोलापुरातील प्रतिष्ठित महाविद्यालयाच्या वसतिगृहामध्ये अकरावी शास्त्र शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थिनीने ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे.

स्नेहा सौदागर गायकवाड ( वय १९, रा. तरटगाव ता. उ. सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या मुलीचे नाव आहे. स्नेहा हि शहरातील एका नामवंत महाविद्यालयात इयत्ता अकरावीत शास्त्र शाखेत शिकत होती. ती मैत्रिणी सोबत महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतीगृहात राहत होती. दरम्यान तिच्यावर चोरीचा आरोप केल्यामुळे काही दिवस ती आपल्या गावी गेली होती,असा आरोप नातेवाईकांनी केला आहे. सहा दिवसांनी पुन्हा ती महाविद्यालयाच्या वस्तीगृहात परतली. मंगळवारी सायंकाळी तिच्या खोलीतील मैत्रिणी बाहेर गेल्यानंतर ती एकटीच खोलीमध्ये होती. तिने दरवाजा लावून घेतला आणि खिडक्यांना कागद लावून खिडक्या बंद केल्या. त्यानंतर पलंगावर खुर्ची ठेवून तिने स्वतः च्या ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. अन्य मुली बाहेरून वस्तीगृहावर आल्यानंतर त्यांना दरवाजा बंद दिसल्यामुळे त्यांनी वसतीगृह प्रमुखांना बोलावले. तेथून पोलिसांना बोलावून दरवाजा तोडून पाहिले असता विद्यार्थिनीने गळफास घेतल्याचे लक्षात आले. दरम्यान मुलीने गळफास घेतल्याचे त्यांच्या कुटुंबीयांना सांगितल्यानंतर तातडीने ते महाविद्यालयात आले. त्यांनी गोंधळ घालायला सुरुवात केली. वसतीगृहामध्ये मुलीवर चोरीचा आरोप केल्यामुळे ती गावाकडे निघून आली होती. निराश होती.तरीसुद्धा समजावून आपण तिला आजच वसतीगृहात आणून सोडले होते असे नातेवाईकांनी सांगितले. मंगळवारी सायंकाळी तिने आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी तिने चिठ्ठीमध्ये आपण जीवनाला कंटाळलो आहोत. आपल्या आत्महत्येला कोणालाही जबाबदार धरू नये, असे लिहिले असल्याचे सांगण्यात येते. पोलिसांनी चिठ्ठी जप्त केली आहे.

# हातभट्टीसह मद्य विक्री करणाऱ्या २२१ जणांना अटक

## ८९ ढाब्यांवर गुन्हे तर १३७ मद्यपींकडून १ लाख ७२ हजारांचा दंड वसूल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ एप्रिल-**

सोलापूर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने चालू महिन्यात हातभट्ट्यां तसेच अवैध मद्य विक्री करणाऱ्यांवर २०५ गुन्हे दाखल करून २२१ जणांना अटक केली. या कारवाईत ४० लाख ८७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच अवैध मद्य विक्रि करणाऱ्या ८९ ढाब्यांवर कारवाई करीत १३७ मद्यपींकडून १ लाख ७२ हजार ५०० रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.



एप्रिल महिन्यांत राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून सोलापूर शहर व जिल्ह्यातील हातभट्ट्यां तसेच अवैध मद्य विक्री व वाहतूक करणाऱ्यांविरोधात मोहिम उघडली आहे. या मोहिमेंतर्गत १ एप्रिल ते २२ एप्रिल या कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाने सोलापूर शहर व जिल्ह्यात केलेल्या अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रावर तसेच अवैध देशी-विदेशी मद्य विक्रि व वाहतूकीवर केलेल्या कारवाईत २०५ गुन्हे दाखल करीत २२१ जणांना अटक केली. या कारवाईत ५४ हजार ३२० लिटर गुळमिश्रीत रसायन, २१९५ लिटर तयार हातभट्टी, ४१९.१९ बल्क लिटर देशी मद्य, ४९८.७४ बल्क लिटर विदेशी मद्य, ९०.५२ बल्क लिटर बिअर, ३४८ लिटर ताडी आणि ११ वाहने असा ४० लाख ८६ हजार ७४७ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तसेच अवैध मद्य विक्रि करणाऱ्या व मद्य पिण्यास परवानगी देणाऱ्या ८९ ढाब्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून १३७ मद्यपींवर कारवाई करण्यात आली आहे. न्यायालयाने ढाबा मालक व मद्यपी ग्राहक यांना १ लाख ७२ हजार ५०० रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

ही कारवाई अधिक्षक भाग्यश्री जाधव, उपअधिक्षक एस आर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक आर एम चवरे, जे एन पाटील, ए व्हि घाटगे, राकेश पवार, पंकज कुंर, सचिन भवड, दुय्यम निरिक्षक एस डी कांबळे, अंजली सरवदे, कदम, राम निंबाळकर, सहाय्यक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, मोहन जाधव, संजय चव्हाण, विजय पवार, जवान आण्णा करचे, नंदकुमार वेळापूरे, शोएब बेगम पूरे, वसंत राठोड, चेतन व्हनगुंटी, इस्माईल गोडीकट, प्रशांत इंगोले, अनिल पांढरे, विनायक काळे, पवन उगले, योगीराज तोग्गी, शिवानी मुढे, रशीद शेख, दिपक वाघमारे यांनी केली.

> **या ढाब्यांवर झाली कारवाई...**
>
> राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून चालू महिन्यात अवैध मद्य विक्रि करणाऱ्या व मद्य पिण्यास परवानगी देणाऱ्या ८९ ढाब्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये हॉटेल मोरया, हॉटेल काका, रॉयल ढाबा, सुमित कोल्ड्रींक्स, सावजी ढाबा, सम्राट ढाबा, जय मल्हार ढाबा, वैष्णवी ढाबा, मैत्री ढाबा, द सॅम ढाबा, श्री ढाबा, विकास हॉटेल, मातोश्री ढाबा, जय भवानी ढाबा, कोळीवाडा ढाबा, स्वाद ढाबा, दुर्गा ढाबा.

# श्रीमान भाऊसाहेब गांधी : शिक्षण क्षेत्रातील आदर्श व्यक्तिमत्व

> *श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा ही संस्था आज भारतामध्ये दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी संस्था म्हणून ओळखली जाते. संस्थेला १३९ वर्षांची गौरवशाली अशी परंपरा आहे. 'शिक्षण हाच धर्म' हे ब्रीदवाक्य डोळ्यासमोर ठेवून या संस्थेमध्ये सर्व समाजातील विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. संस्थेमध्ये प्रवेशित होणारा प्रत्येक विद्यार्थी संस्कारक्षम व ज्ञान संपन्न झाला पाहिजे ही भूमिका संस्थेतील प्रत्येक प्राचार्य व प्राध्यापकांच्या मनामध्ये असते. याचे मुख्य कारण म्हणजे स्व. श्रीमान भाऊसाहेब गांधी होय. श्रीमान भाऊसाहेब गांधी यांनी उत्तम संस्कार हेच शिक्षण या तत्त्वाप्रमाणे सतत कार्यरत राहून संस्थेचा विकास केला आहे.*

श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा या संस्थेचे सचिव या पदाची सूत्रे श्रीमान भाऊसाहेब गांधी यांनी १९७२ मध्ये हातामध्ये घेतली. श्रीमान भाऊसाहेब गांधी यांनी संस्थेमध्ये सुमारे तीस वर्ष सचिव या पदावर कार्य करत संस्थेचे नेतृत्व केले. संस्थेच्या कार्यासाठी भाऊसाहेबांनी स्वतःला संपूर्णपणे वाहून घेतले होते. या कालावधीमध्ये भाऊसाहेबांनी शैक्षणिक गुणवत्तेला खूप महत्त्व दिले. संस्थेतील प्रत्येक महाविद्यालयांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिलं गेलं पाहिजे याबाबतीत त्यांनी कोणतीही तडजोड केली नाही. महाविद्यालयाच्या गुणवत्तावाढीसाठी आवश्यक असणाऱ्या प्रत्येक शैक्षणिक सेवा व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भाऊसाहेब हे तत्पर असत. श्रीमान भाऊसाहेब गांधी यांचे महाविद्यालयातील प्रवेशापासून महाविद्यालयाच्या प्रत्येक शिक्षणक्रमाच्या निकालापर्यंत सर्व बाबींवर बारीक लक्ष असे.

श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा या आपल्या संस्थेमध्ये विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रियाही संपूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबवली पाहिजे तसेच प्रवेश प्रक्रियांमध्ये कोणत्याही प्रकारचा राजकीय अथवा अन्य हस्तक्षेप नसला पाहिजे असे ठाम मत श्रीमान भाऊसाहेब यांचे होते. भाऊसाहेबांचे संस्थेतील प्रत्येक शाळा व महाविद्यलययांच्या निकालाकडे बारीक लक्ष असे. प्रत्येक शाळा व महाविद्यालयाचा निकाल हा उत्तम असला पाहिजे याबाबत ते कायम आग्रही असत.

श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्या मते शिक्षण क्षेत्रामध्ये निस्वार्थपणा, कर्तव्यनिष्ठता व प्रामाणिकपणा अशा नैतिकमूल्यांची गरज असते. भाऊसाहेब गांधी यांची अत्यंत शिस्तबद्ध व्यक्तिमत्व म्हणून ओळख होती. त्यांच्याकडे अचूक निर्णय घेण्याची क्षमता, निपक्षपातीपणे वर्तन करणे, सर्व धर्म समभाव वृत्तीने कार्य करणे अशी गुणवैशिष्ट्ये होती. तसेच भाऊसाहेब हे एक उत्कृष्ट प्रशासक म्हणूनही ओळखले जात. भाऊसाहेब यांच्या या सर्व



गुणवैशिष्ट्यांमुळे ते एक आदर्श व अनुकरणीय असे व्यक्तिमत्त्व होते. यामुळेच संस्थेमध्ये कार्य करणाऱ्या सर्व व्यक्तींना भाऊसाहेब यांच्या व्यक्तिमत्वाबद्दल आदर वाटत असे. श्रीमान भाऊसाहेब गांधी यांचे कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन या महाविद्यालयाबाबत एक स्वप्न होते. ते स्वप्न म्हणजे या शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमध्ये शिक्षणशास्त्रातील प्रत्येक पदवी अभ्यासण्याची सुविधा उपलब्ध असली पाहिजे. शिक्षणाच्या कोणत्याही स्तरावरील विद्यार्थी शिक्षक शिक्षणापासून वंचित राहणार नाही हा विचार श्रीमान भाऊसाहेब गांधी यांचा होता. म्हणूनच भाऊसाहेबांच्या स्वप्नाची पूर्तीकरण्यासाठी महाविद्यालयामध्ये डी.एल.एड., बी.एड., एम.एड., एम.फिल., पीएच.डी. व य.च.म.मु. विद्यापीठाचे एम. एड., एम.ए.शिक्षणशास्त्र, शालेय व्यवस्थापन पदविका इ. शिक्षणक्रमापर्यंत सर्व प्रकारच्या शिक्षक शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

या संस्थेमध्ये कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन महाविद्यालयात गेली बावीस वर्ष मी कार्य करीत आहे. हे कार्य करत असताना महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांमध्ये व महाविद्यालयांमध्ये वैविध्यपूर्ण शैक्षणिक कार्यासाठी जाण्याची संधी मिळते. हे शैक्षणिक कार्य करण्याच्या निमित्ताने शिक्षण क्षेत्रातील विविध अनुभवी अधिकारी व तज्ञ व्यक्ती यांच्या सोबत संवाद होतो. या संवादांमध्ये श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा या संस्थेचे व श्रीमान भाऊसाहेब गांधी यांचे कौतुक ऐकावयास मिळते. संस्थेचा एक घटक या नात्याने हे ऐकल्यानंतर संस्थेबद्दल व श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्याबाबत अभिमानाची भावना मनात निर्माण होते आणि आपण या संस्थेचा एक घटक आहोत याचा सार्थ अभिमान वाटतो. तसेच आपल्या संस्थेचा नावलौकिक महाराष्ट्रभर पसरलेला आहे हे पाहून खूप आनंद वाटतो. आजही महाराष्ट्रामधील विविध शिक्षणतज्ञ श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्या पारदर्शक कार्याबाबत भरभरून कौतुक करतात. महाराष्ट्रात कोणत्याही प्रकारची देणगी न घेता एखादी संस्था स्वतःचा विकास अत्यंत उत्तमरित्या करू शकते याचे एक उदाहरण म्हणजे श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा ही संस्था आहे असे मत विविध शिक्षण तज्ञांकडून ऐकावयास मिळते. या संस्थेला नावलौकिक व सध्याचे वैभवशाली स्वरूप प्राप्त करून देणाऱ्या अशा कर्तृत्वान भाऊसाहेबांचा दि. २४ एप्रिल २०२५ रोजी २३ वा स्मृती दिन साजरा होत आहे. स्व. श्रीमान भाऊसाहेब गांधी यांचा श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा या संस्थेच्या विकासामध्ये सिंहाचा वाटा आहे. किंबहुना भाऊसाहेब हे वालचंद शिक्षण समूहाचे पितामह आहेत असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. श्रीमान भाऊसाहेब गांधी हे संस्थेचे सचिव या नात्याने कार्य करत असताना संस्थेतील प्रत्येक प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासोबत त्यांचा असणारा सुसंवाद आणि या सूसंवादांमधून निर्माण झालेले आपुलकीचे नाते हे वैशिष्ट्यपूर्ण होते. भाऊसाहेब गांधी यांचा संस्थेत कार्य करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांवर प्रचंड विश्वास होता. संस्थेतील प्रत्येक कर्मचाऱ्याचे हित सांभाळण्यासाठी ते कायम तत्पर असत.

वरील सर्व बाबींचा विचार करता श्रीमान भाऊसाहेब गांधी हे शिक्षण क्षेत्रामध्ये कार्य करणारे एक आदर्श किंवा प्रारूप व्यक्तिमत्व होते हे आपणास लक्षात येते. त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळेच संस्थेचा विकास शक्य झाला, संस्थेमध्ये नवनवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आणि गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्याची प्रक्रिया सातत्यपूर्ण चालू राहिली. आज संस्थेमध्ये नवनियुक्त असणारे प्राध्यापक व कर्मचारी यांच्या मनामध्येसुद्धा भाऊसाहेब गांधी यांच्याबद्दल नितांत आदर दिसून येतो. याचे एकमेव कारण म्हणजे श्रीमान भाऊसाहेब गांधी यांनी केलेल्या कार्याचे दाखले आजही अनुभवी प्राध्यापक व कर्मचारी यांच्याकडून ऐकावयास मिळतात. आजही श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा ही संस्था श्रीमान भाऊसाहेब गांधी यांनी सांगितलेले तत्त्व व आदर्श यानुसार कार्य करत आहे.

**-डॉ. अश्विन बोंदार्डे**
**प्राचार्य, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



नौदलात अधिकारी असलेला लेफ्टनंट विनय नरवाल आणि हिमांशी यांचा ६ एप्रिलला विवाह झाला होता. सुटी साजरी करण्यासाठी ते पहलगामला आले होते. पण, त्यांचे वैवाहिक आयुष्य १५ दिवस टिकले. अतिरेक्यांनी या दोन जीवांना वेगळे केले. जमिनीवर निपचित पडलेल्या पतीच्या देहाजवळ बसून असलेल्या हिमांशीच्या या छायाचित्राने सर्वांचेच मन हेलावून गेले.

# धर्म विचारल्यानंतर अतिरेक्यांनी पुरुषांना केले एकत्र अन् . . .

**महिलांनी सांगितला थरारक प्रसंग**

◆ **पुणे, २३ एप्रिल**
येथील संतोष जगदाळे, पत्नी प्रगती, मुलगी आसावरी, कौस्तुभ घनबोटे आणि संगीता घनबोटे यांचा पाच जणांचा गट काश्मीरला गेला होता. घटनेच्या दिवशी तेथे काय घटले हे आसावरी यांनी सांगितले असता अंगावर काटे उभे राहिले. आम्ही सर्व जण बेताब खोऱ्यातील एका पर्यटन ठिकाणावर असताना गोळीबाराचा आवाज आला. सुरक्षादल आणि अतिरेकी यांच्यातील गोळीबार समजून आम्ही सर्वजण जवळच्या तंबूत घुसलो. आमच्यासोबत सात-आठ जण होतो. गोळीबार करीत अतिरेकी आमच्या तंबूकडे आले. त्यांनी सर्वांना धर्म विचारला आणि माझ्या वडिलांना चौधरी तू बाहर आजा म्हणून हाक मारली. तुम्ही पंतप्रधान मोदींना मदत करता ना, असे म्हटले आणि वडिलांना कलमा म्हणावयास लावला. पण, कलमा न आल्याने अतिरेक्यांनी बाबाच्या डोक्यात, कानाच्या मागून आणि पाठीवर गोळ्या झाडल्या. माझ्या बाजूला कौस्तुभ काका होते. त्यांनाही चार-पाच गोळ्या घातल्या. धर्म विचारल्यानंतर मुले आणि महिलांना बाजूला करीत पुरूषांना एकत्र केल्यानंतर अतिरेक्यांनी बेछुट गोळ्या झाडल्या. आमच्या मदतीला ना पोलिस होते ना आर्मी. २० मिनिटे झाल्यावर लष्करी जवान आले. आमच्या आजूबाजूला असलेले स्थानिक नागरिक भीतीने कलमा म्हणत होते. त्यानंतर आम्हाला खेचरावरून पहलगाम येथे नेण्यात आले, असे आसावरी यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

# पुण्याचे काम केले असेल म्हणून जिवंत

◆ **मुंबई, २३ एप्रिल**
आयुष्यात काही तरी चांगले काम केले असेल, त्यामुळेच मी जम्मू-काश्मीरच्या पहलगाव शहरात झालेल्या घातक दहशतवादी हल्ल्यातून बचावली, अशा भावना जळगावच्या नेहा उर्फ किशोरी वाघुलाडे यांनी व्यक्त केल्या.
नेहा या ऑल इंडिया रेडिओ (एआयआर) मध्ये कॅज्युअल उद्घोषक म्हणून काम करतात. उन्हाळ्याच्या सुटी घालवण्यासाठी एका गटासोबत पहलगामला आल्या होत्या.
मंगळवारी दुपारी हवेत गोळीबाराचे आवाज ऐकू येत असताना आम्ही बैसरन कुरणांच्या नैसर्गिक सौंदर्याचा आनंद घेत होतो. पहलगामच्या वरच्या भागात असलेले कुरण लवकरच नरसंहाराच्या ठिकाणी रूपांतरित झाले. दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांना गोळ्या घालून ठार मारले, असे नेहा उर्फ किशोरी वाघुलाडे यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

# दहशतवाद्यांनी पत्नीसमोर सहा जणांना गोळ्या घातल्या

## काही हनिमूनसाठी आले होते, तर काही जण लग्नाच्या वाढदिवसासाठी

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी हरियाणाचे लेफ्टनंट विनय नरवाल आणि कानपूरचे शुभम यांची त्यांच्या पत्नींसमोर गोळ्या घालून हत्या केली. दोघांचेही नुकतेच लग्न झाले होते. ते पहलगामला हनिमून आणि पर्यटनासाठी आले होते.
या हल्ल्यात इंदूरचे व्यापारी सुशील नथानिएल, रायपूरचे स्टील व्यापारी दिनेश मिरानिया, बिहारचे आयबी अधिकारी मनीष रंजन आणि गुजरातमधील तीन जणांचा मृत्यू झाला. दिनेश त्यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी गेले होते. या दहशतवादी हल्ल्यात हरियाणातील करनाल येथील लेफ्टनंट विनय नरवाल (२६) शहीद झाले. त्यांचे लग्न फक्त ७ दिवसांपूर्वीच हिमांशी नरवालशी झाले. २ दिवसांपूर्वी विनय आणि हिमांशी त्यांच्या हनिमूनसाठी जम्मू आणि काश्मीरला पोहोचले. मंगळवारी, जेव्हा ते बैसरन खोऱ्यात फिरत होते, तेव्हा दहशतवाद्यांनी विनय यांच्यावर गोळीबार केला. ज्यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांची पत्नी हिमांशी नरवाल सुखरूप आहे. या घटनेचा एक व्हिडिओ समोर आला आहे ज्यामध्ये हिमांशी म्हणत आहेत की, मी पतीसोबत भेळपुरी खात होते. एक माणूस आला आणि म्हणाला की तू मुस्लिम नाही आणि नंतर गोळी झाडली.
दहशतवाद्यांनी कानपूर येथील शुभम याला त्याची पत्नी एशान्यासमोर गोळ्या घालून ठार मारले. एशान्या दहशतवाद्यांना ओरडून म्हणाली, "मलाही गोळी मारा." यावर दहशतवादी म्हणतात- आम्ही तुम्हाला गोळ्या घालणार नाही, तुम्ही जाऊन सरकारला सांगा.
रायपूरमधील स्टील व्यावसायिक दिनेश मिरानिया यांची पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी गोळ्या घालून हत्या केली. दहशतवाद्यांनी त्याच्या पत्नी, मुलगा आणि मुलीच्या डोळ्यासमोर त्याला गोळ्या घालून ठार मारले. पत्नीच्या चेहऱ्यावर स्फोटक पदार्थ उडाले, ज्यामुळे त्यांना खोल जखम झाली. मुलांनाही किरकोळ दुखापत झाली आहे. दिनेश मिरानिया (४५) यांच्यावर गोळीबार झाला तो दिवस त्यांच्या लग्नाचा वाढदिवस होता. तो त्याच्या कुटुंबासह साजरा करण्यासाठी बैसरन व्हॅलीला गेले होते.
दहशतवादी हल्ल्यात बिहारचा रहिवासी मनीष रंजन यांचाही मृत्यू झाला. रंजन गेल्या २ वर्षांपासून आयबीच्या हैदराबाद कार्यालयात सेक्शन ऑफिसर म्हणून तैनात होते. मनीषला त्यांच्या पत्नी आणि दोन मुलांसमोर गोळ्या घालून ठार मारण्यात आले. रंजनची पत्नी आशा देवी आणि मुले सुरक्षित आहेत. मनीष हे रोहतासच्या कारगहर पोलीस स्टेशन परिसरातील अरुही गावचे रहिवासी होते. ■



# सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर आता देशभरातील सुरक्षा यंत्रणा अलर्ट झाली आहे. कोकण किनारपट्टीवर अलर्ट जारी करण्यात आला असून पोलिसांकडून गस्त वाढवण्यात आली आहे. तर संशयित हालचालीवर लक्ष ठेवण्याचे आदेश दिले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी कोकण किनारपट्टीवर खबरदारी म्हणून चेकपोस्ट तयार करण्यात आल्या आहेत. कोकणात येणाऱ्या प्रत्येक वाहनाची कसून चौकशी करण्यात यावी असे आदेश देण्यात आले आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड तिन्ही जिल्ह्यातील पोलिस यंत्रणा अलर्ट मोडवर असून २४ तास गस्त सुरू करण्यात आली आहे. ■

# तुला मारणार नाही! जा, मोदींना जाऊन सांग!

**दहशतवाद्यांनी पतीला संपवून पत्नीला काय सांगितले?**

**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मारले गेलेले कर्नाटकचे व्यावसायिक मंजुनाथ यांच्या पत्नीने दहशतवाद्यांचे क्रौर्य सांगितले. मंजुनाथ यांना दहशतवाद्यांनी त्यांची पत्नी पल्लवी यांच्यासमोरच गोळी झाडली. एका वृत्तवाहिनीशी बोलताना पल्लवी यांनी घडलेला संपूर्ण घटनाक्रम कथन केला.
पतीचा मृत्यू पाहून पल्लवी आतून हादरल्या. माझ्या पतीला मारलंत. आता मलाही मारा, असे त्या दहशतवाद्यांना म्हणाल्या. त्यावर तुम्हाला मारणार नाही. जा, मोदींना जाऊन सांगा, त्यासाठी तुला जिवंत ठेवले आहे, असे एक दहशतवादी पल्लवी यांना म्हणाला. हा त्रोटक संवाद पल्लवी यांनी एका वृत्तवाहिनीला सांगितला. मंजुनाथ कर्नाटकच्या शिवमोग्याचे रहिवासी होते. मंजुनाथ यांनी दल लेकमध्ये बोटीतून फिरतेवेळी चित्रित केलेला व्हिडीओ त्यांचा अखेरचा व्हिडीओ ठरला. दल लेक आणि पहलगाम यांच्यातील अंतर साधारण ९५ किलोमीटर आहे. दल लेकहून पहलगामला जाण्यास सव्वा दोन तास लागतात. ■

# दहशतवाद्यांनी भेदली पंचस्तरीय सुरक्षा




पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी 'लष्कर ए तोयबा'ची उपसंघटना 'द रेझिस्टन्स फ्रंट'ने स्वीकारली आहे. केंद्र सरकारने जानेवारी २०२३मध्ये बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायद्यांतर्गत 'रेझिस्टन्स फ्रंट'ला (टीआरएफ) अधिकृतपणे दहशतवादी संघटना म्हणून घोषित केले होते. पाच ऑगस्ट २०१९ रोजी 'कलम ३७०' हटवल्यानंतर लगेचच हा गट उदयास आला. सुरुवातीला ऑनलाइन कार्यरत असणारी ही संघटना सहाच महिन्यांत सक्रिय दहशतवादी गटात रुपांतरित झाली. तोयबा आणि इतर दहशतवादी संघटनांमधील अतिरेक्यांना एकत्र करून स्थापन करण्यात आलेल्या 'द रेझिस्टन्स फ्रंट' या गटाचा जम्मू आणि काश्मीरमधील अनेक भीषण हल्ल्यांशी संबंध आढळला आहे.
जम्मू आणि काश्मिरातील पहलगाम येथे हल्ला करणारे दहशतवादी व्याप्त काश्मिरातून आले असल्यास ते पंचस्तरीय सुरक्षा रचना भेदून तब्बल २०० किमी आतपर्यंत आले, हे धक्कादायक आहे. ते स्थानिक असल्यास ही काश्मिरातील अंतर्गत भागात सेवा देणाऱ्या राष्ट्रीय रायफलच्या 'व्हिक्टर फोर्स'च्या तुकड्यांसाठी ही नवी डोकेदुखी ठरणार आहे. ■

**पंचस्तरीय सुरक्षेत**
१ एफडीएल
२ केडीएल
३ कंपनी मुख्यालय
४ बटालियन मुख्यालय
५ ब्रिगेड मुख्यालय

- जम्मू आणि काश्मिरातील सुरक्षा व्यवस्था पूर्णपणे भूदलाच्या हाती आहे. आतील भागातील सुरक्षेची जबाबदारी राष्ट्रीय रायफल्सकडे असते. त्यामध्ये
- **७० टक्के भूदल, २० टक्के स्थानिक पोलिस**
- **१० टक्के निमलष्करी दलाचे सैनिक.**
- या स्थितीत दहशतवादी नियंत्रण रेषा पार करून आत आले असल्यास त्यांना रोखण्यासाठी **पाचस्तरीय सुरक्षा** व्यवस्था आहे. ■



नियंत्रण रेषेवर तैनात असलेल्या तुकड्या या **'बटालियन'** स्वरूपात तेथे असतात.
एका बटालियनमध्ये जवळपास **८०० सैनिक**
**८०० सैनिक** सहा कंपन्यामध्ये विभागून सेवारत

प्रत्येक कंपनीची एक अत्याधिक महत्त्वाची पोस्ट **'की डिफेन्सिव्ह लोकेशन्स'** (केडीएल) म्हणून तेथे कार्यरत

'केडीएल'च्या अखत्यारीत **'फॉरवर्ड डिफेन्सिव्ह लोकेशन्स'** (एफडीएल) या पोस्ट नियंत्रण रेषेवर असतात.

**एफडीएलवर तैनात सैनिकांकडून दहशतवाद्यांची एखादी हालचाल सुटल्यास 'केडीएल'ची भूमिका अत्याधिक महत्त्वाची असते. एकवेळ 'एफडीएल' कमकुवत ठरू शकते, मात्र 'केडीएल' हे भक्कम व सक्षम असतेच.**

# नाम साधर्म्यामुळे दिवसभर वाजत होता मोबाईल...

**मुंबई** : माझे नाव संतोष लक्ष्मण जगदाळे असून या हल्ल्यात पुणे येथील संतोष एकनाथ जगदाळे यांचा मृत्यू झाला. नाव साधर्म्य असल्याने काल रात्रीपासूनच तर आज दिवसभर माझा मोबाईल खणखणत आहे. मी सुद्धा पहलगाम येथे गेलो होतो. पण, ज्या ठिकाणी हल्ला झाला ते ठिकाण मी एक तासापूर्वीच सोडले होते, असे सांगली येथील संतोष लक्ष्मण जगदाळे यांनी सांगितले.
प्रसारमाध्यमांमध्ये संतोष जगदाळे असे नाव येताच मोबाईलवर कॉल्स येणे सुरु झाले. माझी विचारपूस सुरू होती. आमचा चार जणांचा गट होता. खेचरावर जाण्याऐवजी आम्ही कारने पहलगामला गेलो. गोळीबार होण्यापूर्वी एक तास अक्षोदरच आम्ही हॉटेलला परत आलो होतो, असे जगदाळे यांनी सांगितले. ■


भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी श्रीनगर येथे आंदोलन करीत पहलगाम येथील घटनेचा निषेध केला.

# जगभरातील नेत्यांकडून पहलगाम हल्ल्याचा निषेध

**दहशतवादाविरोधात भारतासोबत असल्याचा दिला संदेश**

**नवी दिल्ली, २३ एप्रिल**
**जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा जगभरातील नेत्यांनी तीव्र निषेध केला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षडोनाल्ड ट्रम्प, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन, इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी तसेच इस्रायल, युक्रेन, इराण, अर्जेंटिना, जर्मनी आणि श्रीलंकेनेही दहशतवादी हल्लाबाबत संताप व्यक्त करीत दहशवादाविरोधात भारतासोबत असल्याचा संदेश दिला.**

### अमेरिका भारताच्या पाठीशी
काश्मीरमध्ये झालेला दहशतवादी हल्ला संतापजनक आहे. दहशतवादाविरोधात अमेरिका भारतासोबत खंबीरपणे उभी आहे. मृतांच्या आत्म्यास शांती मिळो आणि जखमींची प्रकृती लवकर बरी व्हावी अशी आम्ही प्रार्थना करतो. पंतप्रधान मोदी आणि भारतातील जनतेला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. आमच्या सर्वांच्या संवेदना तुमच्यासोबत आहेत.
- **डोनाल्ड ट्रम्प,** राष्ट्राध्यक्ष, अमेरिका

### अतिरेकी हल्ल्याने मन सुन्न झाले
उषा आणि मी भारतातील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील बळींबद्दल शोक व्यक्त करतो. गेल्या दोन दिवसांपासून या देशाचे आणि येथील लोकांच्या आदरातिथ्याने मी भारवून गेलो. मात्र काश्मीरात झालेला हल्ल्याने मन सुन्न झाले.
- **जे. डी. व्हान्स,** उपराष्ट्राध्यक्ष, अमेरिका

### गुन्हेगारांना कठोर शिक्षा मिळावी
क्रूर गुन्ह्याचे कोणतेही समर्थन नाही. आम्हाला आशा आहे की हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या गुन्हेगारांना कठोर शिक्षा मिळेल. दहशतवादाचा सामना करण्यासाठी भारतीय भागीदारांसोबत सहकार्य वाढवण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा मी पुनरुच्चार करू इच्छितो.
- **व्लादिमीर पुतिन,** राष्ट्राध्यक्ष, रशिया

### अतिरेकी कृत्यांचा तीव्र निषेध
युएई अतिरेकी कृत्यांचा तीव्र निषेध करते आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करून सुरक्षा आणि स्थिरता बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना दहशतवाद्यांना शिक्षा देण्यासाठी आम्ही भारतासोबत आहे.
- **संयुक्त अरब अमिराती,** दूतावास

### काश्मिरातील घटना अतिशय दुःखद
काश्मीरमधील पहलगाम शहरात झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करतो, ज्यामध्ये मोठ्या संख्येने निष्पाप लोक मृत्युमुखी पडले आणि जखमी झाले. आम्ही भारत सरकार आणि भारतातील जनतेप्रती, विशेषतः या हल्ल्यातील बळींच्या कुटुंबियांबद्दल मनापासून संवेदना व्यक्त करतो.
- **इराण दूतावास**

### इस्रायल भारतासोबत एकजुटीने उभा
जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या भयंकर दहशतवादी हल्ल्याने खूप दुःख झाले. आमच्या संवेदना पीडित आणि त्यांच्या कुटुंबियांसोबत आहेत. दहशतवादाविरोधातील लढ्यात इस्रायल भारतासोबत एकजुटीने उभा आहे.
- **गिडियन साअर,** परराष्ट्र व्यवहार मंत्री, इस्रायल

### हल्ल्याने असह्य वेदना
पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याचा आम्ही निषेध करतो. जेव्हा निष्पाप लोक मारले जातात तेव्हा असह्य वेदना होतात. गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हायला हवी.
- **युक्रेनियन दूतावास**

### अतिरेक्यांचा बंदोबस्त करावा
घृणास्पद दहशतवादी कृत्यातील बळींबद्दल आम्ही आमच्या संवेदना व्यक्त करतो. सर्व प्रकारच्या दहशतवाद, अतिरेकी आणि कट्टरतावादावेरोधात अर्जेंटिना भारतासोबत उभा आहे. भारताने गुन्हेगारांना कठोर शासन करावे.
- **मारियानो कौसिनो,** अर्जेंटिनाचे राजदूत

### भारतीय जनतेप्रति संवेदना
भारतात झालेल्या दहशतवादी हल्ल्याने खूप दुःख झाले. या घटनेचे बळी ठरलेले कुटुंबीय, जखमींच्याप्रती आम्ही संवेदना व्यक्त करतो.
- **जिओर्डानो मेलोनी,** पंतप्रधान, इटली

### भारताला आमचा पाठिंबा
जम्मू आणि काश्मीरमधील क्रूर हल्ल्याचा मी तीव्र निषेध करतो. पीडित आणि त्यांच्या कुटुंबियांसोबत माझ्या संवेदना आहेत. दहशतवादाविरुद्धच्या लढाईत फ्रान्स भारतासोबत एकजुटीने उभा आहे.
- **थिएरी माथू,** फ्रान्सचे राजदूत

### दहशतवादाला आमचा विरोध
पहलगाममधील हल्ल्याने आम्हाला धक्का बसला असून आम्ही याचा निषेध करतो. या घटनेत बळी ठरलेल्या कुटुंबायांप्रती आमच्या मनापासून संवेदना आहे. आम्ही सर्व प्रकारच्या दहशतवादाला विरोध करतो.
- **झू फेईहोंग,** राजदूत, चीन

भयंकर दहशतवादी हल्ल्याचा आम्ही निषेध करतो. पीडित कुटुंबीय आणि भारतीय जनतेप्रती आमच् संवेदना आहे. युरोपियन युनियन दहशतवादाविरोधात ठामपणे उभा आहे. निरपराध लोकांची हत्या करणाऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी.
- **काजा कल्लास,** उच्च प्रतिनिधी, युरोपियन युनियन ■

# मृतकांच्या नातेवाईकांसोबत मुख्यमंत्र्यांची चर्चा

**मुंबई** : पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्यात महाराष्ट्रातील पाच पर्यटकांचा मृत्यू झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मृतकांच्या नातेवाईकांसोबत चर्चा केली. मृतदेह आणण्याबाबत नागरी परिवहन आणि हवाई उड्डान मंत्रालयाला विनंती करण्यात आली आहे. तसेच जे पर्यटक अडकून पडले आहेत, त्यानाही राज्यात परत आणण्याची सोय करण्याबाबत बोलणे झाल्याचे फडणवीस यांनी एक्सवर पोस्ट केले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही केंद्रीय उड्डयन मंत्री के. राममोहन नायडू यांच्यासोबत चर्चा झाली असून जम्मू-काश्मीर प्रशासनाकडू यादी मिळताच राज्यातील पर्यटकांना परत आणण्याचे आश्वासन नायडू यांनी दिल्याचे सांगितले. ■

# कलमा न आल्याने एलआयसी अधिकाऱ्याला घातल्या गोळ्या

**इंदूर** : धर्माच्या नावाखाली पहलगाममध्ये निष्पापांचा जीव घेणाऱ्या अतिरेक्यांनी क्रुरता आणि अमानुषतेचा कळस गाठला. इंदुर येथील एलआयसी अधिकारी, जे धर्माने ख्रिश्चन होते, सुशील नथानेल यांना अतिरेक्यांनी कलमा म्हणावयास लावला. कलमा न आल्याने गोळ्या घातल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकांनी दिली. सुशील हे इस्टर साजरा करण्यासाठी पत्नी, मुलगा, मुलीसह काश्मिरला गेले होते. सुशील यांचे पुतणे संजय कुमारवत यांनी पहलगाममधील घटना सांगितली. अतिरेक्यांनी प्रथम सुशील यांना खाली वाकण्यास सांगितले. कलमा न आल्याने थेट गोळ्या घातल्या. वडिलांवर हल्ला झाल्यानंतर मुलगी आकांक्षा घटनास्थळी धावत गेली असता तिच्याही पायावर गोळी झाडली. ■

# डोंबिवलीतील तिघांच्या मृत्यूने मित्रांना मानसिक धक्का

**ठाणे** : मंगळवारच्या अतिरेकी हल्ल्यात डोंबीवली येथील हेमंत जोशी, संजय लेले आणि अतुल मोने यांचा मृत्यू झाला. या घटनेने या तिघांचे नातेवाईक आणि मित्रांना मानसिक धक्का बसला आहे. लेले हे एका खासगी कंपनीत लेखापाल होते. लेले यांच्या मुलाला हातावर गोळी लागल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. या घटनेने आम्हाला प्रचंड धक्का बसला, असे स्थानिक पोलिस पाटील लक्ष्मीकांत भोईर म्हणाले. ■

## अग्रलेख...

# जिहाद्यांना कायमचे ठेचा!

जम्मू-काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे लष्करी गणवेशात आलेल्या दहशतवाद्यांनी २२ एप्रिलच्या दुपारी नाव आणि धर्म विचारून, २३ हिंदू पर्यटकांच्या केलेल्या नृशंस हत्यांचा अतिशय कठोर शब्दात निषेध केला जायला हवा. अतिरेक्यांनी २ मुस्लिमांसह २ विदेशी प्रर्यटकांची केलेली हत्याही निषेधार्हच म्हणावी लागेल. या भ्याड कृत्याची केवळ निंदा करून भागणार नाही तर अतिरेक्यांचा सफाया आणि त्यांना आश्रय देणाऱ्यांना अथवा त्यांचे समर्थन करणाऱ्या लोकांना कठोर शिक्षा हाच यावरील उपाय राहू शकतो. त्यादृष्टीने सरकारने पावले उचलली असून, पळून गेलेल्या व जंगलात दडून बसलेल्या दहशतवाद्यांच्या अटकेसाठी सेनेच्या जवानांची मदत घेतली जात आहे. या हल्ल्याचा २६/११च्या हल्ल्याशी असलेला सारखेपणाही उघड झाला आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानातील लाहोर शहरातून सूत्रे हाकणाऱ्या लष्कर-ए-तय्यबाशी जुळलेल्या द रजिस्टन्ट फ्रन्टने (टीआरएफ) घेतली आहे. ही पाक समर्थित कट्टरपंथी सुन्नी मुस्लिमांची संघटना आहे. या संघटनेच्या दहशतवाद्यांनी पर्यटकांची नावे आणि धर्म विचारला आणि त्यांना कलमा म्हणायला लावल्या. ज्यांना कलमा म्हणता आल्या नाहीत, त्यांची त्यांनी गोळ्या घालून हत्या केली. सर्व दहशतवाद्यांनी स्थानिक पोलिसांचा गणवेश परिधान केला होता आणि मुखाच्छादन घातले होते. दहशतवाद्यांनी बहुतांशी हिंदू पुरुषांनाच लक्ष्य केले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियाचा दौरा मध्येच स्थगित करून मायदेशी परतले आहेत. भारतात दाखल होताच त्यांनी विमानतळावरच परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, विदेश सचिव विक्रम मिस्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. पंतप्रधानांनी त्यांच्या एक्स हँडलवर या हल्ल्यात प्रियजनांना गमावलेल्यांबद्दल शोकसंवेदना व्यक्त केल्या. हल्ल्यात जखमी झालेल्या लोकांना तत्परतेने मदत करण्याचे आश्वासन दिले. दहशतवाद्यांशी लढण्याचा आमचा संकल्प जारी राहील, असे सांगून या कृत्यामध्ये सहभागी असलेल्यांना न्यायालयाच्या कटघऱ्यापर्यंत आणण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी तत्काळ पहलगाम येथील बैसरनचा दौरा केला आणि मृत नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली. पीडित परिवारांची भेट घेऊन त्यांनी दहशतवाद्यांना सोडले जाणार नाही, अशी ग्वाही दिली. या दहशतवादी हल्ल्याची नोंद जगानेही घेतली असून, अनेक देशांच्या राष्ट्राध्यक्षांचे या घटनेची निंदा करणारे संदेश भारताला प्राप्त होत आहेत. दहशतवादाच्या मुद्यावर इस्रायल आणि इटली भारताच्या बाजूने उभे असल्याचे चित्र दिसत आहे. या हल्ल्याचा त्यांनी निषेध केला आहे आणि भारतासोबत एकोप्याने राहण्याची इच्छा व्यक्त केली आहे. दहशतवादाकडे बघण्याची अब्दुल्ला कुटुंबाची भूमिका आता तपासली जायला हवी. राजकारणात दहशतवाद्यांबाबतच्या त्यांच्या लवचीक भूमिकेमुळे बंदूकधाऱ्यांना बळ मिळाले, ही बाब कशी नाकारता येईल?

पहलगामच्या भ्याड हल्ल्यासाठी पाच पाकिस्तानी वंशाचे दहशतवादी जबाबदार असल्याचे कळत आहे. या सर्वांची स्केचेस पोलिसांनी जारी केली आहेत. त्यांना स्थानिक दहशतवाद्यांची मदत मिळाल्याचे पुरावेही हाती आले आहेत. काही दिवस पुरेल असे साहित्य सोबत बाळगून, दहशतवादी हल्ल्यानंतर जंगलाच्या दिशेने पळून गेले होते. घटनेचे ३७० कलम निष्प्रभ ठरविल्यापासून जम्मू-काश्मिरात शांतता नांदत होती. त्यामुळे राज्यातील व्यवसायाला चालना मिळू लागली होती. बंद असलेल्या शाळा पूर्ववत् सुरू झाल्या होत्या. महाविद्यालयेही नियमित सुरू झाली होती. राज्यातील तरुणाई क्रीडांगणावर आपल्यातील कौशल्य दाखवू लागली होती. दगडफेकीच्या घटना इतिहासजमा झाल्या होत्या आणि पर्यटनादी उद्योगांना तेजी आली होती. हॉटेल्स आणि टॅक्सी व्यवसायालाही चांगले दिवस आले होते. पण खोऱ्याचे हे शांत राहणे, अस्थिरता संपणे, जनजीवन पूर्वपदावर येणे पाकिस्तानला आणि त्यांच्या साह्याने दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्यांना मान्य नव्हते. म्हणूनच २२ एप्रिलला दुपारी हातात अत्याधुनिक बंदुका घेतलेल्या ५ दहशतवाद्यांनी मिनी स्वित्झर्लंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरात खुनाची होळी खेळली. गेल्या काही वर्षांपासून केंद्र सरकारने लष्कराला खुली सुट दिल्याने त्यांनी आतंकवाद्यांचा कणा मोडून टाकला आहे. त्यामुळे ते चिडून गेले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, या हल्ल्यात पाकिस्तानी दहशतवाद्यांचा समावेश आहे. विशेष नमूद करण्यासारखी बाब म्हणजे १६ एप्रिलला पाकिस्तानचे लष्कर प्रमुख आसिम मुनीर यांनी काश्मीरबाबत आम्ही कदापि काश्मीर विसरू शकत नाही, असे विखारी वक्तव्य केले होते. काश्मीर आमच्यासाठी गळ्याची रक्तवाहिनी असल्याचे त्यांनी नमूद केले होते. पाकिस्तानसाठी अजूनही काश्मीर हा कळीचा मुद्दा आहे. काश्मीर पुन्हा बळकावण्याचे त्यांचे प्रयत्न सुरूच आहेत. अमेरिकी उपराष्ट्रपती जेडी वान्स हे त्यांची हिंदू पत्नी आणि मुलांसह भारत दौऱ्यावर असताना तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर असताना हा हल्ला झालेला आहे. त्यामुळे दहशतवाद्यांनी हल्ल्यासाठी निवडलेला मुहूर्त ध्यानात घेतला जायला हवा. वर्ष २००० मध्येही पाकिस्तानने भारताविरुद्ध असे कटकारस्थान आखले होते. त्यावेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन भारत दौऱ्यावर होते. तेव्हा दहशतवाद्यांनी सहपुरा येथे ३६ निर्दोष शिखांची हत्या केली होती. पहलगामच्या हल्ल्यातून इस्लामी आणि जिहादी मानसिकतेचेच दर्शन होत आहे. दहशतवादाचा धर्म नसतो हे मान्य पण प्रत्येक दहशतवादी मुस्लिमच निघतो, याकडे दुर्लक्ष करून कसे चालणार? स्वतःला शांतिप्रिय म्हणवून घेणारा समाज दहशतवादाचे समर्थन कसा करू शकतो, हा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. जम्मू-काश्मिरातील हिंदू पर्यटकांची नृशंस हत्या करणाऱ्या इस्लामी मानसिकतेचा आणि तिला पाठिंबा देणाऱ्या प्रवृत्तीचा विश्व हिंदू परिषदेने निषेध केला असून, एका हिंदूच्या हत्येच्या बदल्यात १०० इस्लामी आतंकवाद्यांना मारले जायला हवे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. यानिमित्ताने २५ एप्रिलला सर्व मंदिरांमध्ये निषेध सभांचे आयोजन केले जाणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. मुस्लिम राष्ट्रीय मंचाने आता पाकिस्तानमुक्त जगाची वेळ आली आहे, या शब्दात घटनेची निंदा केली आहे. हे केवळ भारतावरील नव्हे तर संपूर्ण सुसंस्कृत जगावरील आणि मानवतेविरुद्धचे नियोजित युद्ध आहे, अशी प्रतिक्रिया संघटनेतर्फे दिली गेली आहे. मंचाने म्हटले आहे की, आता जागतिक समुदायाने पाकिस्तानमध्ये वाढणाऱ्या दहशतवादी तळांना नष्ट करण्यासाठी निर्णायक आणि एकत्रित पावले उचलण्याची वेळ आली आहे. बचावात्मक राजनैतिकता आता चालणार नाही, भारताला निर्णय घेण्याची राजनैतिकता स्वीकारावी लागेल. या हल्ल्याच्या निमित्ताने संपूर्ण हिंदू समाजाला पुन्हा एकदा 'एक है तो सेफ है'चा धडा मिळाला आहे. दहशतवाद्यांनी अतिशय शांत डोक्याने हे कुकृत्य घडवून आणले आहे. त्यांनी हत्या करताना ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य अथवा शूद्र तसेच उत्तर वा दक्षिण भारतीय अथवा तामिळ, पंजाबी, मल्याळी, कोकणी भाषी असा कुठलाच फरक केला नाही. त्यांनी हे भाजपाचे मतदार आहेत, काँग्रेसचे समर्थक आहेत की समाजवादी पार्टीचे साथीदार आहेत, हेही बघितले नाही. हत्या झालेल्यांची केवळ एकच चूक होती की त्यांनी हिंदू धर्मात जन्म घेतला होता, ते गैरमुस्लिम होते. एका तरुण नवविवाहितेच्या पतीच्या डोक्यात, तो केवळ हिंदू आहे म्हणून गोळ्या घातल्या गेल्या. दहशतवाद्यांच्या हल्ल्याला भारत पहिल्यांदाच सामोरा जात आहे, अशी परिस्थिती नाही. भारताने जगाला पाकिस्तानच्या मातीतून जन्म घेणाऱ्या दहशतवादाबाबत आधीच सजग केलेले आहे. यातूनच पाकिस्तान एकटा पडला असून, त्याची अर्थव्यवस्था डळमळीत झाली आहे. आपल्याप्रमाणेच भारतही खिळखिळा व्हावा, ही त्यांची इच्छा असली तरी ती कधीही पुरी होणारी नाही. दहशतवादी हल्ल्याच्या धक्क्यातून बाहेर पडून भारत पुन्हा एकदा त्याविरुद्धचा लढा अधिक प्रखर करणार आहे. जिहाद्यांना कायमचे ठेचले जावे, हीच तमाम हिंदूंची मागणी आहे आणि ती नक्की पूर्ण होईल, याची खात्री देणाऱ्या हालचाली सुरू आहेत.


## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा

आजघडीला आपला देश संक्रमणावस्थेतून जात आहे. विविध आघाड्यांवरच्या प्रगतीचा किंवा विकासाचा वेग किंचित मंदावल्यासारखा दिसतो आहे खरा. मंदीचे ढग अजूनही क्षितिजावर रेंगाळत आहेत, ते पूर्णपणे दिसेनासे झालेले नाहीत. पण सगळेच चित्र निराशाजनक नक्कीच नाही. विकासाचा, वाढीचा, उत्पादनाचा वेग मंदावला आहे, परंतु थांबलेला नाही. ही अवस्था लवकरच जाईल. जगात अशा रीतीने चिरंतन किंवा शाश्वत काहीही नसते 'वसुधैव कुटुंबकम' ही आपली संस्कृती असून, देशाच्या कामगिरीचा प्रभाव सध्या संपूर्ण जगावर पडत आहे. जगाच्या कल्याणासाठी भारताचे मोठे योगदान आहे. १२ मे २०२० रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'आत्मनिर्भर भारत' अभियानाची हाक दिल्यापासून विविध प्रसार माध्यमांमधून त्याबाबत चर्चा सुरू आहे. स्वावलंबी भारत अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, २१ व्या शतकातील तंत्रज्ञानाद्वारे चालवलेल्या व्यवस्थांवर आधारित पद्धत, व्हायब्रंट डेमोग्राफी (युवा सामर्थ्य) आणि मागणी या पाच स्तंभांवर उभा असेल. याद्वारे आमच्या मागणी आणि पुरवठा साखळीची ताकद संपूर्ण क्षमतेसाठी वापरली जावी, अशी अपेक्षा आहे. सध्याच्या वैश्विकीकरणाच्या जमान्यात अर्थातच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय अशी कप्पेबंदी करता येणार नाही. जागतिक पुरवठा साखळीत आपल्याला महत्त्वाची भूमिका निभावता येईल, अशी बारा क्षेत्रे अधोरेखित केली गेली आहेत. अन्न प्रक्रिया, सेंद्रिय शेती, लोह, अल्युमिनियम आणि तांबे, कृषी-रसायने, इलेक्ट्रॉनिक्स, औद्योगिक यंत्रसामग्री, फर्निचर, चर्मोद्योग, ऑटोमोबाईल पार्ट्स, वस्त्रोद्योग आणि मुखावरणे, सॅनिटायझेशन आणि वेंटिलेटर्स ही ती क्षेत्रे आहेत.

संगणकापासून संरक्षण उत्पादनांपर्यंत आपण आत्मनिर्भर झालो, 'मेक इन इंडिया'चा आग्रही पुरस्कार करत स्वतःच्या पायावर उभे राहिलो, तर भविष्यात उद्भवू शकणाऱ्या सर्व पेचप्रसंगांना यशस्वीपणे तोंड देऊ शकू. ऊर्जा, पाणी, संरक्षण उत्पादन, तंत्रज्ञान, औषध निर्माण अशा अनेक क्षेत्रांमध्ये आपण आणखी आत्मनिर्भर होण्याची गरज आहे. त्यासाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करावे लागेल. स्थानिक मनुष्यबळाची मानसिकता बदलावी लागेल आणि त्यांनी नवी कौशल्ये आत्मसात करावी लागतील. या दिशेने प्रयत्न करणे हा आत्मनिर्भर होण्यासाठीच्या धडपडीचाच भाग ठरेल. आपण एक आर्थिक महासत्ता होण्याचा प्रयत्न करू आणि या मोहिमेत आपले लढवय्ये असतील हे कुशल मोहरे. माझ्या दृष्टीने आयटी या शब्दप्रयोगाचा अर्थ आहे इंडियाज टॅलेंट. देशाची वाढती लोकसंख्या ही पहिलेपासून एक फार मोठी समस्या मानली गेली असून त्यानुसार, लोकसंख्या काबूत ठेवण्यासाठी २५-३० वर्षांपूर्वी कुटुंब नियोजन, नसबंदी शस्त्रक्रिया वगैरे उपायही केले गेले. त्या काळातली विचारप्रणाली वेगळी होती. इतक्या मोठ्या लोकसंख्येला शिक्षण आणि प्रशिक्षण देऊन जागतिक पातळीवर आर्थिक सत्ता बनण्यासाठी करता येईल हे फारसे कोणाला सुचले नाही.



आज मात्र वेगळ्या दिशेने विचार करून आपल्याकडे भरपूर प्रमाणात असलेल्या मनुष्यबळाचा योग्य रीतीने वापर करण्याची वेळ आली आहे. तरूणवर्गाची इतकी मोठी संख्या असलेले फारच थोडे देश जगात आहेत. जगातील बहुसंख्य देशांमधल्या नागरिकांचे सरासरी वयोमान वाढत चालले असून झपाट्याने मध्यमवयीन बनणाऱ्या या जगातला तरुणाईचा फार मोठा साठा आपल्याकडे आहे. ही फार महत्त्वाची जमेची बाजू आहे. या तरुण वर्गाला योग्य प्रशिक्षण दिले गेले की त्यांच्याकडून देशाच्या अर्थकारणात मोठे सकारात्मक बदल घडवून आणता येतीलच, शिवाय हे तरुण-तरुणी जागतिक पातळीवर काम करतील तेव्हा भरपूर पैसा कमावतील आणि त्यापैकी मोठा हिस्सा, बचतीच्या रूपाने, भारतात परत पाठवतील. यामुळे भारताचे सकल उत्पन्न म्हणजेच जीडीपी तसेच उत्पादकताही वाढेल आणि इथल्या तरुण वर्गाच्या निर्मितिक्षम मनाला संधीही उपलब्ध होतील. आज भारतात दिसणाऱ्या परिवर्तनांमध्ये आणि घडामोडींमध्ये या मानवी भांडवलाचा फार मोठा हिस्सा तर आहेच, परंतु महत्त्वाचे म्हणजे गेल्या काही वर्षांमधील एकंदर अस्थिर स्थितीमधून पुन्हा जोमाने वर येण्यासाठी देशाला या जोमदार, चळवळ्या लोकांचाच उपयोग होणार आहे. माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार, जैवतंत्रज्ञान, आरोग्य... संपूर्णपणे कात टाकलेल्या किंवा नव्याने वर आलेल्या या क्षेत्रांकडे नजर टाका, म्हणजे आपल्याला नक्कीच फरक जाणवेल.

आज प्रस्थापित उद्योगक्षेत्रांमध्येही नवे धडाडीचे उद्योजक येऊन अभूतपूर्व यश मिळवत आहेत. मुख्य म्हणजे आजच्या या उद्योजकांना जागतिकीकरण, स्पर्धा इत्यादींची भीती वाटत नाही. उलट, पूर्वजांच्या सुरक्षित कोशांमधून आणि बंद किल्ल्यांमधून बाहेर पडून ते आज जगातल्या विविध कंपन्या धडाक्याने विकत घेत आहेत किंवा त्यांच्याशी आर्थिक-तांत्रिक सहकार्य करून आत्मविश्वास आणि दूरदृष्टीने गुंतवणूक करत आहेत. आज येथील आयटी उद्योगाच्या विस्तारामुळे भारताला आशियातील सिलिकॉन व्हॅली मानले जाते ते उगीच नाही. आपल्याला सर्वप्रथम शिक्षणाबाबतची, विशेषतः उच्च शिक्षणाबद्दलची पारंपरिक विचारपद्धती टाकून देऊन शिक्षणाला मुक्त करावे लागेल. बदलत्या काळानुसार शिक्षणपद्धतीही लवचीक आणि बदलत्या गरजा वेगाने सामावून घेणारी असायला हवी. जागतिकीकरणाचे फायदे हवे असतील तर आपल्या मुला-मुलींना जागतिक पातळीवर वापरल्या जाणाऱ्या भाषा शिकवण्याचे काम युद्धपातळीवर हाती घ्यावे लागेल. जागतिक पातळीवरील रोजगारांची चाहूल लागली की आपल्याकडील युवकवर्ग इंग्लिश, स्पॅनिश, फ्रेंच, जपानी यासारख्या भाषा शिकायला फक्त तयार होतील असे नव्हे, तर उत्सुक बनतील. शिक्षण म्हणजे शाळा-कॉलेज, घोकंपट्टी आणि अखेर पदवी हे आपल्या मनावर आतापर्यंत कोरलेले चित्र पुसण्याची आणखी एक पायरी आपल्याला येत्या काळामध्ये ओलांडावी लागेल. शिक्षणाचे मोठ्या प्रमाणात संगणकीकरण झाल्यास शिक्षणाच्या किंवा शिक्षकाच्या दर्जाबाबतची मोठी चिंता तर मिटेलच, शिवाय शिक्षण देण्या-घेण्याच्या वेगामध्येही बदल होतील. शालेय शिक्षणाची आज आपण बारा वर्षे मानतो, परंतु तेवढेच शिक्षण नवीन तंत्राने आठ वर्षांमध्ये देता येईल. आता संगणकीकृत दूरशिक्षणाला मोठी मागणी येत असून या मार्गाने देशभरातल्या दूरदूरच्या हजारो विद्यार्थ्यांना, वाजवी किमतीत, उच्च शिक्षणाकडे वळणे शक्य येईल. शिकलेल्या लोकांचे आणि रोजगारांचे प्रमाण वाढले आणि त्यातून सर्वांना पैसा मिळू लागला की भारतातल्या एकंदर सामाजिक वातावरणात फरक पडेल, शांतता नांदेल आणि एकी वाढेल. देशातील सर्वच लोकांच्या हाती पुरेसा पैसा खेळू लागला की ते बाहेरील फुटीरतावादी शक्तींना बळी पडणार नाहीत. देशात येऊ घातलेल्या या परिवर्तनाची दिशा समजून घेऊन पालकांनी मुला-मुलींना शिक्षण देण्याबाबतच्या स्वतःच्या दृष्टिकोनात योग्य ते बदल करायला हवेत. त्यांना पुस्तकातले किडे न बनवता हरहुन्नरी होऊन जगात वावरण्यासाठी लागणारी सर्व कौशल्ये आत्मसात करू द्यायला हवीत.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# खाजगी बाबी शेअर करताना!

सुलभ, सोप्या प्रक्रिया आणि अत्यल्प दरात मिळणाऱ्या इंटरनेट सुविधांमुळे जग अगदी एका क्लिकवर आले आहे. स्मार्ट फोनमुळे माहिती शेअर होण्याच्या प्रकारात कमालीची वाढ होताना दिसून येत आहे. खाजगी आयुष्य आता समाज माध्यमांमुळे खाजगी राहिलेले नसून ते प्रत्येक सेकंदाला सार्वजनिक होऊ लागले आहे. हेच सोशल ट्रेंड्स आता धोक्याचे ठरू लागले आहे. मोबाईल वापरताना फेसबुक, इन्स्टाग्राम आणि ट्युटरसह इतरही ॲपचा वाढलेला वापर आता चिंताजनक ठरत आहे. त्यातच एआयसरख्या प्रकारामुळे एखाद्या गोष्टीची, फोटोची वास्तविकताच बदलली जात आहे. खरे काय, खोटे काय हे देखील एआयच्या वापरामुळे कळायला मार्ग नाही. निश्चितच काही ॲप कामाचे आहेतही मात्र काही ॲप असे आहेत की, जी तुमचा डेटा इतरत्र वापरू लागले आहेत. आणि याची साधी भनक सुद्धा आपल्याला नाही. आपण समाज माध्यमावर शेअर केलेला डेटा आता प्रायव्हसी नियमाचा भंग करून तो इतरत्र सर्रास आपल्या फायद्यांसाठी सायबर क्रिमिनल वापरू लागले आहेत. रोज स्मार्ट मोबाईलमध्ये नवनवीन ॲप एंटर होतात आपणही त्या ॲपची कुठलीही चौकशी न करता त्या ॲपला आपला डेटा वापरण्याची न कळत परवानगी देतो. आणि हीच खरी डोकेदुखी आहे. आपल्या अजाणतेमुळे एखाद्या वेळेस आपले आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते. याची कल्पना सुद्धा समाज माध्यमांचा अति वापर करणाऱ्यांना माहिती नाही. समाज माध्यमांवर कुठली माहिती शेअर करायची आणि कुठली करू नये याचे भानसुद्धा समाज माध्यम वापरणाऱ्यांना नसल्याने अनेक अनुचित प्रकार घडू लागले आहेत. आपण समाज माध्यमावर शेअर करणारी माहिती सुरक्षित आहे का, तिचा कुठे वापर केला जात आहे का हे तपासण्याचा बहुतांश लोक प्रयत्नसुद्धा करीत नाही. काही दिवसांपूर्वी जगभरात आलेली घिबली इमेजची लाट भारतातही येऊन गेली. गंमत म्हणून लोकांनी आपले घिबली प्रकारातील ॲनिमेटेड चित्र समाज माध्यमावर सर्व मान्य केले. यापूर्वी सुद्धा असे अनेक प्रयोग येऊन गेले आहेत. परंतु आपण दिलेल्या या माहितीचा एआयच्या प्रशिक्षणासाठी उपयोग केला जातो हे वास्तव आता पुढे आले आहे. विशेष म्हणजे आपली माहिती यासाठी वापरली जाते हे बहुतांश भारतीयांना माहीतच नसल्याचेही सत्य उघडकीस आले आहे. मुबलक मिळणाऱ्या इंटरनेट डेटामुळे रील्स, फेसबुक, इन्स्टाग्राम हाताळणाऱ्यांची संख्या दिवसागणिक वाढू लागली आहे. तासन्तास लोक रील बनविण्यासाठी वेळ वाया घालवू लागले आहे. समाजामध्ये दोन वर्ग तयार झाले आहेत. एक रील बनवून समाज माध्यमावर त्या रील्स व्हायरल करणारा वर्ग आणि दुसरा म्हणजे महत्त्वाची कामे सोडून तासन्तास त्या रील्स बघत बसलेला वर्ग. या रील्सच्या नावाखाली अनेक वल्गर प्रकारही समाज माध्यमांवर व्हायरल होऊ लागले आहेत. काहीच दिवसांपूर्वी आलेला घिबली एआय ट्रेंड हा देखील यातलाच प्रकार आहे. याचा उपयोग करून लाखो भारतीयांनी आपले घिबली स्टाईल फोटो तयार केले. मात्र या प्रकारातून स्वतःची माहिती एआयला देऊन या माहितीच्या जाळ्यात अडकत असल्याचे लोकांच्या लक्षात येत नाही. एआय टूल्सला प्रशिक्षण देण्यासाठी प्रचंड डाटाची गरज असते. एआयच्या चॅट जीपीटीला ३०० अब्ज शब्दांपेक्षा जास्त डेटावर प्रशिक्षित करण्यात आले आहे. यात संकेतस्थळे, समाजमाध्यमे, पुस्तके यातून गोळा केलेली माहिती आहे. भारतातील जनरल डाटा प्रोटेक्शन रेग्युलेशन कायदे कठोर होण्याची गरज तज्ज्ञांनी वेळावेळी व्यक्त केली आहे. मात्र याकडे कुणाचेच लक्ष नाही. इंटरनेट इन इंडिया २०२४ च्या अहवालानुसार भारतात इंटरनेट वापरकर्त्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. परंतु बहुतेक वापरकर्त्यांना त्यांचा डेटा ऑनलाईन कसा वापरला जात आहे याची माहितीच नाही. ५९ टक्के वापरकर्त्यांना त्यांच्या डेटाचे काय होते याबद्दल काहीही माहिती नाही. तर ग्राहक अहवाल २०२३ नुसार ७० टक्के भारतीयांना त्याची माहिती कुठे आणि कशाप्रकारे वापरली जाते याबद्दल काहीच माहिती नाही. याच प्रकारामुळे आता डेटा प्रायव्हसी सॉफ्टवेअरची बाजारात प्रचंड वाढ होत आहे. या सॉफ्टवेअरचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. प्रत्येकाला आपला खाजगी डेटा सुरक्षित राहावा यासाठी डेटा प्रायव्हसी सॉफ्टवेअरची गरज भासू लागली आहे. त्यामुळे या सॉफ्टवेअरचा २०२३ मध्ये बाजार २.७६ अब्ज डॉलर्स होता. २०२४ मध्ये तो वाढून ३.८४ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतका झाला. २०३२ पर्यंत ही बाजारपेठ ४५.१३ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे आपला डेटा किती महत्त्वाचा आहे, तो कसा व्हायरल होतो, सोशल मीडियावर काय अपलोड करावे, काय करू नये, इंटरनेटच्या आहारी जावे की, जाऊ नये हे आता उपयोगकर्त्यांनीच ठरविले पाहिजे.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# गांधी कुटुंबाविरुद्ध दाखल गुन्हे

नॅशनल हेराल्ड प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह आणखी काही नेत्यांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले. या पाठोपाठ गांधी घराण्याचे जावई आणि काँग्रेस खासदार प्रियांका वढेरा यांचे पती रॉबर्ट वढेरा यांना हरयाणातील शिकोहपूर येथील भूखंड घोटाळ्याप्रकरणी ईडीने चौकशीसाठी बोलावले. यामुळे सध्या गांधी घराण्याचे ग्रह फिरल्याचे म्हणायला हरकत नाही.

नॅशनल हेराल्ड प्रकरणात ९८८ कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप गांधी कुटुंबावर आहे. या प्रकरणी दाखल झालेल्या आरोपपत्रात सोनिया गांधी या आरोपी क्रमांक एक तर राहुल गांधी आरोपी क्रमाक दोन आहे. सॅम पित्रोदा, सुमन दुबे आणि अन्य अर्धा डझन आरोपीही या प्रकरणात आहे. नॅशनल हेराल्ड प्रकरणात आता आरोपपत्र दाखल झाले असले तरी जवळपास १३ वर्षांपासून हे प्रकरण सुरू आहे. २०१२ मध्ये डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांनी पातियाळा हाऊस न्यायालयात एक तक्रार केली होती. त्यात यंग इंडिया लिमिडेट या कंपनीच्या माध्यमातून गांधी कुटुंबाने नॅशनल हेराल्डची दिल्ली, मुंबई आणि लखनौ येथील २ हजार कोटी रुपयांची संपत्ती हडपल्याचा आरोप केला होता.

केंद्रात संपुआचे सरकार असतानाच डॉ. स्वामी यांनी या प्रकरणाची तक्रार केली होती. योगायोग म्हणजे २६ जून २०१४ ला न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेत चौकशीचा आदेश दिला. तोपर्यंत केंद्रात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील रालोआचे सरकार आले होते. सोनिया गांधी यांना राजकारणात पदार्पण करून जवळपास २७ वर्ष होत आहे, या २७ वर्षांत त्यांच्यावर अनेक प्रकारचे आरोप झाले, पण आरोपपत्र मात्र हे पहिलेच आहे. विशेष म्हणजे सोनिया गांधी यांचा राजकारणातील सूर्य मावळत असताना त्यांच्यावर हे आरोपपत्र दाखल झाले आहे. राहुल गांधी यांच्यावर जवळपास दोन डझन प्रकरणात गुन्हे दाखल आहेत. मात्र त्यांच्याहीविरुद्ध दाखल झालेले हे पहिलेच आरोपपत्र म्हणावे लागेल. या प्रकरणात शिक्षा झाली तर दोघांनाही आपली खासदारकी गमवावी लागणार आहे.

प्रियांका वढेरा यांच्याविरुद्ध सध्या एकही गुन्हा दाखल नसला तरी त्यांचे पती रॉबर्ट वढेरा यांच्याविरुद्ध मात्र दोन गुन्हे दाखल आहेत आणि दोन्ही गुन्हे भूखंड घोटाळ्याचे आहेत. ईडी सध्या रॉबर्ट वढेरा यांची जी चौकशी करत आहे, ते प्रकरण २००८ चे आहे. तेव्हा हरयाणात काँग्रेसचे सरकार होते आणि भूपेंद्रसिंह हुडा मुख्यमंत्री होते. गुरुग्रामच्या शिकोहपूर गावातील ३.५ एकर जमीन वढेरा यांच्या स्कायलाईट हॉस्पिटॅलिटी लिमिटेडने ओंकारेश्वर प्रॉपर्टीजकडून फेब्रुवारी २००८ मध्ये फक्त ७.५ कोटी रुपयांत विकत घेतली. काँग्रेसचे सरकार असल्यामुळे काही तासांतच या जमिनीचे म्युटेशन करण्यात आले. नंतर या जमिनीवर व्यावसायिक कॉलनी विकसित करण्याबाबतचे लेटर ऑफ इंडेंटही स्कायलाईट हॉस्पिटॅलिटीला देण्यात आले. जून २००८ मध्ये ही जमीन वढेरा यांच्या कंपनीने ५८ कोटी रुपयांत डीएलएफ युनिव्हर्सल लिमिटेड या कंपनीला विकली . म्हणजे काही न करता चार महिन्यांत वढेरा यांच्या कंपनीने ७.५ कोटींच्या बदल्यात ५८ कोटी रुपये काही न करता कमावले. सप्टेंबर २०१८ मध्ये या प्रकरणात वढेरा, तत्कालीन मुख्यमंत्री हुडा अन्य काही लोकांविरुद्ध पोलिस तक्रार करण्यात आली.

बिकानेर भूखंड घोटाळ्यातही रॉबर्ट वढेरा आरोपी आहेत. बिकानेरच्या कोलायम भागात २७५ बिघा जमीन स्कायलाईट हॉस्पिटॅलिटीने अशीच बेकायदेशीर पद्धतीने विकत घेतली. ही जमीन महाजन फिल्ड फायरिंग रेंजमुळे विस्थापित झालेल्या लोकांसाठी राखीव होती. ती जमीन वढेरा यांच्या कंपनीने राज्यात काँग्रेसचे सरकार असल्यामुळे हडपली. नंतर वाद वाढल्यावर राजस्थान सरकारला हा सौदा रद्द करावा लागला, त्यामुळे वढेरा यांच्या कंपनीने ही जमीन विकून टाकली. या प्रकरणात वढेरा यांच्यासोबत त्यांची आई मॉरिन वढेराही आरोपी आहेत. २०१५ मध्ये राजस्थान पोलिसांनी याप्रकरणी एफआयआर दाखल केला, नंतर हे प्रकरण सीबीआयकडे सोपवण्यात आले. या प्रकरणात वढेरा आणि त्यांच्या आईविरुद्ध अटक वॉरंट काढण्यात आला. पण न्यायालयाने या अटकेला अंतरिम स्थगिती दिली. पाकिस्तानात बेनझीर भुत्तो यांचे पती आसिफ अली झरदारी यांची प्रतिमा मिस्टर टेनपरसेंट अशी तयार झाली होती. रॉबर्ट वढेरा यांची वाटचालही तशीच होती. सुदैवाने २०१४ मध्ये काँग्रेसचे सरकार जाऊन केंद्रात नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यामुळे रॉबर्ट वढेरा विविध राज्यांत आणखी जमिनी आणि भूखंड हडपू शकले नाही.

राहुल गांधींवर भ्रष्टाचाराच्या आरोपात दाखल झालेले हे पहिलेच आरोपपत्र असले तरी त्यांच्यावर मानहानीच्या प्रकरणात अनेक गुन्हे दाखल आहेत. २०१४ मध्ये राहुल गांधी यांच्यावर अशा प्रकारचा पहिला गुन्हा दाखल झाला, गांधी यांनी महात्मा गांधी यांच्या हत्येच्या प्रकरणात रा. स्व. संघाचा हात असल्याचा बिनबुडाचा तसेच खोडसाळ आरोप केला होता. या प्रकरणात त्यांच्याविरुद्ध भिवंडी न्यायालयात खटला सुरू आहे. २०१६ मध्ये त्यांच्यावर गुवाहाटी न्यायालयात असाच आणखी एक खटला दाखल झाला. २०१७ मध्ये पत्रकार गौरी लंकेश हत्या प्रकरणात राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा संघावर खोडसाळ आरोप केला, त्यामुळे त्यांच्यावर पुन्हा एकदा गुन्हा दाखल करण्यात आला. २०१८ मध्ये राहुल गांधी यांच्याविरुद्ध तीन गुन्हे दाखल करण्यात आले. पंतप्रधान मोदी तसेच भाजपा कार्यकर्त्यांविरुद्ध वादग्रस्त विधान केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध हे गुन्हे दाखल आहे, यातील दोन गुन्हे उत्तरप्रदेशात तर एक गुन्हा झारखंडमध्ये आहे. २०१९ मध्ये राहुल गांधी यांच्याविरुद्ध सर्वाधिक म्हणजे ५ गुन्हे दाखल झाले. सर्व चोर मोदी आडनावाचेच का असतात, असा अतिशय वाह्यात प्रश्न राहुल गांधी यांनी विचारला होता.

या प्रकरणात त्यांच्यावर दिल्ली, रांची, सुरत, पाटणा आणि अहमदाबादमध्ये पाच गुन्हे दाखल झाले. सुरतमधील प्रकरणात न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा दिल्यामुळे राहुल गांधी यांना २०२३ मध्ये आपले लोकसभा सदस्यत्व गमवावे लागले होते. खासदार म्हणून मिळालेले सरकारी निवासस्थानही त्यांना सोडावे लागले होते. २०२२ मध्ये राहुल गांधी यांच्यावर कॉपी राईट कायद्याचे उल्लंघन केल्याच्या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला. याचवर्षी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर अवमानजनक टिप्पणी केल्याच्या आरोपात गांधीवर लखनौमध्ये आणखी एक गुन्हा दाखल झाला,

२०२४ मध्ये राहुल गांधी यांच्यावर ४ गुन्हे दाखल करण्यात आले. भारत जोडो यात्रा आसाममध्ये असताना हिंसा भडकवण्याचा प्रयत्न केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. या वर्षी बंगळुरूत भाजपा कार्यकर्त्यांविरुद्ध वादग्रस्त विधान केल्याच्या प्रकरणात त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. राहुल गांधींविरुद्धचे सर्व गुन्हे हे बेताल बडबडीचे आहे. उचलली जीभ लावली टाळूला या पद्धतीने बोलत राहुल गांधी स्वतःला आणि काँग्रेस पक्षलाही अडचणीत आणत असतात. तरीपण त्यांना शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते.

९८८१७१७८१७

## सडलेल्या मेंदूचा माणूस

मंगळवारी पहलगाम येथे इस्लामी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या नृशंस हल्ल्यासंदर्भात विश्वप्रवक्ते संजय राऊत यांनी जे अकलेचे तारे तोडले आहेत, त्यात त्यांनी म्हटले आहे की, मोदी सरकारने काश्मीरवर स्वतःचं नियंत्रण ठेवण्यासाठी काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देणारं कलम ३७० हटवलं, जम्मू-काश्मीरला केंद्रशासित प्रदेश बनवलं. त्यामुळे काल पहलगाममध्ये जो दहशतवादी हल्ला झाला त्याची पूर्ण जबाबदारी ही केंद्र सरकारची आहे!. ३७० कलम हटविण्याआधीही दहशतवाद्यांच्या अशा कारवाया चालूच होत्या, हे विद्वान राऊत यांना माहीत नाही का? गृहमंत्री अमित शाह यांच्यावरदेखील त्यांनी गरळ ओकली आहे. यावरून हे स्पट दिसून येते की, संजय राऊत हा विकृतीने पछाडलेला, वैफल्यग्रस्त आणि सडलेल्या मेंदूचा माणूस आहे. फडणवीस सरकारने त्यांच्या सुरक्षेत वाढ करावी, अन्यथा या राऊतांना देशभक्तांकडून चोप मिळण्याची शक्यता आहे. त्यांचे पक्षप्रमुख आणि पक्षप्रमुखांचे चुलतबंधू सध्या हवा खाण्यासाठी परदेशात पर्यटनासाठी गेले आहेत, येथील हवा त्यांना मानवो!

**अविनाश वाघ**/९३२२९९६२४३

## आई-बाबा : आयुष्याचे चॅट-जीपीटी

आपल्या आयुष्यात रोज नवनवीन प्रश्न निर्माण होतात. शालेय अभ्यासापासून करीअरच्या निर्णयांपर्यंत, दैनंदिन समस्यांपासून जीवनमूल्यांपर्यंत. या सगळ्या प्रश्नांची उत्तरं शोधायला आज आपण चॅट-जीपीटीसारख्या तंत्रज्ञानाकडे धाव घेतो. पण विचार करा, आपल्याकडे हे सगळं आधीपासूनच होतं- ते म्हणजे आई-बाबा. आई-बाबा हेच खरं तर आपल्या आयुष्याचे चॅट-जीपीटी आहेत. एक असा मार्गदर्शक स्रोत, जो नेहमी उपलब्ध असतो, निःस्वार्थपणे, कायम आपल्या भल्यासाठीच उत्तरं देणारा. आपल्याला काही हवं असेल, एखादी गोष्ट समजून घ्यायची असेल, निर्णय घ्यायचा असेल तर आपण अगोदर आई-बाबांकडेच जातो. आपल्याला माहीत असतं, त्यांच्या उत्तरात अनुभवाचं वजन आहे, प्रेमाची जोड आहे आणि चुकू न देण्याची नितांत काळजी आहे. लहानपणापासून आजवर शाळेची तयारी असो की जीवनातला पहिला मोठा निर्णय, आईबाबा कायम आपल्या पाठीशी उभे राहिले आहेत. त्यांनी आपल्याला चालायला शिकवलं, पण चालताना ठेचकाळल्यावर त्यांनीच उचलून पुन्हा चालायला शिकवलं. त्यांनी आपली स्वप्नं ओळखली, कधी मार्ग दाखवला तर कधी मार्गातले काटे स्वतःच्या हाताने दूर केले.

उदाहरणच घ्या, सणवार आले की, आपल्याला सगळं माहिती असतं का? गुढीपाडवा, दिवाळी, संक्रांत, होळी... कुठल्या दिवशी काय करायचं, काय बनवायचं, कुठल्या पद्धतीने पूजा करायची? हे सगळं कोण सांगतं? आपली आईच ना! तिच्या हातच्या चविष्ट पदार्थांपासून ते तिच्या आठवणींच्या गोष्टींपर्यंत सणाला खरी रंगत येते आणि बाबा ते तर नेहमी आपल्या मागे उभे, सगळं व्यवस्थित पार पाडण्यासाठी, घरात गोंधळ न होता उत्सव साजरा व्हावा यासाठी धावपळ करीत असतात. चॅट-जीपीटी माहिती देतो, पण आई-बाबा समजून घेतात. एकदा आई-बाबांशी शांतपणे बोलून बघा. कदाचित उत्तरं आधीच त्यांच्या डोळ्यांत लपलेली असतील.

**अनुश्री पातूरकर**/९६०७१३६७५७

## वाचक पत्रे

## बुडत्याचा पाय खोलात



महाराष्ट्रात भाजप विजयी झालाच कसा? : राहुल गांधी, ही बातमी वाचून करमणूक झाली आणि संतापही आला. राहुल गांधी ही राजकारणातील अत्यंत अडाणी, बालिश, अहंकारी, उर्मट आणि तिरस्करणीय व्यक्ती आहे, हे काँग्रेसचे नेतेही जाणून आहेत. पण तरीही नाईलाजाने त्यांना राहुल गांधींशिवाय पर्याय उपलब्ध नाही हे सुद्धा त्यांना ठावूक आहे. आपला पक्ष सातत्याने पराभूत होतो आहे आणि आपल्याच नेतृत्वाखाली पक्षाने नव्वदहून अधिक निवडणुकांत पराभवाची चव चाखली आहे याचे काहीही वैषम्य त्यांना वाटत नाही. आपला तोंडाळपणा, वाचाळपणा आणि आपला गर्व पक्षासाठी घातक ठरतो आहे हे त्यांच्या गावीही नाही.

विदेशात जाऊन भारताची, लोकशाहीची, भारतीय संस्थांची यथेच्छ बदनामी करणे, हा राहुल गांधींचा आवडता छंद आहे. त्यांच्यात असे कोणते गुण दिसले म्हणून या विदेशी संस्था त्यांना भाषण करण्यास बोलावतात हे ठावूक नाही. मात्र अशी बदनामी करताना ते सारासार विचार करत असल्याचे कधीही, कोठेही जाणवत नाही. भारतातील निवडणूका जिंकणे एवढे सोपे असते तर भाजप आणि निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीत भाजपला एकहाती बहुमत दिले नसते का? महाराष्ट्रातील निवडणुकीत उबाठा सेना, राशप गट यांचे धुरंधर नेते त्यांना सोडून गेलेले असताना आणि महाराष्ट्रात काँग्रेसचे नगण्य अस्तित्व असताना आपल्याला सत्ता मिळेल, ही अपेक्षा करणेच बालिशपणाचे होते. मात्र पराभव खुल्या दिलाने स्वीकारण्याची तयारी नसल्यामुळे आणि केलेल्या चुकांवर आत्मपरीक्षण करण्याची पद्धत नसल्यामुळे काँग्रेसचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. सहानुभूतीच्या लाटेवर निवडणुका जिंकण्याचा काळ इतिहासजमा झाला आहे हे काँग्रेसने लक्षात ठेवले पाहिजे.

**शिवराम वैद्य**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महत्वाचे...



## भीमसैनिकांच्या वतीने पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांचा सत्कार

**सोलापूर, दि.२३ एप्रिल-**

बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळच्या वतीने सोलापूर शहरातील भीम जयंती मिरवणूक सोलापूर शहर पोलीस दलाच्या वतीने शांततेत पार पाडल्याबद्दल पोलीस आयुक्त एम राजकुमार, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, दिपाली काळे, अजित बोराडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाचे विश्वस्त व उत्सव कमिटीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री वयोश्री योजना शिबिर आजपासून सुरू होणार

**सोलापूर, दि.२३ एप्रिल-**

राज्यातील ६५ वर्ष वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने उपकरणे खरेदी करण्याकरिता तसेच मनः स्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इ. द्वारे त्यांचे मानसिक तथा कौटुंबिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी राज्यात 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राबविण्यात येते. या योजनेतील सोलापूर जिल्हयातील १५ हजार ७१६ लाभार्थ्यांचे आधार अपडेट नसल्यामुळे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात लाभ वितरित झालेला नाही. त्यामुळे दिनांक २४ ते ३० एप्रिल या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन सात रस्ता, सोलापूर येथे शिबिराचे आयोजन करण्यात आलेले असून, लाभार्थ्यांनी विहीत कालावधीत आधारकार्डसह कार्यालयीन वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.


## रस्त्याच्या कामाप्रकरणी कारवाईसाठी धरणे आंदोलनाचा इशारा

**सोलापूर, दि.२३ एप्रिल-**

मोहोळ तालुक्यातील मौजे पोखरापुरात रस्त्याचे काँक्रिटीकरण निकृष्ट दर्जाचे केल्याचा आरोप करत याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करावी या मागणीसाठी गुरुवार दि. २४ एप्रिल २०२५ रोजी मोहोळ पंचायत समिती कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा संतोष नरुटे यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे. या गावात २०२० ते २०२५ या सालामध्ये विविध योजनेअंतर्गत विकास कामे मोठ्या प्रमाणात झाली मात्र यामध्ये भ्रष्टाचार झाला आहे असा आरोप करत संबंधित विभागाकडे तक्रारी अर्ज दिला होता. संबंधित ठेकेदार कंपनीच्या विरोधात कोणतीही कारवाई झाली नाही. यामुळे आंदोलन करण्यात येणार असल्याचे संतोष नरुटे यांनी स्पष्ट केले. यावेळी अक्षय गायकवाड उपस्थित होते.

## रोटरी क्लब ऑफ सोलापूर हार्मनीची पुस्तक दान मोहीम पुन्हा सुरू

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**



रोटरी क्लब ऑफ सोलापूर हार्मनीने २३ एप्रिलपासून आंतरराष्ट्रीय पुस्तक दिनापासून पुस्तक दान मोहीम पुन्हा सुरू केली आहे. गतवर्षी रोटरी परिवारातर्फे २०० शाळांना लायब्ररीची कपाटे देण्यात आली होती. पुस्तक दान मोहिमेतून ५००० हुन अधिक पुस्तकांचे संकलन करून या शाळांना पुस्तके भेट दिली. विद्यार्थ्यांनी दिलेला वाचनाचा प्रतिसाद पाहून पुस्तक दान ही योजना पुन्हा सुरू केली आहे.
घरात न वाचली जाणारी, पण चांगल्या स्थितीत असलेली, प्रेरणादायी, शैक्षणिक व माहितीपूर्ण पुस्तके आमच्याकडे दान करा. आपल्या एका पुस्तकाने कोणाचंतरी भविष्य उजळू शकतं! एकतरी पुस्तक दान करा ते ठरेल कोणाची वाचन प्रेरणा! आम्ही ती पुस्तके गरजू विद्यार्थ्यांपर्यंत, शाळांपर्यंत, वाचनालयांपर्यंत पोहोचवू. हा एक ज्ञान सेतू आहे, असे क्लबचे अध्यक्ष अविनाश मठपती व सचिव भुमेश यनगंदूल यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी व पुस्तक दान करण्यासाठी ९३७०७३२१८० अथवा ९१६८८००९०० या नंबरवर संपर्क करा.

## बेशुध्दावस्थेत आढळून आलेल्या व्यक्तीचा उपचारापूर्वी मृत्यू

**सोलापूर :** जुना पूना नाका येथील गणपती मंदिराजवळ बेशुध्दावस्थेत आढळून आलेल्या व्यक्तीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. राजू यलप्पा वाघमारे (वय ४१, रा. जवळकर वस्ती, सोलापूर) असे व्यक्तीचे नाव आहे. बुधवारी सकाळी ९.१५ वाजता राजू हा बेशध्द अवस्थेत दिसून आला. त्यानंतर हवालदार शेळके यांनी बेशुध्द अवस्थेत त्यास सकाळी १० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले होते. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# ऑनलाईन वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांना मिळाले स्मार्टफोन अन् वॉच

### दुसरी सोडत ७ मे रोजी होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल -**

राज्यातील ७० टक्क्यांपेक्षा जास्त वीजग्राहक दरमहा ऑनलाईन वीजबिल भरतात. ऑनलाईनचा हा टक्का वाढविण्याच्या हेतुने महावितरणने 'लकी डिजीटल ग्राहक योजना' जाहीर केली होती. ७ एप्रिल रोजी या योजनेची पहिली सोडत (ड्रॉ) जाहीर झाली. यामध्ये बारामती परिमंडलातील ३०५ ग्राहकांना स्मार्टफोन व स्मार्टवॉच अशी बक्षिसे मिळाली असून, प्रत्येक उपविभाग पातळीवर विजेत्या ग्राहकांना बक्षिसांचे वाटप करण्यात आले आहे. पुढील दुसरी सोडत ७ मे रोजी होणार आहे.

बारामती परिमंडलात बारामती, सोलापूर व सातारा अशी तीन मंडल कार्यालये तर त्या अंतर्गत १३ विभाग, ६१ उपविभागीय कार्यालये आहेत. ज्यांनी १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या वर्षभरात ऑनलाईन वीजबिल भरलेले नाही अशा ग्राहकांसाठी ही योजना आहे. १ जानेवारी २०२५ ते ३१ मे २०२५ या कालावधीत ही योजना सुरु असून, सलग तीन किंवा त्यापेक्षा अधिक वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांना 'लकी डिजीटल योजनेचा' लाभ मिळणार आहे. विजेत्यांची नावे ७ एप्रिल रोजी संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन जाहीर करण्यात आली.

सोलापूर मंडलात अकलूज, बार्शी, पंढरपूर, सोलापूर ग्रामीण व सोलापूर शहर असे पाच विभाग तर २६ उपविभाग आहेत. प्रत्येक उपविभागातून पहिल्या क्रमांचे १, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकासाठी प्रत्येकी दोन विजेत्यांची निवड झाली.

ज्यातून पहिल्या क्रमांकासाठी २६ स्मार्टफोन, दुसऱ्या क्रमांकासाठी ५२ स्मार्टफोन आणि तिसऱ्या क्रमांकासाठी ५२ स्मार्टवॉच अशी एकूण १३० बक्षिसे ग्राहकांना मिळाली आहेत. प्रत्येक उपविभाग पातळीवर विजेत्या ग्राहकांना सन्मानित करुन बक्षिसांचे वाटप करण्यात आले आहे.

सोलापूर मंडलामध्ये ६८ टक्के हून अधिक वीज ग्राहक ऑनलाईन पध्दतीने वीज बिलाचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण आणखी वाढविण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन म्हणून लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील.

> **ग्राहकांनी ऑनलाईनला प्राधान्य द्यावे- धर्मराज पेठकर**
>
> ग्राहकांनी रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करावा, यासाठी महावितरणने .. हे संकेतस्थळ व महावितरण मोबाईल अँपची सुविधा ग्राहकांना २४ तास उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच देय रक्कमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीजबिल भरणा सूट सुद्धा दिली जात असल्याचे बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी सांगितले.



## सोलापुरातील सिग्नलची वेळ कमी करण्याची भारतीय जैन संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल -**

सोलापुरात तापमान थैमान घातलेले असताना सोलापुरातील सिग्नल दुपारपर्यंत चालू असतात त्यामध्ये ट्राफिक पोलिसांना व नागरिकांना दोघांनाही याचा त्रास सहन करावा लागतो. तरी सोलापुरातील सिग्नलची वेळ कमी करण्याची मागणी भारतीय जैन संघटनेने पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्याकडे केली आहे.

सोलापूरात सध्या उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे सिग्नलवर उभे असलेल्या लहान मुलांपासून वयोवृद्धापर्यंत त्रास होतो.महाराष्ट्रातील नागपूर सह अन्य शहरांमध्ये सिग्नलच्या वेळ कमी केल्या असून त्याच धर्तीवर भारतीय जैन संघटनेने सोलापुरातील सिग्नलची वेळ कमी करावी असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. यावेळी राज्य कार्यकारणी सदस्य श्याम पाटील, विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभुते, जिल्हाध्यक्ष देशभूषण वसाळे, जिल्हा उपाध्यक्ष कोमल पाचोरे, वालचंद पाटील,विक्रांत बशेट्टी, संजय गडदे, अशोक भालेराव, प्रशांत वर्धमाने यांची उपस्थिती होती.

## जिल्हा परिषद सहकारी पतसंस्था नंबर १ राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल -**

दिल्ली, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात व गोवा या राज्यातील पत संस्थेने केलेल्या विविध सामाजीक क्षेत्रात उल्लेखनिय काम केल्याबद्दल माहिती मागविली होती.

संस्थेने कोरोना काळात एक लाख एक हजार अकरा सॅनिटायझर्सच्या बाटल्या, सांगली येथील पुरग्रस्त शाळेस शालेय कीट, जिल्हा अधिकारी यांनी केलेल्या आवाहनानुसार अन्नधान्य वाटप , जिल्हा परिपदेच्या करोना दवाखान्यासाठी ५० कॉट, गादी, बेड शीट, चादरी यांचे वाटप व दिनदर्शिकेत सामाजीक समस्यावर आधारीत जन जागृती, संस्थेच्या अहवालात सामाजीक उपदेश, रक्टदान शिबिर, आरोग्य शिबिर या वर्षी संविधानास ७५ वर्षे पुर्ण झालेबददल सदरची माहिती कयू आर कोड मध्ये संस्थेच्या दिनदर्शिकेत प्रकाशित असे अनेक उपक्रम राबविले. याची जनसंपर्क अधिकारी राष्ट्रीय पुरस्कार वितरण समिती गोवा यांनी दखल घेऊन जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पत संस्था नियमित नं. १ सोलापूर या संस्थेस नामांकित घोषित केले. सदर पुरस्कार वितरण सोहळा दि. २७ एप्रिल रोजी गोवा येथील रविंद्र भवन साखळी येथे दुपारी १२ वाजता संपन्न होणार आहे. पुरस्कारामध्ये विशेष प्रमाणपत्र, सन्मान चिन्ह, म्हैसुर फेटा, चंदनाचा कायस्वरूपी हार व भारत सरकारचे केंद्रिय मंत्री यांचेकडून अभिनंदन पत्र प्रदान करण्यात येणार असल्याचे चेअरमण डॉ. एस. पी. माने यांनी या प्रसंगी सांगीतले. पत्रकार परिषदेस संस्थेचे मार्गदर्शक अशोक भोसले, व्ही. आर. गरड, व्ही. डी. नवले, प्रकाश शेटे, वी. टी. मोहिते, दयानंद परिचारक, व्हाईस चेअरमन सुरेश कुंभार, संचालक विष्णु पाटील, शहाजहान तांबोळी, श्रीधर कलशेटटी, तजमुल मुतवल्ली, विजयकुमार घेरडे, विशाल घोगरे, गजानन मारडकर, शिवानंद म्हमाणे, शिवाजी राठोड, किरण लालबोंद्रे, विकास शिंदे, चेतन वाघमारे, मृणालिनी शिंदे, स्वेता राऊत तज्ञ संचालक श्रीशैल देशमुख, नितीन शिंदे सचिव डी. एल. देशपांडे लेखनिक अशोक पवार, सुभाष काळे, नितीन येमुल, विनोद कदम आदी उपस्थित होते.

## विद्यापीठ परीक्षेत सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे तीन विद्यार्थी क्रमवारीत

### ३७४ पैकी १६७ जण डिस्टिंक्शनसह प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ प्रथम वर्षाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या निकालात एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाने यश संपादन करुन आपल्या उज्वल निकालाची परंपरा अबाधित ठेवली.

विद्यापीठ क्रमवारीत पहिल्या ११ मध्ये सिंहगड महाविद्यालयाच्या सय्यद झेद (९२.६७ टक्के) , प्रगती जाधव (९०.३३ टक्के), शुभम पेठे (९० टक्के) या तीन विद्यार्थ्यांचा समावेश आहे. आठ विद्यार्थ्यांनी १० पैकी १० जीपीए मिळवले आहे. ३७४ पैकी १६७ जणांनी डिस्टिंक्शनसह प्रथम श्रेणी मिळवली आहे. ४३ विद्यार्थ्यांनी ओ ग्रेड (उत्कृष्ट श्रेणी) मिळवला आहे. विद्यापीठ क्रम वारीत पहिल्या ११ मध्ये ३ विद्यार्थी सिंहगड सोलापूरचे आहेत.




मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागात (एसवाय बी टेक) रितेश साठे, धनश्री कोकाटे, इराफान सक्करगे, आदित्य बागेवाडी यांनी विद्यापीठ रॅकमध्ये यश मिळवले आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन विभागात (बी टेक) द्वितीय वर्षात परेश नावेदसाब फय्याज, आकांक्षा शेटे, राजश्री नरूने, शेवटच्या वर्षांमध्ये नेहा पाटील, श्वेता कोंढारे, प्रतीक्षा कुलकर्णी तर तृतीय वर्षांमध्ये रिद्धी पाटील, पियुष लासने, कार्तिक नारवाडे या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ रॅकमध्ये यश मिळवले आहे. विद्युत अभियांत्रिकी विभागात सुजाता दुधभाते, प्रगत जाधवर यांनी यश मिळवले.

संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी विभागात द्वितीय वर्ष बी. टेकमध्ये मोनाली करनावर, श्रावणी शिरसाट, ओंकार नागुल, विद्या हत्तुरे, अंजली पवार यांनी यश मिळवले. स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या शेवटच्या वर्षात सरस्वती साळुंके, आरती माने, प्राजक्ता काळे यांनी विद्यापीठ रॅकमध्ये यश मिळवले. या यशाबद्दल सिंहगड संस्थेचे सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. रवींद्र व्यवहारे, डॉ .विजय बिरादार, डॉ . प्रदीप तापकीरे, प्रा. के एस पाटील, प्रा. एच टी गुरमे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# रोजंदारी सेवकांच्या शिबिरात सुमारे ९४ जणांच्या कागदपत्रांची पूर्तता

### या अहवालानुसार होणार यादी अद्यावत!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ एप्रिल-**

महापालिकेतील सन १९९५ नंतरचे रोजंदारी/बदली कर्मचारी यांची माहिती शासनाकडे प्रस्तावित करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची मागणी केली होती. त्या अनुषंगाने आज महापालिका कौन्सिल हॉल सभागृहात रोजंदारी / बदली सेवकांबाबत कागदपत्राची पूर्तता करण्यासाठी घेण्यात आलेल्या शिबिरात सुमारे ९४ जणांच्या कागदपत्रांची पूर्तता झाली.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हे एक दिवसीय शिबिर घेण्यात आले होते. महापालिका सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी यांच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांनी प्रक्रिया पार पाडली. या शिबिरात सादर केलेल्या अहवालानुसार यादी अद्यावत होणार आहे. सन १९९५ नंतरचे २४९ रोजंदारी/बदली सेवकांपैकी मयत वगैरे वजा करून एकूण १९९ सेवक आहेत. या शिबिरामध्ये सुमारे ९४ सेवकांच्या कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली. शेवटच्या टप्प्यात आणखी काही जणांनी कागदपत्रे जमा केली असल्याचे सांगण्यात आले.

सन १९९५ नंतरचे २४९ रोजंदारी/बदली कर्मचारी यांची माहिती शासनाकडे प्रस्तावित करण्या करीता आवश्यक कागदपत्रांची मागणी केली होती. परंतु सर्व प्रकरणाचे अवलोकन केले असता अनेक सेवकांचे वैद्यक्तीक संचिकेमध्ये तफावत आढळून आले आहे. संबंधित विभाग / खाते प्रमुख यांना रोजंदारी/बदली सेवकांचे संचिका तयार करुन व सर्व अभिलेख हे प्रमाणित करुन (कार्यरत, मयत, गैरहजर, सेवानिवृत्त) या कार्यालयाकडे तात्काळ २४ तासाच्या आत माहिती सादर करण्यात यावे असे आदेशित केले होते. यामुळे आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी वैयक्तीक संचिका तयार करण्यात येत आहे. संबंधित खात्याकडून व सेवकांकडून कोणत्याही प्रकारचे कागदपत्राची पूर्तता होत नसल्यास लेखी कळविण्यात यावे.

> **वैयक्तीक संचिकेमध्ये ही आहेत आवश्यक कागदपत्रे**
>
> यामुळे आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी वैयक्तीक संचिका तयार करण्यात येत आहे. यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांचे मुळ नियुक्ती आदेश, प्रथम नियुक्ती झाल्यापासून ३ महिन्यातील वेतन पत्रिका/पगार बिलाचे छायाकित प्रत, हजेरी पुस्तकाचे पान ही सर्व कागदपत्रे खाते प्रमुख यांनी साक्षांकित करुन माहिती सादर करावयाचे होते. त्याप्रमाणे हे कागदपत्रे जमा करण्यात आली.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे भोसगे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल गजानंद अमृत हंचनाळ, राजशेखर अमृत हंचनाळ, भौरम्मा दशरथ जमादार, शोभा बसवराज जिड्डी, सर्व रा. सोलापूर यांनी मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या कोर्टात मौजे भोसगे येथील त्यांच्या मालकीची शेतजमीन गट नं. १७ च्या ७/१२ उताऱ्यावरील इतर हक्कातील नांवे कमी करून मिळणेकरीता अर्ज केला आहे. त्याप्रमाणे सदर अर्जास अनुसरून शेतजमीन गट नं. १७ याच्या इतर १ हक्कातील शंकर रामचंद्र हंचनाळ, रत्नाबाई शिवप्पा जमादार, मुक्ताबाई विठोबा जमादार यांना या नोटीसीने कळविण्यात येते की, सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत मे. मंडल अधिकारी भोसगे यांचे समक्ष हजर राहून आपले हरकत नोंदवावी. यदाकदाचित शंकर रामचंद्र हंचनाळ, रत्नाबाई शिवप्पा जमादार, मुक्ताबाई विठोबा जमादार हे किंवा त्यांचे वालीवारस सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून वर नमूद मिळकतीसंदर्भात मे. मंडलअधिकारी यांचे कार्यालयात गैरहजर राहिल्यास पुढील योग्य तो आदेश आमचे अशिल न्यायाच्या दृष्टीने व त्यांच्या हक्काच्या हितरक्षणाकरीता पुढील कार्यवाही करतील. त्यानंतर वर मिळकतीसंदर्भात कोणाचीही हरकत व तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली. ता. २३/०४/२०२५

**परिशिष्ठ :-** जि. सोलापूर, पैकी ता. अक्कलकोट, मौजे भोसगे येथील गट नं. १७ यांसी एकूण क्षेत्र १.९ आर. आकार रु. १.१२ पैसे.

**सही/-**
**ॲड. उडचाण एस. एम.**
**ॲडव्होकेटस्**
**ऑफीस : फत्तेसिंह चौक, अक्कलकोट**

**नावात बदल**
माझे जुने नाव
**सुरेशबाबु पर्वतगौडा पाटील (Sureshbabu Parwatagouda Patil)**
असे आहे. तरी नवीन नाव
**सुरेश पर्वतगौडा पाटील (Suresh Parwatagouda Patil)** असे वाचनांत यावे.
Affidavit No. 17796
Date - 22/04/2025

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**निविदा सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूरचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहेत. निविदा सूचना क्रमांक: 07-2025-SrDENS **कामाचे नाव** A -1 : सोलापूर विभागातील स्टेशन बिल्डिंगसमोरील स्टेशन मास्टरसाठी पॉइंट्समन, ट्रेन क्रू आणि हवामानरोधक शेडसाठी बटरफ्लाय शेडची तरतूद. 2. सोलापूर विभागातील 52 स्थानकांवर काँक्रीट डस्टबिनची तरतूद. **कामाची अंदाजे किंमत:** रु. 2,27,36,590.65 किमान पैसे : रु. 2,63,700.00 **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** 09 **महिने देखभाल कालावधी:** 12 महिने www.ireps.gov.in **वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ:** 09/05/2025 15.00 तासांपर्यंत www.ireps.gov.in **वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** 09/05/2025 15.30 **तासांपर्यंत संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्र लक्षात येईल. वेबसाइट:** www.ireps.gov.in. ANJ-44
रेल्वे रूळ अनधिकृतपणे ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**निविदा सूचना**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहेत. **निविदा सूचना क्रमांक:** 09-2025-SrDENS **कामाचे नाव :** पीव्हीआर स्टेशनवर गर्दी व्यवस्थापनासाठी सर्व प्रवासी सुविधा आणि इतर कामांसह होल्डिंग एरियाची तात्पुरती तरतूद. (भाग-01) **कामाची अंदाजे किंमत:** रु. 4,99,10,594.92 **बकाया रक्कम:** रु. 3,99,600.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 06 **महिने देखभाल कालावधी:** 12 महिने www.ireps.gov.in **वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ:** 13.05.2025 दुपारी 3.00 वाजेपर्यंत www.ireps.gov.in **वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** 13.05.2025 दुपारी 3.30 **वाजेपर्यंत संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्र लक्षात येईल. वेबसाइट:** www.ireps.gov.In. ANJ-45
रेल्वे रूळ अनधिकृतपणे ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, रेल्वेज ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-टेंडर आमंत्रित करत आहेत. **निविदा क्रमांक SUR/L/T/2024/01R1. कामाचे नाव :-** सोलापूर विभागातील विविध सेवा बिल्डिंग्जमध्ये 450 KWp रूफटॉप सोलर सिस्टम्च्या तरतुदीशी संबंधित कामाचा विद्युत सामान्य सेवा भाग. (पुन्हा आमंत्रण) **अंदाजे किंमत:**-2,18,87,086.57/- **बीड सुरक्षा:**- 2,59,400/- **पूर्ण होण्याचा कालावधी:**- 06 **महिने ऑफरची वैधता:**-60 दिवसांची तारीख आणि वेबसाइटवर निविदा बंद होण्याची वेळ:- 16/05/2025 15 वाजता. बोली सुरक्षा खर्च ई-पेमेंटद्वारे भरला जाईल **www.ireps.gov.in.** वेबसाइट. ANJ-46
रेल्वे रूळ अनधिकृतपणे ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**मध्य रेल्वे**
**ओपन ई-टेंडर सूचना क्रमांक CR.P.ST.CN.2025.01., दिनांक: 21.04.2025**

उपायुक्त मुख्य सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (बांधकाम) दादर, मध्य रेल्वे, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, **https://www.ireps.gov.in** वेबसाइटद्वारे खालील कामांसाठी खुल्या ई-निविदा आमंत्रित करतात:-1. मध्य रेल्वेच्या पुणे विभागात पुणे यार्ड री-मॉडेलिंगच्या पहिल्या टप्प्यातील एस अँड टी वस्तूंच्या भागाच्या कामासाठी पुरवठा, स्थापना, चाचणी, कमिशनिंग (इनडोअर आरआरआय/एल आणि आउटडोअरमध्ये बदल) तसेच युटिलिटी शिफ्टिंग. **ई-टेंडर क्रमांक : सीआर.पीए.एस अँड टी. सीएन.2025.01, कामाची किंमत:** रु. 2,52,12,504.72/-, **बयाणा रक्कम ठेव (ईएमडी):** रु. 276100/- **निविदा फॉर्मची किंमत:** रु. एनआयआय. **पूर्ण करण्याची मुदत:** 06 महिने. **देखभाल कालावधी:** 06 महिने. **वरील सर्व ई-टेंडरसाठी, निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** 13/05/2025 दुपारी 3:00 **वाजता आणि निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** 13/05/2025 दुपारी 3:30 नंतर. **टीप:- (1)** संभाव्य निविदाधारकांना भेट देण्याची विनंती आहे. निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी वेळोवेळी निविदांवरील सर्व तपशीलांसाठी **https://www.ireps.gov.in** वेबसाइटला भेट द्यावी जेणेकरून कोणतेही बदल/अद्यतने/सुधारणेची नोंद घेता येईल. निविदाधारकाने केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सहभागी व्हावे. **(2)** वर नमूद केलेले ई-निविदा 29/04/2025 पासून ते 13/05/2025 रोजी दुपारी 3:00 वाजेपर्यंत **https://www.ireps.gov.in** या वेबसाइटवर बोली सादर करण्यासाठी उपलब्ध असतील. **(3)** कोणत्याही चौकशीसाठी, आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर संपर्क साधावा - विभागीय सिग्नल आणि दूरसंचार अभियंता, पहिला मजला, उप-कार्यालय (बांधकाम), पुणे कार्यालय, खाजगी रस्ता, हॉटेल शेरेटन जवळ ग्रँड (जुना ले-मेरिडियन), सेंट्रल रेल्वे, पुणे-411001 किंवा फोन क्रमांक 020-26105880/26105892.
ANJ/38 डीएसटीई, पुणे
रेल्वे रूळ अनधिकृतपणे ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
**प्रधान कार्यालय/ Head Office**
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट - भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
Zonal Office, garwal Palace, First Floor, D Mart-Bharati Vidyapith Road, Opp. Patanjali Mall, Jule Solapur, Solapur - 413004.
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail : staff_sol@mahabank.co.in

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

जेथे,
सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल, 2002 च्या कलम 13 च्या उपकलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीकार यांनी **10/02/2025 रोजी मागणी सुचना** जारी केल्या आहेत ज्यामध्ये खालील कर्जदारांना आणि जामीनदारांना सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकी परत करण्याचे आवाहन केले आहे.
कर्जदाराने रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, **21/04/2025** रोजी सुरक्षा हित अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (4) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा अधोरेखित व्यक्तीने घेतला आहे.
विशेषतः कर्जदारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तांशी व्यवहार करू नये आणि मालमत्तांशी संबंधित कोणत्याही व्यवहारावर वर नमूद केलेल्या रकमेचा आकार बँक ऑफ महाराष्ट्रकडून आकारला जाईल.
कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, सुरक्षित मालमत्ता परत करण्यासाठी.

| अ. क्र. | शाखेचे नाव, कर्जदार आणि जामीनदार | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | मागणी सुचनेची तारीख आणि एकूण देणी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- वळसंग**<br>**खाते - 60435854190**<br>**कर्जदार:-**<br>मे. नक्षत्र होजियरी आणि लेडीज वेअर<br>प्रो.प्रा. : श्रीमती अश्विनी विनायक ताला<br>व्यवसाय पत्ता: पोस्ट क्रमांक 2681, आय ग्रुप, उत्तर सोलापूर, विडी घरकुल, अक्कलकोट रोड, जिल्हा सोलापूर - 413006.<br><br>निवासी पत्ता : पोस्ट प्लॉट क्रमांक LIG 102, J2 ग्रुप, विडी घरकुल, तालुका उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर - 413006<br><br>**हमीदार :-**<br>श्री. श्रीनिवास नारायण ताला<br>पोस्ट प्लॉट क्र LIG 102, J2 ग्रुप, विडी घरकुल, तालुका, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर - 413006. | **श्री. श्रीनिवास नारायण ताला** यांच्या नावावर मालमत्ता गहाण<br><br>सोलापूर विडी घरकुल, तालुका उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर येथे असलेल्या तळमजल्यावरील मिळकत क्रमांक जे-२, ग्रुप LIG, प्लॉट / घर क्रमांक 102 असलेल्या सर्व मालमत्तेचा तुकडा.<br>सीमा खालीलप्रमाणे: -<br>पूर्व : प्लॉट क्रमांक 117<br>दक्षिण : प्लॉट क्रमांक 101<br>पश्चिम : 6 मीटर अंतर्गत रस्ता<br>उत्तर : प्लॉट क्रमांक 103<br>CERSAI आयडी : 200068472776<br><br>मे. नक्षत्र होजियरी अँड लेडीज वेअर या दुकानात पोस्ट क्रमांक 2681, आय ग्रुप, उत्तर सोलापूर, विडी घरकुल, अक्कलकोट रोड, जिल्हा सोलापूर-413006 येथे स्टॉक आणि प्राप्तीयोग्य वस्तूंचे गहाणखत.<br>CERSAI आयडी: 200068463971. | **मागणी सूचना :**<br>दिनांक : **10/02/2025**<br>**रु. 10,28,704/- (दहा लाख अठ्ठावीस हजार सातशे चार रुपये फक्त.)**<br><br>**10/02/2025** पासून कर्जाची वसुली होईपर्यंत लागू न केलेले व्याज<br><br>**सांकेतिक ताबा तारीख: 21/04/2025** |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक** - 21/04/2025

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

Classifieds

**पाहिजेत**
पार्ट टाईम काम करु इच्छिणाऱ्या शंभर महिला, मुले, मुली पाहिजेत. अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटून काम सुरू करणाऱ्यांना नावनोंदणी व हजाराची वस्तू मोफत. मात्र अटी लागू.
संपर्क: 9765641261

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

www.tarunbharat.net
तरुण भारत




## महत्त्वाचे

### एरोबिक जिम्नॅस्टिक्स संघ टोकियोकडे रवाना

**मुंबई :** महाराष्ट्राच्या आर्या शाह, जम्मू- काश्मीरच्या रुद्राक्ष खन्ना, मणिपूरच्या मुतुम रोमिन्स, गुजरातच्या मीत कोसंबिया व मणिपूरच्या अरिहा पंगंबम यांची या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या एरोबिक्स जिम्नॅस्टिक्स विश्वचषक २०२५ स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. सुझुकी एरोबिक्स जिम्नॅस्टिक्स विश्वचषक स्पर्धा २५ ते २७ एप्रिल दरम्यान जपानमधील टोकियो येथे होणार आहे. संपूर्ण भारतीय संघात रुद्राक्ष खन्ना सब ज्युनियर वैयक्तिक पुरुष (जम्मू आणि काश्मीर), मुतुम रोमिन्स ज्युनियर वैयक्तिक पुरुष (मणिपूर), आर्या शाह वैयक्तिक पुरुष (महाराष्ट्र), मीत कोसंबिया - वरिष्ठ वैयक्तिक पुरुष (गुजरात), रिया शर्मा ज्युनियर वैयक्तिक महिला (जम्मू आणि काश्मीर) आणि अरिहा पंगंबम - वरिष्ठ वैयक्तिक महिला (मणिपूर) यांचा समावेश आहे, ज्यांना निवड समितीने निवडले आहे. शशांक बिडीवाल (गुजरात) आणि एसपी सिंग (जम्मू आणि काश्मीर) यांची संघासोबत प्रशिक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. तसेच, डॉ. मकरंद जोशी आणि यमनम रंजन यांची संघाचे प्रमुख आणि संघासोबत पंच म्हणून निवड करण्यात आली आहे. ■

### मॅन्चेस्टर सिटीचा ॲस्टन व्हिलावर रोमांचक विजय

**मॅन्चेस्टर सिटी :** मॅथियस न्युन्सने इंज्युरी टाइममध्ये नोंदविलेल्या महत्त्वपूर्ण गोलच्या बळावर मॅन्चेस्टर सिटीने ॲस्टन



व्हिलावर २-१ असा शानदार विजय नोंदविला. या विजयाबरोबरच मॅन्चेस्टर सिटीने पुढील हंगामात चॅम्पियन्स लीगमध्ये स्थान निश्चित केले. पहिल्या सत्रात मार्कस रॅशफोर्डने पेनॉल्टीवरून बर्नार्डो सिल्वाचा गोल रद्द केल्यानंतर संघ बरोबरीकडे वाटचाल करत असल्याचे दिसून आले, परंतु ९४ व्या मिनिटाला मॅथियस न्युन्सने जेरेमी डोकूच्या क्रॉसवर गोल करून मॅन्चेस्टर सिटीला युरोपच्या एलिट क्लब स्पर्धेत स्थान मिळवून दिले. सिटीने ६१ गुणांसह गुणतालिकेत दोन स्थानांनी झेप घेतली आणि तिसऱ्या स्थानावर पोहोचला, परंतु पेप ग्वॉर्डिओलाच्या संघाने त्यांच्या मागे असलेल्या तीन संघांपेक्षा एक गेम जास्त खेळला आहे. एतिहाद स्टेडियमवर सलग १५ सामने गमावलेला ॲस्टन व्हिला ५७ गुणांसह गुणतालिकेत सातव्या स्थानावर राहिला. सातव्या मिनिटाला सिल्वाने सिटीला आघाडी मिळवून दिली. ओमर मार्मोशने व्हिलाच्या राईट बॅक मॅटी कॅशने धाव घेतली आणि नंतर सिल्वाला चेंडू परत कट केला. व्हिलाचा गोलरक्षक एमी मार्टिनेझने त्याचे ग्लोव्हज चेंडूवर घेतले, परंतु चेंडू जाळ्यात जाण्यापासून रोखण्यासाठी पुरेसा नव्हता.

### ऑस्ट्रेलियाचे माजी कसोटीपटू कीथ स्टॅकपोल यांचे निधन

**सिडनी :** १९६६-७४ च्या आठ वर्षांच्या कारकिर्दीत ४३ कसोटी खेळणारे आणि सात शतके झळकावणारे माजी ऑस्ट्रेलियन कसोटी सलामीवीर कीथ स्टॅकपोल यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले. स्टॅकपोल यांच्या पश्चात त्यांची पत्नी पॅट आणि मुले पीटर, टोनी आणि अँजेला आहेत. स्टॅकपोल यांनी जानेवारी १९६६ मध्ये इंग्लंडविरुद्ध अॅडलेड येथे कसोटी पदार्पण केले होते. त्यांनी ८ व्या क्रमांकावर ६४ चेंडूत ४३ धावा केल्या होत्या आणि दुसऱ्या डावात दोन विकेट घेतल्या होत्या आणि ऑस्ट्रेलियाने एक डाव आणि नऊ अशा फरकाने विजय मिळवला होता. क्रिकेट ऑस्ट्रेलियातील आपण सर्वजण माजी ऑस्ट्रेलियन आणि व्हिक्टोरियन क्रिकेटपटू कीथ स्टॅकपोल, एमबीई यांच्या निधनाने शोक व्यक्त केला. कीथ हा एक उत्साही व्हिक्टोरियन आणि अभिमानी ऑस्ट्रेलियन होते, त्यांनी खेळ उत्साहाने, धैर्याने आणि आदराने खेळले, असे क्रिकेट ऑस्ट्रेलियाने म्हटले. १९६८ च्या अॅशेस दौऱ्यासाठी निवड न झाल्यानंतर, ते १९७२ च्या अॅशेस दौऱ्यावर चॅपेल यांच्या नेतृत्वाखाली उपकर्णधार होते आणि फलंदाजीला सुरुवात करताना ४८५ धावा काढत धावा काढणाऱ्यांच्या यादीत अव्वल स्थानावर होता. लोकांना न दिसणाऱ्या अनेक गोष्टींमध्ये तो मला खूप मदत करत होता. कर्णधार म्हणून ज्या गोष्टी तुम्ही करू शकत नाही, त्या ते शांतपणे करत असे,'' चॅपेल यांनी वाईड वर्ल्ड ऑफ स्पोर्ट्सला सांगितले. ■

# भारतीय खेळाडूंकडून हल्ल्याचा निषेध

## पाकिस्तानशी क्रीडा संबंध तोडण्याची मागणी



◆ **नवी दिल्ली, २३ एप्रिल**

भारताच्या क्रीडा क्षेत्रातील मंडळींनी पहलगाममधील प्राणघातक दहशतवादी हल्ल्याबद्दल शोक आणि संताप व्यक्त केला आहे. भारतीय खेळाडूंनी या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला असून भारताने पाकिस्तानशी सर्व क्रीडा संबंध तोडण्याची मागणी काहींनी केली.

मंगळवारी दक्षिण काश्मीरच्या पहलगाममधील एका प्रमुख पर्यटन स्थळावर दहशतवाद्यांनी गोळीबार केला, यात किमान २६ नागरिक ठार झाले व अनेक जण जखमी झाले. पाकिस्तानस्थित बंदी घातलेल्या लष्कर-ए-तैयबा (एलईटी) दहशतवादी गटाचा एक छाया गट असलेल्या रेझिस्टन्स फ्रंटने (टीआरएफ) या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

भारताने पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळू नये. आता नाही, कधीही नाही. जेव्हा बीसीसीआय किंवा सरकारने पाकिस्तानमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताला पाठवण्यास नकार दिला, तेव्हा काहींनी अरे, पण खेळ राजकारणाच्या वर असला पाहिजे असे म्हणण्याचे धाडस केले, असे माजी भारतीय क्रिकेटपटू श्रीवत्स गोस्वामी यांनी एका कडक शब्दात पोस्टमध्ये म्हटले आहे.

निरपराध भारतीयांची हत्या करणे हा पाकिस्तानचा राष्ट्रीय खेळ असल्याचे दिसून येते. भारताने क्रिकेटनेच नव्हे तर शून्य सहिष्णुतेने प्रतिसाद दिला पाहिजे, असे ते पुढे म्हणाले. भारताने २०१२-१३ पासून पाकिस्तानसोबत द्विपक्षीय क्रिकेट खेळलेले नसले आणि बीसीसीआयने या वर्षाच्या सुरुवातीला चॅम्पियन्स चषकासाठी आपला संघ पाठवण्यास नकार दिला असला तरी, इतर भारतीय संघ आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी पाकिस्तानात जात राहिले आहेत.

काश्मीर खोऱ्यात शांतता परत येत आहे असे वाटत होते, परंतु आता पुन्हा हा रक्तपात. आपले लोक मरत असताना आपण आणखी किती वेळा गप्प राहावे. पाकिस्तानसोबत खेळाचे संबंध तोडले पाहिजे, असे गोस्वामी म्हणाले.

येणाऱ्या काळात आपले शूर सैनिक या भ्याड हल्ल्याला नक्कीच योग्य उत्तर देतील. जम्मू-काश्मीरमधील शांतता भंग करू इच्छिणाऱ्यांचे डावपेच कधीही यशस्वी होणार नाहीत. भारताने दहशतवादाविरुद्ध ठोस कारवाई करावी, असे ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता मुष्टियोद्धा विजेंदर सिंग म्हणाला.

मृतांच्या कुटुंबीयांसाठी प्रार्थना. यासाठी जबाबदार असलेल्यांना किंमत मोजावी लागेल. भारत प्रत्युत्तर देईल, असे भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी म्हटले आहे.

दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूनेही एक भावनिक पोस्ट लिहिली. पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील बळींसाठी माझे हृदय दुःखी आहे. कधीही अशा क्रूरतेचे समर्थन करू शकत नाही. मृतांच्या कुटुंबांचे दुःख शब्दांच्या पलीकडे आहे, पण तुम्ही एकटे नाही आहात. आम्ही तुमच्यासोबत आहोत. या काळ्या क्षणी, आपण एकमेकांमध्ये शक्ती शोधूया व शांतता परत येईल ही आशा कधीही सोडू नये! असे सिंधूने लिहिले.

ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा व अभिनव बिंद्रा यांनी पीडितांसाठी प्रार्थना केली. पहलगाममधील भयानक दहशतवादी हल्ल्याने मन दुखावले, असे ते म्हणाले.

२०१९ च्या पुलवामा हल्ल्यानंतर हा हल्ला खोऱ्यातील सर्वात घातक दहशतवादी कृत्य आहे.

पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी केलेल्या या भ्याड कृत्याचा मी तीव्र निषेध करतो. दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारत आपल्या शूर सैन्य, जम्मू-काश्मीर पोलिस व निमलष्करी दलांसोबत एकजूट आहे. न्यायाचा विजय होईल, असे भारताचे माजी अष्टपैलू सुरेश रैना म्हणाले. भीषण हल्ल्यात प्राण गमावलेल्या सर्वांच्या कुटुंबीयांसाठी माझे हृदय दुखावते, असे भारताचा माजी फिरकीपटू हरभजन सिंगने लिहिले.

**निंदा पुरेशी नाही, न्याय मिळाला पाहिजे :श्रीजेश**

ऑलिम्पिक पदक विजेते माजी हॉकी गोलरक्षक पी. आर. श्रीजेश, बॅडमिंटनपटू सायना नेहवाल व दोन वेळा विश्वविजेती मुष्टियोद्धा निखत झरीनने सुद्धा न्यायाची मागणी केली. 'निंदा पुरेशी नाही, न्याय मिळाला पाहिजे. पहलगामसाठी आपले हृदय रक्ताळले आहे, असे श्रीजेशने लिहिले.

भीती पसरवणाऱ्यांनी हे जाणून घ्यावे की भारत एकजूट आहे व न्यायाचा विजय होईल. जय हिंद, असे सायनाने पोस्ट केले.

निरपराधांवर हल्ला करणारे मानवतेवरच हल्ला करतात. पहलगाममधील भ्याड दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध. न्याय जलद असावा, असे निखत झरीन म्हणाली.

आपल्या समाजात अशा हिंसाचाराच्या कृत्यांना स्थान नाही. शांतता नांदो, असे पश्चिम बंगालमधील बहरामपूर येथील खासदार युसूफ पठाण व त्यांचा भाऊ इरफान पठाण म्हणाले. तसेच भारताचा माजी यष्टिरक्षक पार्थिव पटेल, क्रिकेटपटू शुभमन गिल, केएल राहुल, अनिल कुंबळे, रवी शास्त्री यांनीही या घटनेबद्दल शोक व्यक्त केला, ◂(वृत्तसंस्था)

# आयपीएल सामन्यात खेळाडूंनी बांधली काळीपट्टी

## चीअर लीडर्स नाही अन् फटाकेही नाही

◆ **हैदराबाद, २३ एप्रिल**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील बळींना श्रद्धांजली वाहण्यासाठी बुधवारी येथील राजीव गांधी स्टेडियमवर खेळल्या जाणाऱ्या आयपीएल सामन्यादरम्यान सनरायझर्स हैदराबाद व मुंबई इंडियन्सचे खेळाडू हाताला काळ्या पट्ट्या बांधणार आहे, या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला.

आंतरराष्ट्रीय स्तरावर निषेध झालेल्या या घटनेत बळी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी दोन्ही संघ एक मिनिटाचे मौन पाळतील.

काश्मिरातील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या सर्वांच्या स्मृतीप्रित्यर्थ दोन्ही संघांचे खेळाडू काळ्या हाताच्या पट्ट्या बांधतील आणि एक मिनिटाचे मौन पाळतील, असे बीसीसीआयच्या सूत्रांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

चिअर लीडर्स, फटाके नाही

श्रद्धेचे प्रतीक म्हणून मुंबई इंडियन्सविरुद्ध सनरायझर्स हैदराबादच्या सामन्याच्या वेळी कोणतेही चिअरलीडर्स नसतील. फटाके वाजवण्यात येणार नाहीत, असे त्यांनी सांगितले.

२००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय क्रिकेट संघाने पाकिस्तानसोबत द्विपक्षीय क्रिकेट स्पर्धा थांबवली आणि अलीकडेच चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी देशाचा दौरा करण्यास नकार दिला, ज्यामुळे आयसीसीने दुबईमध्ये तटस्थ स्थळाची तरतूद केली.

◂(वृत्तसंस्था

## फुटबॉलपटूंनी वाहिली श्रद्धांजली

◆ **भुवनेश्वर, २३ एप्रिल**

बंगळुरू एफसी आणि इंटर काशीच्या फुटबॉलपटूंनी बुधवारी येथे झालेल्या सुपर चषक फुटबॉल सामन्यापूर्वी हातावर काळ्या पट्ट्या बांधल्या आणि एक मिनिट शांतता पाळली.

मंगळवारी पहलगाममधील बैसरन कुरणात दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात किमान २६ जणांचा मृत्यू झाला.

दहशतवादी हल्ल्यातील बळींना श्रद्धांजली वाहण्यासाठी दोन्ही संघांचे खेळाडू, त्यांच्या परदेशी खेळाडूंसह, हातावर काळ्या पट्ट्या बांधून मैदानावर आले. सामना सुरू होण्यापूर्वी, खेळाडू, सामना अधिकारी आणि कलिंगा स्टेडियममधील प्रेक्षकांनी दिवंगत आत्म्यांच्या स्मरणार्थ एक मिनिट शांतता पाळली.

तत्पूर्वी, बंगळुरू एफसीने दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्या आणि जखमी झालेल्यांसोबत एकता व्यक केली. ◂(वृत्तसंस्था

# भंडारी स्पोर्टस् क्लबची विजयी सलामी

## रेल्वेची ७८वी स्कॉट मेमोरियल क्रिकेट स्पर्धा

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिटयुटच्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन अ गटाच्या क्रिकेट स्पर्धेत भंडारी स्पोर्टस् क्लबने युनाडेट क्रिकेट क्लबवर ७ गडी राखून विजय मिळविला. श्रीनिवास कुलकर्णी सामन्याचा मानकरी ठरला. अतुल बांदीवाडीकर यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. प्रत्येक सामनावीर चे पुरस्कार सुदेश मालप व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत. पंच म्हणून दयानंद नवले व नितीन गायकवाड तर गुणलेखक म्हणून सचिन गायकवाड यांनी काम पाहिले.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात बुधवारी या स्पर्धेचे उद्घाटन शिवछत्रपती क्रीड पुरस्कार विजेता खेळाडू आदित्य गिराम यांच्या हस्ते करण्यात आले. त्यापूर्वी मानाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार मिळाल्याबद्दल आदित्य गिराम व त्यांचे प्रशिक्षक हरीश अन्नलदास यांचा सत्कार मध्य रेल्वे इन्स्टिटयूट तर्फे सेक्रेटरी किशोर पिल्ले व खजिनदार विक्रांत पवार यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. यावेळी रेल्वे इन्स्टिट्युटचे कमिटी मेंबर नागेश नवले, रेल्वेचे वरिष्ठ खेळाडू लियाकत शेख, अंबादास तोरा, प्रवीण देशेट्टी, अनिल गिराम, सुदेश मालप, अतुल बांडीवाडीकर, अमजत पठाण आदी उपस्थित होते. प्रास्तविक सचिन गायकवाड यांनी केली.




**सोलापूर : शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते आदित्य गिराम व त्याचे प्रशिक्ष हरीश अन्नलदास यांचा सत्कार करताना मध्य रेल्वे इन्स्टिटयूटचे सेक्रेटरी किशोर पिल्ले व खजिनदार विक्रांत पवार. दुसऱ्या छायाचित्रात श्रीनिवास कुलकर्णी यास सामानवीर पुरस्कार देताना अतुल बांदीवाडीकर.**

**संक्षिप्त धावफलक**

**युनायटेड क्रिकेट क्लब:** ३४.४ षटकांत सर्व बाद १५९ (अक्षय देशमुख ३०, प्रथम तानवडे १९, चंद्रशेखर लोखंडे १५ धावा, श्रीनिवास कुलकर्णी ३ बळी, सोमनाथ भरले व अनिल सलगर २ बळी, राजवर्धन खटके-पाटील व विघ्नेश जाधव प्रत्येकी १ बळी) पराभूत विरुद्ध **भंडारी स्पोर्ट्स क्लब:** २२ षटकांत ३ बाद १६२ (नागराज येनगंटी नाबाद ७०, आर्यन काळे नाबाद ३९, श्रीनिवास कुलकर्णी ३५ धावा, प्रशम चंकेश्वरा २ बळी, सचिन अचोली १ बळी. **आजचा सामना :** साऊथ सोलापूर आपटे ग्रूप (ब) विरुद्ध मास्टर्स क्रिकेट अकॅडमी

## ॥ उसंतवाणी ॥

१४८९



पर्यटक गेले। हकनाक बळी।
धर्मांधांची खेळी। निंदनीय ॥१॥

एकेक मारला। विचारून धर्म।
हिंदूद्वेषी वर्म। ओळखा हे ॥२॥

पर्यटनाचा जो। व्यवसाय फुले।
रोजगार मिळे। सामान्यांना ॥३॥

पर्यटका ऐसी। घालुनिया गोळी।
सौहार्दाची होळी। केली सारी ॥४॥

जुळलेला सारा। खेळ उधळला।
काळा उगळला। कोळसा तो ॥५॥

दहशतीचा हा। बे'रंग' हिरवा।
देशाला जळवा। लागलेल्या ॥६॥

कांत म्हणे बस्स। संपला संयम।
वाट पाहे यम। राक्षसांची ॥७॥

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
२३ एप्रिल २०२५

# शूटिंग बॉलमुळे माळशिरसचे नाव देशपातळीवर

माळशिरस हे शुटींग बॉल खेळाडूचे निर्मिती केंद्र म्हणून ओळखले जाते. या खेळाला वारसा आहे. या गावातील अनेक खेळाडूनी राज्य संघाचे नेतृत्व केले आहे. गेल्या ५० वर्षापासून लहानापासून थोरापर्यंत हा खेळ खेळला जात आहे. या गावातील कॅाॅल इस्पेक्टर कै नामदेवराव खराडे यांनी बलभीम तरुण मंडळाची स्थापना केली .त्यांच्या माध्यमातून खेळाडूना आपले खेळातील कौशल्य दाखवण्याची संधी प्राप्त झाली.

राज्यात सर्वात मोठ्या शुटींग बॉल स्पर्धा जयसिंगपूर तेथे होत होत्या. याची आवड निर्माण झाल्याने माळशिरस शहरात मोठ्या स्पर्धांचे आयोजन केले जाऊ लागले. त्यातूनच नवनवीन खेळाडू तयार होऊ लागले. खेळाडू एवढे वाढले कि सरावासाठी तीन ग्राउंड करावे लागले. खलील मुलाणी, विष्णुपंत केमकर, राजाभाऊ शिंदे, विजय वाघमारे, कुमार वाघमारे, हरिभाऊ शिंदे, मोहन देशपांडे, अजीम मुलाणी, बबन केमकर, नंदू कुलकर्णी, अशोक पोरे, लाला लिंबोणे, संतोष



गुजरे, डॉ. गणेश घाडगे या जुन्या खेळाडूंनी माळशिरसचे राज्यात पोहचवले. प्रत्येक ठिकाणच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवावयाचा हाच त्यांचा ध्यास होता. गावातील नागरिकांनी खेळाडूना त्यांना साठ दिली. विजयी संघ गावात परतल्यानंतर संघाची गावातून सवाद्य मिरवणूक काढली जात होती. त्यानंतर हा वारसा नवीन खेळाडूंनी पुढे चालू ठेवला. अस्लम मुजावर, विपिन ननवरे, अमीर काझी, जयंत खंडागळे, शकील मुलाणी, नाना काळे, कुणाल शिंदे, मलिक इनाम दार, रणजित थोरात, किरण नवगण, अमर शेख, विनायक नाळे, फैजान इनामदार या खेळाडूंनी माळशिरसचे नाव राज्यात नाही तर राज्याबाहेर पोहचविले. राज्य संघाच्या लहान व मोठ्या गटात माळशिरसच्या खेळाडूंनी आपले स्थान राज्य संघात कायम ठेवले. या खेळाडूंनी अनेक पारितोषिके मिळवली. पारितोषिक म धून आलेल्या रकमेतून या खेळाडूंनी सामाजिक बांधिलकी जोपासताना श्री मारुती मंदिर, जिल्हा परिषद शाळा, स्मशानभूमी येथे विंधन विहिरी घेऊन पाण्याची सुविधा केली. ■

### खेळामुळेच नोकरीची संधी



लहानपणापासून मला या खेळाची आवड लागली. येथील वरिष्ठ खेळाडूंच्या मार्गदर्शनामुळे मला राज्याच्या संघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. राज्यस्तरावरील कामगिरीमुळेच ५ टक्के आरक्षणातून मला नोकरी संधी मिळाली. गावातील लोकांची साथ, खेळाडूंचे मार्गदर्शन यामुळेच हे शक्य झाले. शासनाने पुन्हा या खेळातील खेळाडूना ५ टके आरक्षण व शिवछत्रपती पुरस्कार सुरु केला तरच हा खेळ टिकणार हे मात्र नक्की

**- विपीन ननवरे राष्ट्रीय खेळाडू (सदाशिवनगर, ता. माळशिरस)**

### शासनाच्या प्रोत्साहनाची गरज

शुटींग बॉल खेळाडूंना शिवछत्रपती पुरस्कार दिला जात होता. परंत शासनाने सन २००० सालापासून बंद केला आहे. त्यामुळे या खेळाकडे नवीन खेळाडूंचे लक्ष कमी झाले आहे. शासनाने हा पुरस्कार सुरु करण्याची गरज आहे. राज्यस्तरीय स्पर्धेत यश मिळवलेल्या शुटींग बॉल खेळाडूना शासकीय सेवेत यापूर्वी ५ टक्के आरक्षण होते. या आरक्षणामधून खेळाडूना नोकऱ्या मिळाल्या. परंतु शुटींग बॉल खेळाला यामधून वगळण्यात आले. ते सुरु केल्यास या खेळाकडे बघण्याचा कल वाढणार आहे.



# मास्टर व नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमी उपांत्य फेरीत

## एनजीसीए करंडक १४ वर्षांखालील क्रिकेट

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमी आयोजित एनजीसीए करंडक १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत मास्टर क्रिकेट अकादमी व नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमीने उपांत्य फेरीत प्रवेश केला.

डोणगाव रोडवरील पुष्प अकादमीच्या मैदानावर बुधवारी झालेल्या सामन्यात मास्टर अकादमीने मॉडेल अकादमीवर २९ धावांनी मात केली. दुसऱ्या सामन्यात नीलेश गायकवाड अकादमीने युनायडेट क्रिकेट क्लबवर ७१ धावांनी विजय मिळविला. सम्राट बोबडे व आनंद शेंडे सामन्याचे मानकरी ठरले.

**संक्षिप्त धावफलक : मास्टर क्रिकेट ॲकॅडमी :** ३० षटकात ९ बाद १६१ (ऋषिकेश गजम ५२, प्रशांत जाधव २५, वेदांत शिंदे ३-२५) वि. वि. **मॉडेल क्रिकेट अकॅडमी :** २७.१ षटकात सर्व बाद १३२ ( हर्ष माळी याने ८९, ऋषिकेश गज्जम व निर्वेश बनसोडे प्रत्येकी तीन बळी, सिद्धार्थ जाधव २-२५)

**निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमी :** ३० षटकात ७ बाद १६८ (आनंद शेंडे ५१, ऋग्वेद पाटील २९, विहान येवणकर २०, जयवर्धन भोसले २०, सम्राट बोबडे ३-४५) वि.वि. **युनायटेड क्लब :** ३० षटकात ८ बाद ९७ (अभय अंजलापुरे २३, हर्ष साठे १३, अनुज वाल्मिकी व विहान येवणकर प्रत्येकी दोन बळी, जयवर्धन भोसले व आनंद शेंडे प्रत्येकी एक बळी).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## महत्वाचे...



### लोणविरे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी मालती गायकवाड बिनविरोध

**सांगोला, दि. २३ एप्रिल-**
लोणविरे (ता. सांगोला) ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी माजी आ. दिपकआबा साळुंखे पाटील गटाच्या मालती अजित गायकवाड यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीनंतर मालती गायकवाड यांचा दिपकआबा साळुंखे पाटील यांनी सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी अजित गायकवाड, सुनील पाटील, प्रवीण कुमार, सुभाष गायकवाड, लक्ष्मण मोरे, अशोक दोडके, रमेश गायकवाड, वैभव गायकवाड, दत्तात्रय मोरे, बाळासाहेब गायकवाड, तानाजी गाडेकर, चंद्रकांत गायकवाड आणि ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी बोलताना दिपकआबा साळुंखे पाटील म्हणाले, लोणविरे गावाच्या विकासासाठी विविध योजनातून निधी मिळावा म्हणून शासन दरबारी आपण पाठपुरावा करू आणि गावातील वर्षांनुवर्षे रखडलेले प्रश्न मार्गी लावण्यासाठी नूतन सरपंच, उपसरपंच तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्यांना मदत करू असा विश्वास दिला. लोणविरे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अशोक दोडके यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने सरपंचपद रिक्त झाले होते. गतवेळी झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत माजी आ.शहाजी पाटील व माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या विचारांच्या स्थानिक आघाडीने एकत्र येऊन ही निवडणूक जिंकली होती. स्थानिक पातळीवर नेत्यांनी केलेल्या राजकीय तरतुदीनुसार सदरची सरपंच निवड करण्यात आली आहे.

### पिलीव, झिंजेवस्तीसह सुळेवाडीच्या सरपंच पदाबाबत संभ्रम ?

**पिलीव दि २३ एप्रिल-**
माळशिरस तालुक्यातील अकरा ग्रामपंचायतीची मुदत ही २०२४ मध्ये संपली आहे. यामध्ये पिलीव, झिंजेवस्ती व सुळेवाडी या गावांचा समावेश होता. त्यावेळी या गावांचे सरपंच पदाचे आरक्षणही जाहीर केले गेले होते. त्यानुसार पिलीव सर्व साधारण महीला, सुळेवाडी सर्व साधारण महीला व झिंजेवस्ती ओबीसी पुरुष असे सरपंच पदाचे आरक्षण जाहीर केले गेले होते. मात्र आज माळशिरस तालुक्यातील १०३ ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण पुन्हा जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार पिलीवला एस सी महीला , झिंजेवस्तीला एस एसी पुरुष व सुळेवाडीला ओबीसी पुरुष असे आरक्षण नव्याने जाहीर झाले आहे. त्यामुळे सध्या या तिन्ही गावातील सरपंचपदाच्या आरक्षणासंबंधी मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. कारण या ग्रामपंचायतीची मुदत २०२४ ला संपले असुन याचे आरक्षण अगोदरच जाहीर केले गेले असताना आज पुन्हा नव्याने बदलुन आरक्षण जाहीर केले आहे. म्हणजे प्रशासनाने खरेतर त्या समाजाच्या माणसाला पदापासून रोखल्या सारखेच आहे. खरेतर आजचे आरक्षण हे २०२५ ते २०३० हया पाच वर्षासाठी असताना मागे एक वर्षापूर्वी मुदत संपलेल्या व अगोदरच आरक्षण जाहीर केलेल्या ग्रामपंचायतीची निवडणूक न होताच नव्याने सरपंच पदाचे आरक्षण कसे काय काढले असा तिन्ही गावातील पुढारी व सर्व सामान्य नागरिकांचा प्रशासनाला प्रश्न असुन प्रशासन याबाबत काय भुमीका घेते याकडे लक्ष लागले आहे. पण आज नव्याने जाहीर केलेल्या आरक्षणामुळे मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

### ३५ वर्षीय महिलेने घेतला गळफास; बार्शीतील कथले विहारमध्ये घटना

**बार्शी, दि. २३ एप्रिल-**
शहरातील कथले विहार भागात एका विवाहित महिलेने अज्ञात कारणावरुन राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना २१ एप्रिल रोजी सायंकाळी घडली. सविता गोविंद लांडे (वय ३५ वर्षे) असे मयत महिलेचे नाव आहे. सविता या त्यांचे पती गोविंद लांडे आणि दोन मुलांसह कथले विहार, बार्शी येथे वास्तव्यास होत्या. सोमवार दि. २१ एप्रिल रोजी सायं. ७ वाजण्याच्या सुमारास सविता यांनी घरातील स्लॅबच्या छतावरील पंख्याला साडीच्या साहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. त्यांचे पती गोविंद लांडे हे त्यावेळी आगळगाव येथील शेतात काम करत होते. शेजाऱ्यांकडून मोबाईलवर मिळालेल्या माहितीवरुन गोविंद व त्यांचे चुलत भाऊ नितीन लांडे घटनास्थळी धाव घेतली. घराचा दरवाजा उघडून पाहिले असता सविता यांचा मृतदेह फॅनला लटकलेला दिसून आला.या घटनेची माहिती नितीन लांडे यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात दिली असून, पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे. आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

### बार्शीत महिलेच्या गळ्यातील गंठण हिसकावून पळविले

**बार्शी, दि. २३ एप्रिल-**
जैन मंदिर रोड, गुंड प्लॉट येथील रहिवासी जयश्री दिलीप गडशिंगे (वय ५८) या खाजगी नोकरी करणाऱ्या महिलेला दोन अज्ञात मोटारसायकलस्वारांनी गळ्यातील सुमारे ६०,००० रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण हिसकावून पळ काढला. ही घटना सोमवार दि. २२ एप्रिल रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली. जयश्री गडशिंगे या आपली ड्युटी संपवून जगदाळे मामा हॉस्पिटलहून घरी जात असताना, रिलायन्स मॉल जवळील रस्त्यावर ही घटना घडली. पाठीमागून आलेल्या मोटारसायकलवरील दोघांपैकी पाठीमागील इसम ने त्यांच्या गळ्यातील गंठण हिसकावले आणि कुर्डवाडी रोडने पळ काढला. या अज्ञात चोरट्यांचे वर्णन असे आहे- दोघेही सडपातळ बांध्याचे असून पांढऱ्या रंगाचे फुलशर्ट घातले होते. मोटारसायकल कोणत्या कंपनीची होती हे मात्र फिर्यादी पाहू शकल्या नाहीत. या प्रकरणी जयश्री गडशिंगे यांनी बार्शी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरु आहे.

## निधन वृत्त...

### विश्वनाथ रिक्के



**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**
तुळजापूर वेस, शिवगंगा मंदिरसमोरील बारदाना व्यापारी, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष विश्वनाथ इरप्पा रिक्के (वय ९२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन भाऊ, पत्नी, चार मुले, नातवंडे असा परिवार आहे. ते श्रीशैलम येथील अन्नछत्रमचे संचालक व संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सदस्य होते. श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीचे विश्वस्त रतन रिक्के यांचे ते वडील होत.

# पंढरपुरातील २२ प्रवासी जम्मू-काश्मीरमध्ये सुखरुप

## सर्वजण परतीच्या प्रवासासाठी मार्गस्थ होणार : जिल्हा प्रशासन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ एप्रिल-**
जम्मू व काश्मीर येथील पहलगाम येथे घडलेल्या दुर्दैवी घटने नंतर जिल्हा प्रशासन अलर्ट मोडवर आलेले आहे. खबरदारी म्हणून जिल्हा प्रशासनाकडून जिल्ह्यातील जम्मू-काश्मीर येथे गेलेल्या पर्यटकांची माहिती त्यांच्या नातेवाईकांनी तात्काळ जिल्हाप्रशासनाला देण्याची सूचना जिल्हावासियांना करण्यात आली आहे. त्यानुसार पंढरपूर तालुक्यातील सुमारे २२ पर्यटक सध्या जम्मू काश्मीर खोऱ्यात भ्रमंतीसाठी गेले असून सर्वजण सुखरुप असुन लवकरच ते परतीच्या प्रवासासाठी निघणार असल्याची माहिती जिल्हाधिकारकी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जम्मू व काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्यात महाराष्ट्रातील सात जणांची निर्देयीपणे हत्या करण्यात आलेली आहे. या हल्यात देशातील २७ हिंदू पर्यटकांचा दुर्दैवी अंत झाला आहे. तर कईक पर्यटक हे जखमी झालेले आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्राकडून राज्यांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून प्रत्येक राज्यांना त्या त्या भागातून जम्मूकाश्मीर मध्ये गेलेल्या पर्यटकांची माहिती संकलित करुन त्यांच्या घरवापसी बाबत नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### नातेवाईकांनी त्वरीत संपर्क साधवा

पंढरपूर तालुक्यातून किंवा सोलापूर जिल्ह्यातून कोणी जम्मू,काश्मीर भागात पर्यटनासाठी किंवा अन्य कारणासाठी गेलेले असल्यास त्यांच्या नातेवाईकांनी त्वरीत जिल्हाप्रशासनाशी संपर्क साधावा असे आवाहन सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

त्यानुसार सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आर्शीर्वाद यांनी देखील जिल्ह्यातील प्रांताधिकारी आणि तहसीलदारांना आपल्या तालुक्यातून जम्मू, काश्मीर मध्ये गेलेल्या पर्यटकांची माहिती संकलित करण्यास सांगण्यात आले आहे. त्या बरोबरच त्या ठिकाणी गेलेल्या पर्यटकांच्या नातेवाईकांना देखील सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्षात संपर्क करुन माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्या नुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे पंढरपूर तालुक्यातून सुमारे २२ जण जम्मू,काश्मीर खोऱ्यात पर्यटनासाठी गेले असून सर्वजण सुखरुप असल्याची माहिती देण्यात आली आहे. हे सर्व जण लवकरच परतीच्या प्रवासासाठी निघणार असल्याचे देखील सांगण्यात आलेले आहे.

### जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधण्यासाठीचे संपर्क क्रमांक

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर ०२१७ -२७३१०१२ ( फक्त सोलापूर जिल्ह्याकरिता). या शिवाय शक्तीसागर ढोले, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर - ९१९८२२५१५६०१. मदनसिंग परदेशी, सहाय्यक महसूल अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर - ९१९८२३०६५०९०. अरविंद चौगुले, महसूल सहाय्यक, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर - ९१९३५९३९७५२४ आणि ९१९८२३०६५०९०

यामध्ये अमित शिंदे, ज्ञानेश्वर खानापूरे, शिवकांता विभुते, प्रसाद मधुकर कवडे, ज्ञानेश्वर कोलिंगे, ऋतुराज घाडगे हे सर्वजण पंढरपूर येथील पांडुरंग ट्रॅव्हल्सने जम्मूकाश्मीर येथे गेलेले होते. मात्र हे सर्वजण सुखरुप असून सध्या अमृतसर येथून ते पंढरपूरकडे बसने मार्गस्थ झाले आहेत. या शिवाय डॉं.मनोज ज्योतीराम भायगुडे (इसबावी) हे देखील जम्मूकाश्मीर येथे गेलेले होते. मात्र ते देखील लवकरच परत येणार असल्याचे कार्यालया मार्फत सांगण्यात आलेले आहे. तर तालुक्यातील चिंचोलीभोसे येथील प्रमोद रमेश पवार, दिपाली रमेश पवार, मधुरा प्रमोद पवार हे तिघेही रेल्वेने जम्मू काश्मीर येथे पर्यटनासाठी गेलेले होते. मात्र हे तिघेही विमानाने परत येणार असल्याची माहिती देण्यात आलेली आहे. तालुक्यातील ओझेवाडी येथील तानाजी काशीनाथ नागणे हे वाहनाने जम्मू-काश्मीर येथे गेलेले होते. सध्या ते क्षीनगर मार्केट येथे असून ते सुखरुप असल्याचे सांगण्यात आलेले आहे. तालुक्यातील देगाव येथील हणमंत आनंतराव पाटील, विद्या हणमंत पाटील, पृथ्वीराज हणमंत पाटील हे पुणे येथून जम्मुकाश्मीर येथे गेलेले होते. हे सर्वजण नगर येथे सुखरुप आहेत.

या बरोबरच तालुक्यातील करोळे येथील अमर जालिंदर यमगर, प्रियंका अमर यमगर, आरुष अमर यमगर हे सर्वजण रेल्वेने जम्मूकाश्मीर येथे पर्यटनासाठी गेलेले होते. त्यांचा देखील वाहनाने प्रवास सुरु आहे. हे सर्वजण सध्या राजोरी येथे आहेत. दरम्यान हे तिघेही गुरुवारी (ता.२४) सकाळी दहा वाजता विमानाने परतीचा प्रवास करणार असल्याची माहिती समोर आलेली आहे. या शिवाय तालुक्यातील खेडभोसे येथील राजेश नवनाथ पवार, कल्याणी राजेश पवार, हर्ष राजेश पवार, अर्णव राजेश पवार हे चौघेजण रेल्वेने जम्मूकाश्मीर येथे गेलेले होते. या सर्वांचा वाहनाने सध्या प्रवास सुरु असून राजौरी येथे सर्वजण सुखरुप आहेत. हे देखील गुरुवारी (ता.२४) सकाळी दहा वाजता विमानाने परतीचा प्रवास करणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आलेली आहे.



## काश्मीरमधील हल्ल्याच्या निषेधार्थ मंद्रुपमध्ये कॅन्डल मार्च

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २३ एप्रिल-**
काश्मीरमध्ये पर्यटकांवर अतिरेक्यांकडून करण्यात आलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ मंद्रुपमध्ये शांततामय कॅन्डल मार्च काढण्यात आला. हा मार्च श्री शिव-बसव चौक येथून सुरू होऊन हुतात्मा स्तंभ येथे समाप्त झाला. हातात मेणबत्त्या घेत, काश्मीर हल्ल्याचा निषेध असो अशा घोषणा देत नागरिकांनी शांततेत निषेध नोंदवला.

यावेळी हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आणि हल्ल्यात मृत्यू झालेल्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी कार्यक्रमात उमाशंकर रावत, अनिल जोडमोटे, अभिषेक देशमाने, गजानन शेंडगे, विद्याधर मेंडगुदले यांच्यासह मंद्रुपमधील आणि नागरिक सहभागी झाले होते.

## श्री स्वामी समर्थ पादुका सोहळ्याचे श्री क्षेत्र अक्कलकोटकडे प्रस्थान

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २३ एप्रिल-**
श्री स्वामी समर्थ महाराज पादुका सोहळ्याचे बुधवारी श्री क्षेत्र अक्कलकोट कडे प्रस्थान झाले . पहिल्या मुक्कामी हा सोहळा श्री क्षेत्र पंढरपूर येथे पोहोचला. श्री स्वामी समर्थ सेवा मंडळाच्या वतीने श्री अक्कलकोट निवासी स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री क्षेत्र वेळापूर ते श्री क्षेत्र अक्कलकोट अशी चार दिवसांची पादुका सोहळा यात्रा काढली जाते . यात्रेचे हे १६ वे वर्ष आहे.



बुधवार दि. २३ रोजी सकाळी ७ वाजता श्री नवनाथ बनकर व सौ प्रिती बनकर या उभयतांच्या हस्ते श्रींची प्रस्थान पूजा , अभिषेक व आरती करण्यात आली. महेश स्वामी यांनी पौरोहित्य केले . त्यानंतर पादुका श्री अर्धनारी नटेश्वर मंदिरात आणल्या . वेळापूर , बोंडले येथे पंडितराव माने देशमुख, दसूर येथे संकल्प डोळस, पिराची कुरोली येथे अतुल म्हसवडे, भंडीशेगाव येथे संजय रणखांबे यांचे स्वागत स्वीकारून हा सोहळा पहिल्या मुक्कामासाठी श्री क्षेत्र पंढरपूर येथे पोहोचला . श्री नेवासकर परिवाराच्या वतीने सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. गुरुवार दि . २४ रोजी श्री क्षेत्र पंढरपूर, देगाव, सुस्ते, तारापूर मार्गे वरकुटे मुक्कामी पोहोचेल. शुक्रवार दि . २५ रोजी वरकुटे, कुरुल, कामती, ति-हे, देगाव मार्गे सोलापूर मुक्कामी पोहोचेल.

शनिवार दि. २६ रोजी सोलापूर येथून पादुकांची विधीवत पूजा व आरती होवून हा सोहळा सकाळी ८ वाजता विजयबाग अक्कलकोट येथे पोहोचेल. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने पादुकांचे स्वागत, पूजा होईल . स्वामी भक्तांना येथे न्याहारी दिली जाईल. तेथून हा सोहळा श्री क्षेत्र अक्कलकोट येथील समाधी मठ येथे दर्शनासाठी पोहोचेल . सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेपर्यंत श्री गुरु मंदिर येथे भजन व पुण्यतिथीचा सोहळा साजरा केला जाईल. आरती, महाप्रसाद व विश्रांतीनंतर सायंकाळी ४ वाजता हा सोहळा श्री वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिरात पोहोचेल. तेथे दर्शन घेवून हा सोहळा वेळापूरकडे परतीच्या प्रवासासाठी मार्गस्थ होईल.

# भक्तीसंगीत गायन सेवेत भाविक तल्लीन

## धर्मसंकीर्तन महोत्सव : निखील महामुनीसह गायकांनी गुंफले ९ वे पुष्प

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २३ एप्रिल-**
श्री स्वामी समर्थांच्या १४७ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमीत्त आयोजित करण्यात आलेल्या धर्मसंकीर्तन महोत्सवातील ९ वे पुष्प पुण्यातील आरव निर्मित 'नाम रंगी रंगुनी' या भाव भक्तीसंगीत व भक्तीगीतांच्या कार्यक्रमात गायक निखील महामुनी व सहगायकांनी भक्तीगीतांनी गुंफले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीच्यावतीने चेअरमन महेश इंगळे यांनी गायक महामुनी व सर्व सहगायक, सहवादकांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून सन्मान केला. या भक्तीसंगीत सेवेत गायक निखील महामुनी यांनी तू माझा देवा, माझी देवपूजा, कोटि कोटि रूपे, बाबूजी मिडले, तुळजाभवानीचा गोंधळ, तारकमंत्र, गायिका अनुराधा गोगटे यांनी शंभो शंकरा, स्वामी कृपा कधी करणार, गायिका रेखा पाटणकर यांनी ये जवळी घे जवळी, ज्योत दिव्याची मंद तेवते, गायिका ऋचा महामुनी व अनुराधा गोगटे यांनी उठा उठा स्वामी समर्था, ऋचा महामुनी व निखील महामुनी यांनी थकले रे आणि विकत घेतला, सुशांत कुलकर्णी व निखील महामुनी यांनी आविरत ओठी यावे नाम, ऋचा महामुनी यांनी भाग्यदा लक्ष्मी बारम्मा, श्रीया महामुनी यांनी दत्त दर्शनाला जायाचं, स्वामी समर्था माझी आई, सुशांत कुलकर्णी यांनी तुझे रूप चित्ती राहो आदी गीतांच्या गायनातून भाविकांना भक्तीत तल्लीन केले. या भक्तीसंगीताचा शेवट निखील महामुनी यांनी तारकमंत्राने केला. त्यांना तबल्यावर गिरीश महामुनी, कीबोर्डवर सुनील जाधव यांनी उत्तम साथसंगत केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ओंकार पाठक यांनी केले तर सूत्रसंचालन किरण पोतदार यांनी केले. उत्कृष्ट निवेदन करुन अभय गोखले यांनी उपस्थितांची दाद मिळविली.

कार्यक्रमाचे व्यवस्थापन विजय पाटणकर, मिनाक्षी महामुनी यांनी केले. यावेळी देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, प्रथमेश इंगळे, मंदार महाराज पुजारी, प्रा.नागनाथ जेऊरे, विजयकुमार कडगंची, शंकरराव पवार, मनोहर देगांवकर, मयुर स्वामी, अक्षय सरदेशमुख, ओंकार पाठक, भिमराव भोसेकर, बाळासाहेब एकबोटे, अंकूश केत, सैदप्पा इंगळे, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, आदीत्य गवंडी, प्रकाश कासेगांवकर, ज्ञानेश्वर भोसले, विपूल जाधव, अविनाश क्षीरसागर, स्वामीनाथ लोणारी, सागर गोंडाळ, प्रा.शिवशरण अचलेर, दिपक जरिपटके, प्रसाद पाटील, श्रीशैल गवंडी, महेश मस्कले, मोहन जाधव, प्रसाद सोनार, मोहन शिंदे, बंडेराव घाटगे, नरसिंग क्षीरसागर, संजय बडवे, चंद्रकांत गवंडी, सुनिल कटारे, संतोष जमगे, खाजप्पा झंपले, महेश मस्कले आदींनी गायन सेवेचा आनंद लुटला.

## डोक्यात दगड फेकून मारल्याने एकाचा मृत्यू



**बार्शी, दि. २३ एप्रिल-**
सर्जापूर येथे दि. २१ एप्रिल रोजी रात्री आठ ते साडेआठ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी अमर अंसर पाटील वय ३८ वर्ष, रा. सर्जापूर याचा चुलता शाहीर इस्माईल पाटील यांना शिवीगाळ करुन दगडाने व काठीने मारहाण केली आणि फिर्यादीचा मुलगा इमरान याला सर्जापूर येथे असलेल्या आमच्या शेतामध्ये बसलेल्या तीन अल्पवयीन मुलांपैकी कोणीतरी इमरान याच्या डोक्यात दगड मारुन त्याला गंभीर जखमी करुन जिवे ठार मारले म्हणून फिर्यादी अमर अंसर पाटील यांनी वैराग पोलिसांत आज दि. २३ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास तीन अल्पवयीन मुलांवर गुन्हा दाखल केला असून या घटनेच्या पुढील तपास वैराग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे हे करत आहेत.

## केगाव-हत्तूर रस्त्यावरील अपघातात क्लिनरचा मृत्यू

**बार्शी, दि. २३ एप्रिल-**
केगाव हत्तूर रस्त्यावर बुधवारी पहाटे ४.३० वाजता झालेल्या ट्रक अपघातात क्लिनरचा मृत्यू झाला. कामराज गणपती जी (वय ४८, रा. धर्मपुरी, तामिळनाडू) असे क्लिनरचे नाव आहे. केगाव-हत्तूर बायपास रस्त्यावरील श्री महादेव राजस्थानी ढाबा समोर बुधवारी पहाटे ४.३० वाजता ट्रकचा अपघात झाला. या अपघातात क्लिनर कामराज हा गंभीर जखमी झाला. त्यास बेशुध्द अवस्थेत पोलीस हवालदार वाल्मिकी यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले असता, उपचारापूर्वीच कामराजचा मृत्यू झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# स्वामींच्या पुण्यतिथी उत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात

### अक्कलकोटमध्ये १४७ वा पुण्यतिथी उत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २३ एप्रिल-**
श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान (मुळस्थान) येथे सालाबादाप्रमाणे यंदाही श्री स्वामी समर्थ महाराजांचा १४७ वा पुण्यतिथी उत्सव शनिवार दिनांक २६ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात व अखंड भक्तीभावात मंदीर समितीच्या वतीने साजरा करण्यात येत असल्याची माहिती मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी दिली.



पुण्यतिथी दिनी पहाटे २ वाजता काकड आरती होईल. तदनंतर श्री स्वामी समर्थांचे नामस्मरण होईल. पहाटे ३ ते ५ या वेळेत नगर प्रदक्षिणा पार पडेल. देवस्थानच्या वतीने श्रींना पारंपारिक लघुरुद्र सकाळी ६ वाजता करण्यात येईल. सत्संग महिला भजनी मंडळ यांच्या भजनाने देवस्थानच्या ज्योतीबा मंडपात नामवीणा सप्ताह समाप्ती सोहळा सकाळी ७ वाजता होईल.. श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी रोजी सर्व स्वामी भक्तांचे दर्शन सुलभतेने होणेकरिता मुरलीधर मंदीर येथील परिसरात तसेच दक्षिण महाद्वारलतच्या दर्शन रांग परिसरात कापडी मंडप व बॅरेकेटींग करुन कायम स्वरूपी दर्शन रांग करण्यात आलेले आहे. वाढत्या गर्दीचे स्वरूप पाहून गेल्या कांही महीन्यांपासून मंदीरात पुरूष, महिला भक्तांना व विकलांग, वयोवृद्ध भक्तांना वेगवेगळ्या रांगेतून दर्शनास सोडण्यात येत आहे. याची अंमलबजावणी श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी रोजीही करण्यात येईल. मंदीरात स्वामी भक्तांच्या वतीने नित्य नियमाने होणारे अभिषेक भाविकांचे दर्शन सुलभतेने होणेकरीता श्री स्वामी पुण्यतिथी रोजी बंद ठेवण्याचे निर्णय मंदीर समितीने घेतला आहे. जे स्वामी भक्त अभिषेकाची पावती करतील त्यांना प्रसाद मिळेल. सकाळी ११ वाजता देवस्थानची महानैवेद्य आरती, ११:३० वाजता अक्कलकोट राजघराण्याच्या वतीने श्रींना महानैवेद्य अर्पण करण्यात येईल.

महानैवेद्य श्रींना दाखविण्यात येईल. दुपारी १२ ते ३ या वेळेत मंदिराच्या पुर्वेकडील उपहारगृहात सर्व स्वामी भक्तांना भोजन महाप्रसाद देण्यात येणार आहे. सायंकाळी ५:३० ते रात्री १० या वेळेत श्रींचा सजविलेला सवाद्य पालखी मिरवणुक सोहळा वटवृक्ष मंदिरातुन निघेल. पालखी मार्ग फत्तेसिंह चौक, मेन रोड, कापड बाजार, कारंजा चौक, बुधवार पेठ, समाधी मठ, परतीचा मार्ग बुधवार पेठ, कारंजा चौक, दक्षिण पोलीस स्टेशन समोरून मौलाली गल्ली, सुभाष गल्ली, गुरु मंदिर, भारत गल्ली, देशमुख गल्ली, स्वामी गल्ली असे असेल. वटवृक्ष मंदिरात रात्री १० वाजता पालखी सोहळा आल्यानंतर देवस्थानच्या वतीने सर्व स्वामी भक्तांना शीरा प्रसाद वाटप करणेत येईल. रविवार दि. २७ एप्रिल रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत मंदिरात गोपाळकाला होवून श्री स्वामी समर्थांच्या १४७ व्या पुण्यतिथी महोत्सवाचा सांगता समारंभ होईल. दिनांक २८ एप्रिल वार सोमवार रोजी मंदिराच्या पुर्वेकडील उपहारगृह येथे सर्व स्वामी भक्त, सेवेकरी, भजनकरी, विणेकरी, प्रभात फेरीस येणारे भाविक, पारायणास बसलेले भाविक, देवस्थान कर्मचारी, सेवेकरी, सर्व पोलीस कर्मचारी, यांना दुपारी १२ ते ३ या वेळेत भोजन महाप्रसाद देण्यात येणार आहे, तरी सर्वांनी श्रींच्या दर्शनाचा, महाप्रसादाचा, पालखी सोहळा सेवेचा, व प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर विश्वस्त समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी केले आहे.

## महत्वाचे...

### रस्ता ओलांडताना कंटेनरची महिलेला धडक

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

माढा तालुक्यातील अरण शिवारातील शेतात जाताना रस्ता ओलांडणा-या महिलेला कंटेनरने धडक दिली. हा अपघात १२ एप्रिल रोजी घडला असून महिला बेशुध्द असून तिच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. रुक्मिणी विष्णु घाडगे (वय ६४, रा. अरण ता. माढा) असे अपघातात जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. १२ एप्रिल रोजी सकाळी ११ च्या सुमारास रुक्मिणी या शेतात जाण्यासाठी घरातून निघाल्या होत्या. शेतात जाण्यासाठी त्यांना रस्ता ओलांडून जावे लागते. दरम्यान रस्ता ओलांडताना कंटेनरची धडक बसल्याने डोक्याला जखम आणि छातीला मार लागल्याने त्यांना खासगी रुग्णालयात उपचारास दाखल केले होते. तेथील डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार बुधवारी दुपारी ३.४५ वाजता शासकीय रुग्णालयात नंदू घाडगे यांनी दाखल केले असून रुग्ण बेशुध्द असल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### महिलेने प्राशन केले गोचीड मारण्याचे औषध

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

शेत जमिणीच्या कारणातून झालेल्या वादानंतर महिलेने गोचीड मारण्याचे औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार मंगळवेढा तालुक्यातील ब्रम्हपुरी येथे बुधवारी दुपारी १.३० च्या सुमारास घडला. सुरेखा बाळू पाराधे (वय ४३) असे महिलेचे नाव आहे. बुधवारी सुरेखा आणि रणजित पाराधे या दोघांमध्ये शेतजमिणीच्या कारणातून वाद झाला. या वादानंतर मानसिक त्रास झालेल्या सुरेखा यांनी गोचीड मारण्याचे औषध प्राशन केले. यात त्रास होऊ लागल्याने मंगळवेढा येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून प्रविध पाराधे याने दुपारी २.४५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### अंगणात झोपलेल्या तरुणाला सर्पदंश

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

राहत्या घराच्या अंगणात झोपलेल्या तरुणाला सापाने दंश केला. हा प्रकार मोहोळ तालुक्यातील पापरी या गावी बुधवारी रात्री १२.१५ वाजता घडला. संकेत मिलिंद गायकवाड (वय १९) असे तरुणाचे नाव आहे. संकेत हा मंगळवारी रात्री घराच्या अंगणात झोपी गेला होता. त्यास बुधवारी रात्री १२.१५ वाजता सापाने दंश केला. हा प्रकार लक्षात येताच त्याला मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून वडील मिलिंद गायकवाड यांनी रात्री १.३० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले असून रुग्ण बेशध्द असल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पिकअपच्या धडकेत दोघे जखमी

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

हैद्रा येथून आचेगावच्या दिशेने येत असताना हैद्रा तांडा येथे समोरून आलेल्या पिकअपच्या चालकाने दुचाकीला धडक दिल्याने आचेगाव येथील दोघे जखमी झाले. हा अपघात मंगळवारी रात्री ९.३० वाजता घडला. शावसिध्द दिलीप गुरव (वय २१) व प्रज्वल भालचंद्र माने (वय २३, दोघे रा. आचेगाव ता द सोलापूर) असे अपघातात जखमी झालेल्या दोघांची नावे आहेत. मंगळवारी शावसिध्द आणि प्रज्वल हे कामानिमित्त हैद्रा येथे गेले होते. तेथील काम आटोपून रात्री ९.३० वाजता ते आचेगावच्या दिशेने दुचाकीवर निघाले होते. हैद्रा तांडा परिसरात आल्यानंतर समोरून आलेल्या पिकअपच्या चालकाने दुचाकीला धडक दिली. या अपघातात शावसिध्दच्या उजव्या पायाला जखम झाली तर प्रज्वलच्या हाताला जखम झाली आहे. वळसंग येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून रात्री १.१५ वाजता राहुल शिंदे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### स्वत: पेटवलेल्या आगीत पडून स्वत: जखमी

**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

शांती चौकातील स्मशानभूमीत साचलेल्या कचरा पेटवून दिल्यानंतर त्या आगीत तोल जाऊन पडल्याने महिला जखमी झाली. हा प्रकार बुधवारी दुपारी तीनच्या सुमारास घडला. मारेम्मा हणमंत म्हेत्रे (वय ६९, रा. बापूजी नगर) असे भाजून जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. मारेम्मा यांनी बुधवारी दुपारी तीनच्या सुमारास शांती चौकातील हिंदू स्मशानभूमीत पडलेला कचरा गोळा गेला. त्यानंतर तो पेटविला असता, तोल जाऊन मारेम्मा यात पडल्याने चेह-याला भाजल्याने दुपारी ४.३० वाजता स्वत; उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# मतदारांना घडतेय लक्ष्मीदर्शन? एका मताला मिळतोय हजारोंचा दर

## ● बाजार समिती निवडणूक रणधुमाळीत मतदार होत आहेत मालामाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ एप्रिल-**

राज्यात शेतमालाच्या विक्रमी उलाढालीसाठी अग्रगण्य असणाऱ्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची पंचवार्षिक निवडणूक लागली आहे. यामध्ये बाजार समितीचे सत्ताधारी विरुद्ध राज्याचे सत्ताधारी अशा दोन्ही पॅनलची थेट लढत होणार आहे. सत्ताधारी आणि विरोधक नेते मंडळी, उमेदवार व कार्यकर्ते मतदारांची गृहभेट घेऊन आपल्या पॅनलला मतदान करण्याचे आवाहन करत आहेत.

दरम्यान, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची पंचवार्षिक निवडणूक ही खऱ्या अर्थाने आता स्वाभिमानाची ठरणार आहे. भाजप पक्षांतर्गत पडलेली फूट नेमकी कोणाला फायद्याची ठरणार आहे. हे पाहणे आवश्यक असणार आहे. भाजप आमदार विरुद्ध भाजप आमदार अशी काट्याची व निर्णायक निवडणूक महत्वाची होणार असल्याने दोन्ही पॅनलच्या बाजूने मतदारांना खुश करण्यात येत आहे. एका मताला हजारो रुपयांचा दर देण्याची तयारी सुरु असल्याची चर्चा कार्यकत्यांमध्ये होत आहे. मात्र, ही चर्चा खरी किती अन् खोटी किती हे मतदानाच्या अगोदरच कळणार आहे. त्याची उत्सुकता आता सर्वांना लागली आहे. दरम्यान, सोलापूर बाजार समितीच्या निवडणुकीत आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, माजी आ. दिलीप माने, सुरेश हसापुरे, राजशेखर शिवदारे यांनी एकत्रित येऊन श्रीसिद्धेश्वर शेतकरी विकास पॅनल तयार केले आहे. तर आ. सुभाष देशमुख यांनी आ. विजयकुमार देशमुख, माजी आ. सिद्धाराम म्हेत्रे, बळीराम साठे, बाळासाहेब शेळके यासह अनेक नेत्यांना सोबत घेऊन श्री सिद्धेश्वर बाजार समिती परिवर्तन पॅनल निवडणुकीच्या मैदानात उत्तरविले आहे. त्यामुळे निवडणूक रंगतदार होणार आहे

यंदाच्या निवडणूकीत दादांनी उडी घेतली आहे. त्यामुळे बाजार समितीची ही निवडणूक दादा विरुद्ध बापू होत असल्याने दोन्ही गटातील नेते, कार्यकर्ते गावस्तरावर जाऊन प्रचार करत आहेत. दोन्ही पॅनलकडून तगडे उमेदवार असल्याने मतदार ऐनवेळी पलटी मारू नये, यासाठी दोन्ही पॅनलकडून मतदारांना मालामाल करण्याच्या अनेक संधी देत असल्याची चर्चा आहे.

### कोट्यवधी रुपयांची उलाढाल

सोलापूर बाजार समितीच्या निवड्णुकीत पाच हजार ४३१ मतदार आहेत. त्यातील तीन हजार मतदारांना आपल्या बाजूने केल्यास बाजार समितीची सत्ता मिळविणे सोपे जाणार आहे. त्यासाठी आ. कल्याणशेट्टी, आ. देशमुख गटाकडून विविध प्रलोभने दाखविण्यात येत असल्याची चर्चा मतदारसंघात आहे. त्यामुळे बाजार समितीच्या निवड्णुकीत कोट्यवधी रुपयांची उलाढाल होणार असल्याची चर्चा वर्तवली जात आहे.






बाजार समिती निवडणुक

## दोन उमेदवारांचा आमदार सुभाष देशमुख यांच्या पॅनलला पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ एप्रिल-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत विरोधकांना एकत्र करण्यात आमदार सुभाष देशमुख यशस्वी झाले आहेत. अनेक दिग्गज नेत्यांना आमदार देशमुख यांनी एकत्र आणले आहे. असे असतानाच आता बाजार समितीच्या निवडणुकीत दोन उमेदवारांनी आ. सुभाष देशमुख यांच्या पॅनलला पाठिंबा दिला आहे.

ग्रामपंचायत आर्थिक दुर्बल घटक विभागातून उमेदवार असलेले युवराज कापसे आणि ग्रामपंचायत सर्वसाधारणमधील अपक्ष उमेदवार आरिफ अबूमिया कुरेशी यांनी आमदार सुभाष देशमुख यांची भेट घेत सिद्धेश्वर बाजार समिती परिवर्तन पॅनलला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. आमदार सुभाष देशमुख यांनी या दोन्ही उमेदवारांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले. यावेळी बाळासाहेब शेळके, जिल्हा सरचिटणीस मनीष देशमुख, जेष्ठ नेते डॉ. चनगोंडा हवीनाळे, भीमाशंकर जमादार, हणमंत कुलकर्णी, धनेश अचलारे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# नामसप्ताहातही आहे महिलाराज; शेळगीत १७ वर्षापासून होतेय नियोजन

## ● लाडक्या बहिणींचा यशस्वी सहभाग, जिल्ह्यातील एकमेव सोहळा

**तभा वृत्तसेवा । श्याम जोशी**
**सोलापूर, दि.२३ एप्रिल-**

येथील शेळगी भागातील मित्रनगरच्या श्री विठ्ठलरूक्मीणी व मारूती मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठापनेच्या वर्धापनानिमित्त गेल्या १७ वर्षापासून होणाऱ्या नामसप्ताहात काकड्यापासून ते हरिजागरापर्यंतच्या सर्व नियोजनात महिलाराज आहे. लाडक्या बहिणींच्या पुढाकारतूनच या नामसप्ताहातील सर्व कार्यक्रमांचे यशस्वी नियोजन व परिचलन केले जाते. महिलांच्या पुढाकाराने होणारा हा जिल्ह्यातील एकमेव नामसप्ताह सोहळा आहे.

गावोगावच्या नामसप्ताहात नियोजनासह सर्व कामांची जबाबदारी पुरूषच घेतात. मात्र सोलापूर येथील शेळगीच्या मित्रनगरातील महिलांनी नामसप्ताहासाठी पदर खोचला अन गेल्या १७ वर्षापासून नामसप्ताहाचे यशस्वी नियोजन केले आहे. जिल्ह्यातील हा एकमेव सोहळा आहे. येथील विठ्ठलरूक्मीणी व मारूती मंदीरात २९ वर्षापूर्वी पहिला नामसप्ताह झाला. त्यावेळी बोरामणी येथील धोंडीरामदादा यांनी याची धुरा सांभाळली. त्यांनी सलग ८ वर्षे बोरामणी येथील वारकऱ्यांसह हा सोहळा सांभाळला. त्यानंतर मात्र त्यांना प्रकृतीमुळे शक्य होईना. त्यामुळे स्थानिकांना त्यांनी हा सोहळा सुरू ठेवण्याचे आवाहन केले. परंतु येथील पुरूषांचा विशेष रस दिसला नाही.



तेंव्हा महिलांनी पुढाकार घेतला अन सोहळा सुरू ठेवण्याचा निर्धार केला. या महिलांनी श्री. रूक्मीणी महिला भजनी मंडळाची स्थापना केली. येथील अनिता तंबाके यांच्या अध्यक्षतेखाली गेल्या १७ वर्षापासून महिलांच्याच नेतृत्वाखाली हा नामसप्ताह होत आहे. त्यासाठी उपाध्यक्ष मीरा निकम, खजिनदार चंदाराणी चिकमनी, सचिव हभप महादेवी महाराज पवार, गुरूदेवी हंजगे, सविता सगर, सुरेखा बुऱ्हाणपुरे, काशिबाई चव्हाण, प्रभावती गवळी, विमल अंधारे, नंदाबाई चोपडे, सविता सुरवसे, आरती सुरवसे या महिलांचा विशेष पुढाकार असतो. नामसप्ताहात वारकरी परंपरेनुसार पहाटे काकडारती पासून ते रात्री हरिजागरापर्यंत कार्यक्रमाचे नियोजन ठरलेले असते. त्याचे योग्य नियेजन करणे व त्याचा योग्य क्रम सांभाळणे महत्वाचे असते. त्यानुसार या महिलांनी त्याचे पालन करण्याचे ब्रीद सांभाळले आहे.

यंदाही दि.१७ ते २३ एप्रिल दरम्यान या नामसप्ताहाचे आयोजन महिलांनी यशस्वीरित्या केले. त्याची सांगता आज दि.२३ एप्रिल रोजी हभप मन्मथ महाराज बहिरमल उळेकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. यंदा नामसप्ताहात हभप महादेवीताई पवार, हभप दत्तात्रय वैद्य (शिरापूर), हभप गोपाळ महाराज कुंभार (वडजी), हभप श्याम महाराज जोशी (कासेगाव), हभप ज्ञानेश्वर महाराज चव्हाण (शिरापूर), हभप नवनाथ महाराज गायकवाड (घट्टेवाडी) यांची प्रवचनसेवा झाली. तर हभप बंडू महाराज कोरे (देगाव), हभप योगेशबप्पा इंगळे (धाराशीव), अ.भा. वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप सुधाकार महाराज इंगळे(सोलापूर), हभप सज्जन महाराज नेटके, हभप ज्ञानेश्वर महाराज चव्हाण (शिरापूर), हभप दत्तात्रय महाराज क्षिरसागर(उळे) यांची कीर्तनसेवा झाली. नामसप्ताहात गोपाळ सुरडे, जयराम सुरवसे, मनोज सगर, शुभम चव्हाण, शिवाजी सावंत यांनी मृदंगाची साथसंगत केली. महिलांच्याच नेतृत्वात संपन्न झाला. हरिपाठसेवा विमल अंधारे, नंदा चोपडे यांनी केली. काकडारती सेवा चंदाराणी चिकमनी व सुरेखा बुऱ्हाणपुरे यांनी केली. तर पारायण व्यासपीठचालक सेवा गुरूदेवी हंजगी यांनी केली. ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणासाठी २७ महिला व युवतींचा सहभाग होता. श्रीराम सुरवसे, आनंद चव्हाण, सिध्दाराम सगर, अशोक गवळी, सुरेखा चौधरी, अनिल तंबाके, पवन बिराजदार, महादेव गरड, कल्पना बंडगर, सिध्दाराम पवार, स्वाती हवले, शंकर चव्हाण यांनी पंगत दिली. तर महाप्रसादाची पंगत परमशेट्टी, सुपेकर, हत्ती, विभूते, भोगडे, जाजूशेठ यांच्यावतीने देण्यात आली.



आम्ही महिला एकत्रित याचे नियोजन करतो. त्यातून दररोजची जबाबदारी घेऊन कार्यक्रम यशस्वी करतो. मंडळातील सर्व महिलांचा यासाठी मोठा सहभाग असतो. त्याला परिसरातील सर्वांची साथ मिळते.

**- अनिताताई तंबाके,**
अध्यक्षा, रूक्मीणी महिला भजनी मंडळ, शेळगी



दररोजचे नियोजन करण्यामध्ये घरचे काम बघुन महिलांना सहभाग द्यावा लागतो. तरीपण आम्ही सर्वजण एकोप्याने हा भार पेलतो. दररोजच्या खर्चाचे नियोजन अगोदरच करून त्याची जबाबदारी वाटून घेतली जाते.

**- हभप महादेवी पवार,**
सचिव, रूक्मीणी महिला भजनी मंडळ, शेळगी

## पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाच्यावतीने ग्रंथ दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**


पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने जागतिक ग्रंथ दिन उत्साहात पार पडला. संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि मान्यवरांच्या हस्ते ग्रंथालयाचे जनक एस आर रंगनाथन यांच्या प्रतिमेचे आणि ऐतिहासिक ग्रंथांचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

वाचनालयाचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी म्हणाले ग्रंथालयामध्ये ३५ हजार पुस्तके उपलब्ध आहेत. या व्यतिरिक्त साप्ताहिक, मासिक, पाक्षिक आणि वार्षिकी स्पर्धा परीक्षा मासिके देखील उपलब्ध आहेत अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांना फायदा होत आहे. कार्यक्रमासाठी ज्येष्ठ संचालक जनार्दन कारमपुरी माजी महापौर, सहकार्यवाह विजयकुमार गुल्लापल्ली, विवेक शिंदे, गणपत कुरापाटी, अशोक इंदापुरे, वासुदेव इप्पलपल्ली सर, यल्लादास गज्जम, यल्लप्पा येलदी, ऋषिकेश अंबट उपस्थित होते. अरविंद चिन्नी यांनी आभार मानले.



### आसरा पुलावर दोन दुचाकींची धडक

**सोलापूर :** आसरा पुलावर दोन दुचाकींची धडक होऊन झालेल्या अपघातात एकजण जखमी झाला. याबाबत शंकर वसंत जोकारे (रा. कंदलगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन प्रदीप सिध्दाराम माळी (वय २१, रा. आहेरवाडी) याच्याविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. १९ एप्रिलला शंकर जोकारेचा भाऊ दत्तात्रय हे त्यांच्या दुचाकीवरून आसरा पुलावरून जात होते. त्यावेळी प्रदीप माळी याने त्याच्या ताब्यातील एमएच १३ ईआर ६७८९ ही दुचाकी भरधाव चालवून जोकारे यांच्या दुचाकीला जोरदार धडक देऊन त्यांना जखमी केले. हवालदार मणुरे तपास करीत आहेत.

श्रीक्षेत्र तेर येथील संत गोरोबाकाका यांच्या समाधी सोहळा यात्रेस येणाऱ्या सर्व भाविक भक्तांचे
हार्दिक स्वागत
ग्रामपंचायत कार्यालय, तेर
ता.जि. धाराशिव

| सरपंच | उपसरपंच | ग्रामविकास अधिकारी |
| --- | --- | --- |
| सौ. दिदी लोकेश काळे | श्री. श्रीमंत रमेश फंड | श्री. बाबासाहेब खोचरे |

सदस्य :-
सौ. सुवर्णा भास्कर माळी, सौ. लतीफा जहांगीर कोरबू, सौ. राजकन्या किशोर काळे, सौ. गिताजंली प्रवीण साळुंके, सौ.अर्चना संजय लोमटे, सौ. भाग्यश्री धनंजय आंधळे, सौ. जयश्री अभिमान रसाळ, सौ. प्रियंका लखन रसाळ, श्री. अविनाश बिभीषण आगाशे, श्री. प्रतीक शिवाजी नाईकवाडी, श्री. नवनाथ फुलचंद पसारे, श्री. रामा हरीचंद्र, कोळी, श्री. अजीत साहेबराव कदम, श्री. बापूराव लक्ष्मण नाईकवाडी.

... शुभेच्छूक ...
ग्राम पंचायत कार्यालय
तेर, ता.जि. धाराशिव



श्रीक्षेत्र तेर येथील संत गोरोबाकाका यांच्या समाधी सोहळा यात्रेस येणाऱ्या सर्व भाविक भक्तांचे हार्दिक स्वागत
शुभेच्छूक
सौ. रुपाली रु. कोरे-बारवडे, सहा. धर्मादाय आयुक्त तथा प्रशासक
श्री. अतुल नळणीकर, निरीक्षक
श्री. संत गोरोबा काका व शिवमंदिर ट्रस्ट,
तेर, ता. धाराशिव कार्यालयीन संपर्क : ९९२२२२९२०७

॥ २३ वा स्मृतिदिन ॥



स्व. श्रीमान भाऊसाहेब (हिरालाल) गांधी
जन्म : १७ नोव्हेंबर १९२५ । स्वर्गवास : २४ एप्रिल २००२

आम्ही पाहिले शिक्षणमहर्षी,
ज्ञानरूपी दीप तेवत ठेवणारे,
अहिंसा-समता जीवनभर जपणारे।
निष्काम कर्मयोगी, त्यागमार्गी,
सत्य-धर्माच्या वाटेने जाणारे।
भाऊसाहेबांना विनम्र अभिवादन!
भाऊसाहेबांचे पुण्यस्मरण,
प्रेरणादायी॥

वालचंद शिक्षण समूह, सोलापूर


हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अक्षय तृतीयानिमित्त ३० एप्रिलला सोलापुरात येणार बसवज्योत



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**
अक्षय तृतीयानिमित्त बुधवार दि. ३० एप्रिल रोजी सकाळी ६.०० वा. बसवकल्याण येथे बसवेश्वर मंदिरामध्ये बसवज्योत प्रज्वलित करुन ही बसवज्योत यात्रा सर्व भक्तमंडळाच्या साहय्याने सोलापूरकडे प्रस्थान करण्यात येणार आहे.

ही ज्योत बंगला, उमरगा, जळकोट, नळदुर्ग, बोरामणी मार्गे सोलापूर येथे दुपारी ४.०० वा. आगमन सोलापूर मार्केट यार्ड येथे येणार आहे. ही ज्योत मार्केट यार्ड-भुलाभाई चौक जुना आडत बाजार मिठ गल्ली चाटी गल्ली मार्गे मल्लिकार्जुन मंदिर येथून महात्मा बसवेश्वर चौक, सोलापूर येथे येणार आहे. तरी या बसवज्योतच्या कार्यक्रमाचे लाभ घेण्याकरिता नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहणेबाबत संयोजक शिवपुत्र जमादार यांनी आवाहन केले आहे.



### महत्वाचे...

### गंजी कारखान्याजवळून दुचाकी चोरीस

**सोलापूर दि. २३ एप्रिल**
शहरातील एमआयडीसी परिसरातील गंजी कारखान्याजवळून चोरट्याने २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत रमेश सोमनप्पा नंदर्गी (वय ५३, रा. भारतरत्न इंदिरा नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ एप्रिल रोजी सकाळी रमेश नंदर्गी यांनी त्यांची एमएच १३ सीजी ५८०७ क्रमांकाची दुचाकी ही गंजी कारखान्याजवळ हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार भांगे पुढील तपास करीत आहेत.

### कारच्या धडकेने दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर दि. २३ एप्रिल**
शहरातील उध्दव नगर येथे कारच्या धडकेने दुचाकीस्वार जखमी झाला. याबाबत गौरीशंकर परशुराम जमखंडीकर (वय ४३, रा. प्रल्हाद नगर, विजापूर रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कार गाडी क्र. एमएच १३ सीएम ८४१८ क्रमांकाच्या चालकाविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ एप्रिल रोजी रात्री गौरीशंकर जमखंडीकर हे त्यांच्या दुचाकी क्र. एम एच १३ सीवाय १२०६ क्रमांकाच्या दुचाकीवरून दावत चौक ते घराकडे जात होते. उध्दव नगर येथे समोरून विरूध्द दिशेने भरधाव येणाऱ्या कार गाडी क्र. एमएच १३ सीएम ८४१८ क्रमांकाच्या चालकाने कार भरधाव चालवून जमखंडीकर यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यामध्ये जमखंडीकर यांच्या पायाचे व हाताचे हाड मोडून फ्रॅक्चर होऊन गंभीर जखमी झाले. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.



# पहलगाम हल्ल्याप्रकरणी सोलापुरात राजकीय पक्षांचा निषेध

## ●पाकिस्तानचा झेंडा जाळला, पाकिस्तानची अंत्ययात्रा काढून केला निषेध



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २३ एप्रिल**
पहलगाम अतिरेकी हल्ल्याच्या व पाकिस्तानच्या निषेधार्थ भाजपच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पाकिस्तानचा झेंडा जळत घोषणाबाजी करण्यात आली.आमदार विजयकुमार देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानी अतिरेक्यांच्या भ्याड कृत्याचा तीव्र घोषणाबाजी करत निषेध करण्यात आला. पाकिस्तानचा झेंडा पायदळी तुडवून जाळण्यात आला.

हा हल्ला २८ लोकांवर नाहीतर संपूर्ण हिंदुस्थानावर केलेला हल्ला आहे. पाकिस्तानला जशास तसे उत्तर दिले पाहिजे, असे आवाहन आ. विजयकुमार देशमुख यांनी केले. वेळ प्रसंगी पाकिस्तानला संपवून टाकण्यासाठी सरकारच्या बरोबरीने लढा देऊ अशी भावना ही व्यक्त केली. पर्यटकाना धर्म विचारून मारण्यात आले. आता सर्व हिंदूंनी एकत्र येण्याची गरज असल्याचे मत भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी माजी आमदार नरसिंग मेंगजी, माजी सभागृह नेता शिवानंद पाटील संजय कोळी, राजकुमार पाटील, मोहन डांगरे देविदास बनसोडे, प्रवीण दर्गोपाटील, गणेश साखरे, ज्ञानेश्वर कारभारी, सुजित चौगुले शिवराज पवार, वैभव बिराजदार यांच्यासह सोलापूर शहर भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शिवसेना उबाठा पक्ष**

जम्मू काश्मीर येथील पहेलगाममध्ये जिहादी दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ शिवसेना उबाठा पक्षाकडून पाकिस्तानचा झेंडा जाळत व अंत्ययात्रा काढून तीव्र निषेध नोंदवण्यात आला.

पहेलगाम प्रकरणी शिवसेना उबाठा पक्ष आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. प्रारंभी धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज चौकात शिवसैनिकांनी पाकिस्तानचा निषेध करत घोषणा दिल्या. यावेळी शिवसैनिकांनी पाकिस्तानच्या झेंड्याला चपलेचा हार घातलेले फलक हाती धरले होते. यावेळी पुरुषोत्तम बरडे म्हणाले, जिहादी दहशतवाद्यांनी जम्मू कश्मीरमध्ये गेलेल्या हिंदूंना त्यांचा धर्म विचारून गोळ्या घातल्या हे निषेधार्ह आहे. भारताने त्वरित अशा दहशतवाद्यांवर कठोर कारवाई करून पाकिस्तानात घुसून संबंधितांना ठार मारले पाहिजे. तसेच भारतात राहून या दहशतवाद्यांना मदत करणाऱ्यांनाही तत्काळ संपवले पाहिजे. आगामी काळात बिहारच्या निवडणुका होणार आहेत.

या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा हल्ला झाल्याने हा हल्ला राजकीय हेतूने प्रेरित आहे का? अशीही शंका येत आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी पाकिस्तानला त्वरित धडा शिकवावा.

यावेळी शिवसेनेतर्फे धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज चौक ते छत्रपती श्री शिवाजी महाराज चौकापर्यंत पाकिस्तानचा झेंडा गुंडाळलेली तिरडी घेऊन अंतयात्रा काढण्यात आली. तसेच या तिरडीचे दहन छत्रपती श्री शिवाजी महाराज चौकात करण्यात आले. याप्रसंगी गणेश वानकर, दत्तात्रय वानकर, ज्ञानेश्वर सपाटे, महेश धाराशिवकर, आशुतोष बरडे, सुरेश जगताप, विजय पुकाळे, दिनकर जगदाळे, तुषार खंदारे, प्रसन्न नाजरे, धनराज जानकर, रेवण पुराणिक, लहू गायकवाड, योगेश क्षीरसागर, सचिन सुरवसे, रविकांत गायकवाड, कृष्णा सुरवसे, बाळासाहेब माने, नाना मोरे, गजेंद्र माशाळ, शिवा कोळी, प्रशांत कदम, संभाजी कोडगे, रोहित सुरवसे, राहुल परदेशी, अण्णा गवळी, महेश गवळी, अजय अमनूर, विष्णुदास जवंजाळ, गणेश खानापुरे, संदीप भोसले, ओंकार सुतार, पंकज रणदिवे, लक्ष्मण शिंदे आदीसह बहुसंख्येने शिवसैनिक व हिंदुत्ववादी युवकांची उपस्थिती होती.

**शिवसेना शिंदे गट :** जम्मू-काश्मीर मधील पहलगाम येथे पर्यटकावर अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ शिवसेना सोलापूर शहर-जिल्हाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक सोलापूर येथे तीव्र घोषणाबाजी करत निषेध व्यक्त करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.शिवाजी सावंत, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, मनोज शेजवाल, संजय सरवदे, तुकाराम मस्के, नाना शिंदे, अक्षय बिद्री, ब्रह्मदेव गायकवाड, सुजीत खुर्द, धनाजी भोसले, साहेबन्ना तेग्गेळी, सचिन दुधनकर, राजकुमार शिंदे, रूपाराणी चव्हाण, अनिताताई गवळी, मारताताई असादे, अश्विनीताई भोसले, बाळासाहेब बिडकर, प्रशांत वायकसकर, राजेश सावंत, कपिल देव कोळी, शरद काटे, प्रशांत येवले, प्रकाश अवस्थी, करण कोळेकर, सचिन पाटील, अतुल लोंढे, राघू कातळे, खलील शेख, योगेश पवार, महादेव सावंत, महेश गायकवाड, प्रभाकर गायकवाड, साई पाटील, दिनेश जगताप, संतोष शेळगीकर, प्रतीक घोडके, कुणाल दीक्षित, अमोल कदम, यशवंत कोळेकर, योगेश सलगर, पैलवान भोसले, शिवराज विभुते, काशिनाथ स्वामी आदी शिवसैनिक उपस्थित होते.




**काँग्रेस पक्ष :** जम्मू-काश्मीरच्या पहलगाम परिसरात निष्पाप पर्यटकांवर झालेला दहशतवादी हल्ला हा अत्यंत संतापजनक, निंदनीय व भ्याड प्रकार आहे. निःशस्त्र, निरपराध नागरिकांना लक्ष्य बनवणे ही मानवतेविरुद्धची कृती असून अशा क्रूरतेचा काँग्रेस भवन सोलापूर समोर जाहीर निषेध करण्यात आला. तसेच काँग्रेस भवनमध्ये या हल्यात मृत्युमुखी पडलेल्या देशवासीयांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी भ्याड हल्ला करणाऱ्या अतिरेक्यांचा जाहीर निषेध करत पाकिस्तान मुर्दाबादच्या व भारत माता की जय या घोषणा देण्यात आल्या. शहराध्यक्ष चेतन नरोटे म्हणाले की, जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे घडलेला दहशतवादी हल्ला हा अत्यंत निंदनीय असून, या भीषण हल्ल्यात निष्पाप पर्यटकांचा गेलेला बळी हृदय पिळवटून टाकणारा आहे. या अमानुष कृत्याचा सोलापूर शहर काँग्रेस पक्षाच्या तीव्र निषेध करत आहोत आणि शहीद झालेल्या सर्व नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत आहोत.या निषेध आंदोलनात शहर महिला अध्यक्षा प्रमिला तुपलवंडे, माजी महापौर आरिफ शेख, अलका राठोड, प्रदेश सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष सुदीप चाकोते, ब्लॉक अध्यक्ष देवा गायकवाड, बाबुराव म्हेत्रे, अल्पसंख्यांक विभाग अध्यक्ष जुबेर कुरेशी, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे आदींसह पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते.




**डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरण**

# मनिषा मुसळेच्या पोलिस कोठडीत दोन दिवसांची वाढ

### मनिषा माने-मुसळेविरूध्द २७ जणांचे हॉस्पिटल प्रशासनाकडे तक्रारी अर्ज

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल -**
एस. पी. इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरो सायन्सेसचे संस्थापक तथा प्रसिध्द मेंदू विकारतज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या मनिषा माने-मुसळे या महिलेच्या पोलिस कोठडीत दोन दिवस वाढ करण्याचा आदेश मुख्य न्यायदंडाधिकारी विक्रमसिंग भंडारी यांनी दिला. दरम्यान, पोलिसांनी केलेल्या तपासात मनिषा मुसळेविरुध्द हॉस्पीटलमध्ये काम करणाऱ्या २७ कर्मचाऱ्यांनी हॉस्पीटल प्रशासनाकडे तक्रारी अर्ज केल्याचे निष्पन्न झाले आहे.

मनिषा महेश माने उर्फ मुसळे (य ४५, रा. ८०, बसवराज नेले नगर, जुळे सोलापूर) असे वाढीव पोलिस कोठडी मिळालेल्या महिलेचे नाव आहे. मनिषा हिस सदर बझार पोलिसांनी डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येप्रकरणी १९ एप्रिल रोजी रात्री न्यायालयाच्या परवानगीने अटक केली आहे. पोलिस कोठडीची मुदत संपल्याने बुधवारी दुपारी मनिषा माने हिस पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले होते.





मेंदू विकार तज्ञ डॉ. शिरीष पद्माकर वळसंगकर (वय ७०, रा. १५८ सी, रेल्वे लाईन, सोलापूर) यांनी १८ एप्रिल २०२५ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरातील स्वतःच्या बेडरूमला अटॅच असलेल्या बाथरूममध्ये स्वतःच्या परवाना असलेल्या पिस्टलमधून कानशिलामध्ये गोळी घालून घेऊन आत्महत्या केली आहे. डॉ. वळसंगकर यांनी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीनुसार, ज्या माणसाला मी शिकवून आज ए ओ केले आहे आणि चांगला पगार देतो आहे, त्याने खोटारडे आणि घाणेरडे आरोप करून मला धमकावले आहे, त्याचे मला आतीव दुःख आणि म्हणून मी माझे जीवन संपवत आहे, असे लिहून आत्महत्या केली. त्यामुळे याप्रकरणी डॉ. अश्विन शिरीष वळसंगकर (वय ४५, रा. वळसंगकर हॉस्पीटल, मोदी रेल्वे क्रॉसींग, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मनिष माने-मुसळे हिच्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी मनिषा मानेला अटक केली. न्यायालयाने मनिषा मानेला २३ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली होती.

पोलिस कोठडीची मुदत संपल्याने सदर बझार पोलिसांनी मनिषा मानेला बुधवारी दुपारी पुन्हा न्यायालयात हजर केले होते. यावेळी पोलिसांनी पुढील तपासासाठी वाढीव तीन दिवसाची पोलिस कोठडी मागितली होती. परंतु, न्यायालयाने दोन दिवसाची वाढीव पोलिस कोठडी दिली. या गुन्ह्याचा तपास पोलिस निरीक्षक अजित लकडे करीत आहेत. यप्रकरणात सरकारच्यावतीने ॲड. अमर डोके यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड. प्रशांत नवगिरे काम पाहात आहेत.

### पोलिसांनी या वस्तू केल्या जप्त...

- बाथरूममधील घटनास्थळावर मिळून आलेले एक जिवंत काडतूस.
- घटनास्थळावर मिळून आलेले फायर झालेली पुंगळी.
- घटनास्थळावरील रक्त सदृश्य डागाचा नमुना.
- पांढऱ्या रंगाचा रक्ताचे डाग असलेला टर्किस्ट टॉवेल.
- पांढऱ्या रंगाचा रक्ताचा डाग असलेला टर्किस्ट नॅपकिन.
- १९ अर्धवट ओढलेल्या जळालेल्या सिगारेट व अर्धवट जळालेल्या माचिसच्या काड्या.
- एक बुलेट मधील शिसे.
- एक बुलेटचे वरील तांब्याचे अवरण.
- बेडरूममधून एक ॲपल कंपनीचा काळ्या रंगाचा मोबाईल.
- एक ग्रे कलरचा ॲपल कंपनीचा मोबाईल.
- एक सॅनडीस्क कंपनीचा काळ्या लाल रंगाचा पेनड्राईव्ह.
- एनएफ असे पिस्टल ग्रीपवर लिहलेले काळ्या रंगाचे लोखंडी पिस्टल मॅगझीनसह.
- दोन ०७.६५ एमएम च्या जिवंत काडतुसे



### या मुद्यांवर होणार पोलिसांचा तपास...



मनिषा माने हिने हॉस्पीटलमध्ये कार्यरत असताना प्रशासनामध्ये डॉक्टरांच्या परवानगीशिवाय स्वतःच्या मर्जीने बरेचशे फेरबदल आणि डॉक्टरांच्या विरोधात लोकांना भडकविण्याचे व मानसिक त्रास देण्याचे कृत्य केले आहे. तसेच स्वतःचे वर्चस्व निर्माण करण्याचा अप्रत्यक्षपणे हॉस्पीटल प्रशासनावर दबाव व अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्याआडून आणखीन काही गैरकृत्य केले आहे काय त्याबाबतच अधिक चौकशी करून पुरावा गोळा करणे.

- मनिषा माने हिने डॉ. शिरीष वळसंगकरांवर केलेले खोटारडे व घाणेरडे आरोपांमध्ये तिचा हेतू व उद्देश काय होता.
- मनिषा माने हिस या कृत्यामागे कोणी मदत केली आहे काय, तिचे साथीदार कोण आहेत.
- मनिषा माने हिने डॉ. वळसंगकर यांना कशा प्रकारे वारंवार मानसिक त्रास दिला.
- मनिषा मानेविरुध्द हॉस्पीटलमधील कर्मचाऱ्यांनी दिलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने तपास व त्याची सत्यता पडताळणे.

# सिध्दु काळे एमपीडीएअंतर्गत स्थानबध्द

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल -**
शहरातील विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत घरफोडीचे गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार सिध्दु काळे यास पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी एमपीडीए कायद्यान्वये येरवडा कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश दिले. काळे यास घेऊन पोलिसांचे पथक येरवडा कारागृहाकडे रवाना झाले आहे.



सिध्दु शामराव काळे (वय ३९, रा. मुळेगाव, जगदंबा नगर, दक्षिण सोलापूर सध्या रा. चिंचोळी एमआयडीसी, ता. मोहोळ) असे येरवड्यात स्थानबध्द करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. सिध्दु काळे याच्यावर मागील काही वर्षापासून सातत्याने जीवघेण्या घातक शस्त्राने दुखापत करणे, जबरी चोरी करणे, घरफोडी करणे, बेकायदेशीर जमाव जमवणे, दगडफेक करणे आणि घातक शस्त्राने धमकाविणे असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. सिध्दु काळे हा त्याच्या साथीदारांच्या मदतीने गुन्हे करीत असून त्याच्यावर शहरातील एमआयडीसी, जोडभावी पेठ, विजापूर नाका आणि फौजदार चावडी पोलिस ठाण्यात १४ गुन्हे दाखल आहेत. त्याच्या गुन्हेगारी कृत्यामुळे शहरात त्याची दहशत निर्माण झाली आहे.

त्यामुळे सिध्दु काळे यास त्याच्या गुन्हेगार कारवायापासून परावृत्त करण्यासाठी सन २०२३ मध्ये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. त्यानंतरही काळे याने त्याच्या वर्तनात सुधारणा न करता गुन्हेगारी कृत्ये चालूस ठेवली होती. त्यामुळे त्याच्यावर एमपीडीए कायद्यान्वये कारवाई करून त्याला येरवडा कारागृहता स्थानबध्द करण्याबाबतचा प्रस्ताव एमआयडीसी पोलिसांकडून पोलिस आयुक्तांकडे पाठविण्यात आला होता. त्यास पोलिस आयुक्तांनी मंजुरी देत काळे यास कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश दिले. ही कारवाई उपायुक्त डॉ. दिपाली काळे, विजय कबाडे, सहायक आयुक्त राजन माने, प्रताप पोमण, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे, प्रमोद वाघमारे, सहायक पोलिस निरीक्षक तुकाराम घाडगे, हवालदार विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव, विशाल नवले यांनी केली.






# घरकुलासाठी ५० हजारांचे वाढीव अनुदान

## लाभार्थ्यांमध्ये समाधान; मोफत वाळू उपलब्ध करून देण्याची मागणी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २३ एप्रिल-

प्रधानमंत्री आवास योजना आणि स्वच्छ भारत आणि मनरेगा या तिन्ही योजनेतून मिळणाऱ्या अनुदान रकमेतून बांधकाम करणे अशक्य होते. त्यामुळे जिल्ह्यातील हजारो मंजूर घरकुले अपूर्ण आहेत . याची दखल घेऊन शासनाने त्यामध्ये ५० हजार रुपयांची वाढ केली आहे.

यापुढे भविष्यात घरकुलासाठी वाढीव रक्कम म्हणून ५० हजार अधिक व इतर असे २ लाख ९ हजार रुपये प्रत्येकी लाभार्थ्याना घरकुलासाठी मिळणार आहेत. घरकुल बांधण्यासाठी लाभार्थ्यांना पन्नास हजार रुपये वाढीव अनुदान देण्याचा निर्णय राज्य शासनाच्या ग्रामीण विकास विभागाने घेतला आहे. लाभार्थ्यांना २ लाख ९ हजार रुपयांचे अनुदान मिळणार आहे. मात्र त्याच १५ अनुदानातून हजार रुपये घरावर सौर ऊर्जा यंत्र भरण्यासाठी कपात करून घेण्यात येणार आहे.त्र

ग्रामीण विकास विभागाने वाढीव अनुदानाचा शासन निर्णय काढला आहे. राज्य सरकारच्या विविध योजनेतील ग्राम ीण घरकुल लाभार्थ्यांनी वाढीव अनुदान मिळणार आहे. या निर्णयामुळे अपुऱ्या अनुदानामुळे थांबलेली घरकुलाची कामे वेळेत पूर्ण होतील. पूर्वीची घरकुलासाठी मिळणारी १ लाख २० हजार, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून ९० दिवसांच्या मजुरीपोटी २७ हजार रुपये व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालय बांधण्यासाठी १२ हजार रुपये दिले जातात. ग्रामविकास विभागाच्या निर्णयानुसार ५० हजार रुपये वाढीव मिळणार आहेत. प्रत्येक लाभार्थ्यास आता दोन लाख नऊ हजार रुपये मिळणार आहेत. मात्र सौर उर्जे साठी १५ हजार रुपये त्यातून कपात होणार आहे.

### मोफत वाळू उपलब्ध करून द्या

शासनाने घरकुल योजनेच्या अनुदानात वाढ केल्याने लाभार्थ्यांना आर्थिक भुर्दंड कमी होईल. शिवाय सामान्य नागरिकांना पक्के घरकुल मिळण्यास मदत होईल . मात्र बांधकामासाठी वाळू उपलब्ध होत नसल्याने घरकुल पूर्ण करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे अनेक लोकांचे घरकुल बांधकाम अर्धवट राहिले आहे. म्हणून शासनाने लाभार्थ्यांना मोफत वाळू उपलब्ध करून द्यावे .

- वीरभद्र मेंडगुदले, लाभार्थी, मंद्रूप

### सौर ऊर्जेचा वापर वाढणार

गरजू लाभार्थींना विजेच्या भरमसाठ दरामुळे वीज बिले भरताना आर्थिक अडचण निर्माण होत होती. त्यामुळे शासनाने घरकुल लाभार्थींना सौर ऊर्जेच्या पॅनेलकरिता अनुदान देण्याचाही निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या लाभार्थींच्या घरावर सौर पॅनेल बसणार असून त्या माध्यमातून लाभार्थींना मोफत वीज मिळणार आहे. सौरऊर्जेचा वाढता वापर करून पारंपरिक ऊर्जेवरील ताण कमी करून पर्यावरणाचेही संरक्षण होईल.

### सर्व लाभार्थ्यांना अनुदान मिळणार

घरकुल अनुदान वाढवण्याची अनेक दिवसांपासून मागणी होत होती. वारंवार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत अनुदान वाढ करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली . याची दखल घेत शासनाने ५० हजार रुपयांचे अनुदान वाढवले आहे. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे अनुदान वाटप कार्यवाही केली जाईल.

-डॉ. सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर

# ११ शिक्षक बनले विस्तारअधिकारी

## मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांच्याकडून आदेश

तभा वृत्तसेवा,
सोलापूर , दि. २३ एप्रिल-

गेल्या अनेक महिन्यांपासून रखडलेली विस्तार अधिकाऱ्यांची पदोन्नती झाली आहे. पाच केंद्रप्रमुख, चार मुख्याध्यापक आणि दोन पदवीधर शिक्षक विस्ताराधिकारी झाले आहेत. त्या विस्ताराधिकाऱ्यांना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी तात्काळ नियुक्ती आदेश दिले. त्यामुळे सीईओ जंगम यांचे शिक्षकांमधून कौतुक होत आहे.

जिल्हा परिषदेच्या सर्व विभागाच्या पदोन्नत्या यापूर्वीच पार पाडल्या होत्या. मात्र, विविध शिक्षक संघटनेच्या विरोधामुळे विस्ताराधिकारी पदोन्नती रखडली होती. त्यामध्ये दुरुस्ती करून मंगळवारी शिक्षकांची पदोन्नती करून नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, पदोन्नतीच्या यादीमध्ये सेवा ज्येष्ठतेनुसार प्राधान्य देण्यावरून शिक्षक संघटनांमध्ये एकमत न झाल्याने पदोन्नती प्रक्रिया अनेक महिने रखडली होती. मात्र, सीईओ जंगम यांनी सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नती दिली जाईल, असे आश्वासन शिक्षक संघटनेला दिले होते. त्यानुसार पदोन्नती प्रक्रिया राबविण्यात आली. त्यामुळे सर्व शिक्षक संघटनांनी सीईओ जंगम यांचे अभिनंदन केले आहे. अनेकदा पदोन्नती घेण्यासाठी काही शिक्षक तत्पर असतात. मात्र, अनेक शिक्षक या कटकटीपासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात. शिक्षक संघटनांनी अनेकवेळा पाठपुरावा केल्याने हा विषय मार्गी लागला आहे.

### पदोन्नती झालेले शिक्षक व नियुक्तीचे ठिकाण

बापूराव चव्हाण (करजगी), रामजी पवार (भंडीशेगाव), अमृता कुलकर्णी (मंगळवेढा), मंजू यादव (मुख्यालय), उज्वला नकाते (पिलीव), वर्षा तडकलकर (होटगी), आयुब कलबुर्गी (मंद्रूप), अतुल माने (कुरुल), लकव्वा पुजारी (लक्ष्मी दहिवडी), लहू कांबळे (महूद)

### पदोन्नती प्रक्रियेत सिंहाचा वाटा

प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, प्राथमिकचे शिक्षणाधिकारी कादर शेख, उपशिक्षणाधिकारी रुपाली भावसार यांनी विस्तार अधिकारी पदोन्नती प्रक्रियेत सिंहाचा वाटा उचलला आहे.

विस्ताराधिकारी पदोन्नती प्रक्रिया ही सेवाज्येष्ठतेनुसार राबविण्यात येईल, असे आश्वासन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी दिले होते. त्याप्रमाणे त्यांनी पदोन्नती प्रक्रिया राबवून विस्तार अधिकाऱ्यांना तात्काळ नियुक्ती आदेश दिले आहेत. त्यामुळे सीईओ जंगम, शिक्षणाधिकारी कादर शेख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांचे आभार.

- म. ज. मोरे, शिक्षक नेते



# मनपा मुलांची उर्दू शाळा क्र. ३ येथे कॉम्प्युटर लॅबचे उद्घाटन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २३ एप्रिल-

मनपा मुलांची उर्दू शाळा क्र. ३, सोलापूर येथे नवीन स्थापन झालेल्या कॉम्प्युटर लॅबचे उद्घाटन अश्फाक मोतीवाला, इमरान शेख, मुजम्मिल शहापुरे, हुसेन बाषा शेख यांच्या उपस्थितीत पार पडले.

यावेळी अध्यक्षस्थानी नूर चॅरिटेबल ट्रस्टचे नजीर मुंशी होते. तसेच मेहेविश बागवान व फातिमा बागवान यांना पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झाल्यामुळे व ओलंपियाड आणि जी टी एस परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेले विद्यार्थी सेहान चांदा, खंसा बागवान, अहद बागवान, अर्जीना नाडेवाले यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास पर्यवेक्षक संतोष बुलबुले, पर्यवेक्षक निलोफर सय्यद, मुख्याध्यापिका तबस्सुम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी नाझिया शेख, मेहबूबी शेख, शबनम नदाफ,अल्मास पिरजादे, सनोबर शेख, बीबी हाजरा, सुनिता पवार उपस्थित होते.



# बांधकामातील अनियमितता सर्वेक्षण; पालिका आयुक्तांनी केली पाहणी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२३ एप्रिल-

सोलापूर महानगरपालिकेच्या नगर रचना विभाग व मिळकत कर विभागाच्या वतीने अनाधिकृत बांधकाम, अनधिकृत वापर, बांधकामात बदल आणि कर आकारणी बदलचे सर्वेक्षण संयुक्त मोहीम राबविण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने आज म हापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी रेल्वे लाईन सिद्धेश्वर पेठ शनिवार पेठ,तेलंगी पच्छा पेठ, बेगम पेठ या ठिकाणी आज पाहणी केली. यावेळी उपायुक्त आशिष लोकरे. नगर रचना उपसंचालक मनिष भीष्णूकर, उपअभियंता नीलकंठ म ठपती,विभागीय अधिकारी हिदायत मुजावर , मिळकत कर संकलन विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांच्या सह संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी आयुक्त यांनी बांधकाम परवानगी, मिळकत कर इतर माहिती जाणून घेतली. तसेच यावेळी उपस्थिती असलेल्या अधिकारी यांना बांधकाम परवानगी व मिळकत कर पाहणीच्या अनुषंगाने सूचना दिल्या.

# पद्मशाली संघटनेच्या वतीने बुधवारी सामुदायिक विवाह सोहळा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२३ एप्रिल-

पद्मशाली युवक संघटनेच्या वतीने बुधवार दि. ३० एप्रिल रोजी सायंकाळी ६.३९ वाजता सोलापुरात मोफत सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती प्रेसिडेंट नागेश बोमड्याल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापुरातील अक्कलकोट रोडवरील बोम ड्याल मंगल कार्यालय येथे हा विवाह सोहळा होणार आहे. विवाह सोहळ्यात वधू-वरांना संघटनेकडून संसार उपयोगी साहित्य, वधूस मणी मंगळसूत्र, जोडवे ,शालू आणि वरास सफारी कपडे देण्यात येणार आहे.

या विवाह सोहळ्यासाठी इच्छुक वधू-वरांनी दि. २५ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६.३९ वाजेपर्यंत श्री मार्कंडेय मंदिर, सिद्धेश्वर पेठ, सोलापूर येथे आपली नावे नोंदवावीत. अधिक माहितीसाठी राघवेंद्र आरकाल ९७ ६३ ५५ ९३ २४ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन अध्यक्ष शेखर कटकम यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेत विजय निली, नागेश बंडी, अविनाश शंकू, अंबादास कुडक्याल, शाम आडम, मंगेश फलमारी आदी उपस्थित होते.

# अनुसूचित जातीच्या आरक्षण उपवर्गीकरणासाठी मातंग समाजाचा २० मे रोजी जन आक्रोश मोर्चा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२३ एप्रिल-

अनुसूचित जातीच्या आरक्षण उपवर्गीकरणासाठी सकल मातंग समाज महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने पाच लाख समाज बांधवांसह मंगळवार दि. २० मे रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर जन आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सर्वोच्च न्यायालयाने दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी देशातील अनुसूचित जाती आणि जमातींच्या आरक्षणाबाबत इतिहास निर्णय दिला आहे. अनुसूचित जाती जमातींच्या आरक्षणाच्या अंतर्गत राज्य सरकारला उपवर्गीकरण करता येऊ शकते असं न्यायालयाने या निर्णयात म्हटले आहे. गेल्या ७५ वर्षात महाराष्ट्रात मातंग आणि इतर तत्सम दलित जातींना आरक्षणाचा लाभ मिळाला नाही. आरक्षण वर्गीकरण संदर्भात महायुती सरकारने न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली न्यायिक आयोग १५ ऑक्टोबर २०२४ रोजी नेमला आहे. अद्याप या आयोगाने आपला अहवाल सादर केला नाही. अनुसूचित जातीच्या आरक्षणात अ, ब, क, ड किंवा अ, ब, क किंवा समितीच्या मताप्रमाणे निश्चित प्रारुप तयार करून अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. न्यायिक समितीच्या शिफारशीची अंम लबजावणी करून वर्गीकरणाची प्रक्रिया त्वरित राबविण्यासाठी या आक्रोश मोर्चाचे आयोजन केले आहे. तेलंगणा राज्याने अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करून दुर्बल घटकांना शिक्षण आणि नोकरीच्या सोयी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे महाराष्ट्र शासनाला जागे करण्यासाठी मंगळवार दि. २० मे रोजी आझाद मैदानावर मोर्चाच्या माध्यमातून विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यात येणार आहे. बदर समितीने दोन महिन्यात अहवाल सादर करावा. आरक्षण उपवर्गीकरण होईपर्यंत जून मध्ये होणारी नोकर भरती सरकारने करू नये किंवा स्थगित करावे. अनुसूचित जातीतील ५९ जातींची आजची लोकसंख्या गृहीत धरून वर्गीकरण करावे. क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या शिफारशींच्या अंम लबजावणी करावी. बजेटमध्ये तरतूद करावे आदी मागण्यासाठी आंदोलन करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेत सुरेश पाटोळे, सुधाकर पाटोळे , महादेव भोसले, समाधान आवळे, देविदास कसबे, रोहित खिलारे , टी. एस. शिरसागर, विजय अडसूळ आदी उपस्थित होते.

# पंढरपुरात रविवारी मसापचा शाखा मेळावा

## सोलापूरसह पुणे विभागातील ८४ शाखांचे प्रतिनिधी उपस्थितीत राहणार

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २३ एप्रिल-

महाराष्ट्र साहित्य परिषद पंढरपूर शाखेच्या वतीने रविवार दि. २७ एप्रिल रोजी शाखा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यासह महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे अंतर्गत येणाऱ्या सर्व ८४ साहित्य परिषदांच्या शाखांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती विभागीय कार्यवाह कल्याण शिंदे यांनी दिली.

रविवारी सकाळी १० वाजता श्रीराम मंगल कार्यालय, दूध पंढरी शेजारी, पुणे रोड, इसबावी, पंढरपूर येथे होणार असून शाखा मेळाव्याचे उद्घाटन माढा विधानसभेचे आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी आम दार समाधान आवताडे असतील तर याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार दत्तात्रय सावंत, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष आणि मसाप पुण्याचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. द. ता. भोसले, मनसेचे नेते दिलीप धोत्रे, मसाप पुणे, सोलापूर जिल्हा प्रमुख पद्माकर कुलकर्णी, अँड. जे. जे. कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

शाखा मेळाव्याच्या निमित्ताने दुपारच्या सत्रात पुणे विभागातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाखा प्रतिनिधींशी संवाद साधला जाणार असून इतर शाखांच्या अडी-अडचणी बाबत मार्गदर्शन होईल. यावेळी सोलापूरसह पुणे विभागातील ८४ शाखांमधील प्रतिनिधी यावेळी उपस्थित राहणार आहेत. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ तीन वर्षासाठी पुणे महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे आल्याने या मेळाव्याच्या निमि त्ताने प्राध्यापक मिलिंद जोशी, सुनिताराजे पवार, आणि विनोद कुलकर्णी यांचा यावेळी सन्मान केला जाणार आहे.

दरम्यान शनिवार दि. २६ एप्रिल रोजी सायंकाळी ६-३० वाजता शाखा मेळाव्याच्या निमि त्ताने स्थानिक आणि निमंत्रितांचे कवी संमेलन होणार आहे. अशी माहिती शाखेचे कार्याध्यक्ष अशोक माळी यांनी दिली.

# ज्ञानामृत आनंदलहरी - १०९६

**देवाची चरित्रे दाखविती लीळा ।**
**लाघवाच्या कळा मोहावया ।।**

पोटासाठी देवदेवतांच्या कथा सांगणारे, देवदेवतांची रुपे धारण करणारे बरेच लोक समाजात आहेत. मूळात यांचा हेतूच व्यवहार असल्याने ते खऱ्या अर्थाने स्वतःपासून दूर असतात. जे स्वतःपासून दूर आहेत, ते भगवंताच्या म्हणजेच इतर जीवांच्या जवळ जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. इतरांना सांगणे सोपे आहे, पण स्वतःच्या जीवनात तसे राहणे अत्यंत अवघड आहे. ज्याला हे अवघड काम जमते तोच इतरांना सांगण्यास पात्र ठरतो. पण अशी पात्रता धारण करून सांगणाऱ्यांपेक्षा अपात्र लोकांचीच संख्या जास्त असल्याचे पाहायला मिळते. व्याख्यानातून खूप टिंगल- टवाळी करायची, बायका-पोरांवर अश्लील उदाहरणे द्यायची, लोकांना हसवून फसवायचे असा अनेकांचा उद्योग झाला आहे. अशा व्यावहारिक लोकांबद्दल बोलताना तुकाराम महाराज म्हणतात, देवाची चरित्रे दाखविती लीळा। लाघवाच्या कळा मोहावया।।



राम-रावण कसे लढले? कृष्णाने कंसाला कसे मारले? हा इतिहास सांगण्यापेक्षा रामाने रावणाला, कृष्णाने कंसाला का मारले? या मागचे कारण सांगणे आवश्यक आहे. रामायणातून, महाभारतातून आपल्या जीवनात काय व कसे घ्यावे? रामायण, महाभारत आपल्या जीवनाला कसे लागू पडते ? हे संसारात अडकलेल्या जीवाला सम जावून सांगण्याची गरज असताना पोपटासारखा रामायण, महाभारताचा इतिहास वाचून दाखविला जातो. याचाच अर्थ असा आहे की कांही मार्गदर्शक हे केवळ बहुरुप्यासारखे सोंग घेऊन चरितार्थ साधतात. लोकांच्या भावनेशी, मनावरील वाढत्या ताणाशी यांना काही देणे-घेणे नाही. अशा व्यावहारिक ढोंगी लोकांमुळे चांगल्या महात्म्यांना लोक नाव ठेवत आहेत. चांगल्या व्याख्यात्यांनी, महाराजांनी टिंगल टवाळी करावी व लोकांना हसवावे असे श्रोत्यांना वाटते. श्रोत्यांची अशी भावना निर्माण होण्याला व्यावहारिक, ढोंगी लोक कारणीभूत आहेत. राम-रावणाच्या, कृष्ण-कंसाच्या युध्दभूमीपेक्षा संसाराची युध्दभूमी महाभयानक आहे. संसाराच्या युध्दभूमीत आपणच निर्माण केलेल्या ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, अहंकार आदि शत्रूंशी आपणाला लढायचे आहे. हा लढा कसा लढावा हे फक्त निस्वार्थ साधुसंत, प्रवचन, किर्तनकारच सांगू शकतात. व्यावहारिक ढोंगी लोकांकडून संसाराची युध्दभूमी जिंकण्याचे कौशल्य शिकता येणार नाही. अनेक ढोंगी व्यावहारिक लोक साधू झाले असले तरीही खूप चांगले साधुसंत, प्रवचन, किर्तनकार आजही समाजात आहेत हे विसरू नये.

**जय जय राम कृष्ण हरी।**

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

# सुप्रभात

## आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. २४ एप्रिल २०२५ | वरुथिनी एकादशी, |
| विक्रम संवत् २०८१ | श्री सत्यसाईबाबा पुण्यदिन |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - चैत्र | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. एकादशी (१४.३२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - शततारका (१०.४९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ब्रह्म (१५.५५) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - कौलव (२५.१२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

## राशीभविष्य

**मेष** : व्यावहारिक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नोकरीमधील स्थिती म ध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरुवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांपत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढेल.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफिकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मनःस्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढेल. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या** : लोकांशी संप र्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळता असलेले कामे पूर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निम र्ाण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांपत्य जीवन सुखी राहील.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्म ान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नोकरीम ध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. मानसिक संतोष निर्माण होईल.

# कार्यतत्पर आणि अभ्यासू ताई

**अनेक देशभक्तांच्या त्यागाने, बलिदानाने १९६० साली महाराष्ट्राची निर्मिती झाली. अशा नव्याने झालेल्या महाराष्ट्र स्थापनेच्या आनंदाने प्रेरित होऊन थोर स्वातंत्र्य सेनानी तुळशीदासदादा जाधव यांनी शहराच्या अगदी जवळ बाळे या खेडी गावी शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. त्यावेळी के रंगनाथ मल्हार पाटील १९३६ ते १९७४ बाळे गावचे सरपंच होते. दादाचे व माझ्या वडिलांचे घनिष्ट संबंध होते. हे दोघे ही शेतकरी कामगार पक्षाचे नेते एकेकाळचे नेते होते.**

१९७५ साली आबासाहेबांचे निधन झाले व मला दादा व ताईनी महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळात संचालक म्हणून काम करण्याची संधी दिली. त्याच प्रशालेत माझे माध्यमिक पर्यंत शिक्षण झाले व त्या संस्थेचा संचालक म्हणून मी गेली ३० वर्ष कार्य पहात आहे, ताईना मी फार जवळून पाहिलेले आहे.

ताई त्याच्या कौशल्याने पुरुष मतदार संघातून महिला आमदार म्हणून त्यांनी १९७२ साली आमदार म्हणून सोलापूर जिल्ह्यात पहिला मान मिळवले. ताईनी सामाजिक व राजकिय क्षेत्रात कधिही मागे वळून पाहिलेले नाही. महिला बँक, कागद कारखाना महिलांसाठी शिवण क्लॉस, शैक्षणिक संस्था, प्रिटिंग प्रेस, इत्यादी संस्थेची त्यांनी निर्मिती केली माझ्या दृष्टीने पश्चिम महाराष्ट्रात महिला वर्गातून ऐवढे मोठे कार्य ताईचेच फक्त दिसून येते. १९८० दरम्यान विधान परिषदेवर आमदार म्हणून गेल्यावर अनेक महिला विषयी सामाजिक प्रश्नांची त्यांनी परिषदेत पाठपुरावा केलेला आहे.



एक अभ्यासु महिला म्हणून त्यांनी मान मिळवला आहे. माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, प्रमिला चव्हाण, स्वर्गीय प्रभाराव यांच्या बरोबर त्यांनी विविध प्रश्नांनी विधान परिषद गाजवली. माझ्या ताईना भावी काळ सुखाचा समाजकार्यात भरभराटीला जावो व त्यांना दीर्घ आयुष्य लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

- किशोर पाटील
संचालक, महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे, सोलापूर.

## महत्वाचे...



### जैन मंदिर उद्ध्वस्त करणाऱ्या प्रशासनावर कारवाई करण्याची मागणी

**अक्कलकोट दि.२३ एप्रिल**

भारतीय संविधानात सर्व धर्मीयांना संरक्षण दिले गेले आहे असे असताना विलेपार्ले येथील आरक्षित जागेवरील मंदिर पाडण्यात आले आहे. प्रशासनाच्या विरोधात कठोर कारवाई करून संबंधित अधिकाऱ्यांना बडतर्फ करावी आणि मंदिराची पुन्हा स्थापना करून मंदिराची शोभा वाढवावी अशा प्रकारचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हा दंडाधिकारी यांना वंचित बहुजन आघाडी सोलापूर जिल्ह्यांच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने विलेपार्ले येथील जैन मंदिर चुकीच्या व बेकायदेशीर रित्या त्यांचा क्रूर पद्धतीने बुलडोझर व जेसीबीच्या साह्याने मंदिर उद्ध्वस्त केले आहे. एवढंच नाही तर मंदिर उद्ध्वस्त करताना तेथील धार्मिक ग्रंथ पूजा साहित्याचे विटंबना करण्यात आली आणि मूर्ती देखील भंग करण्यात आली. याप्रसंगी चंद्रशेखर मडीखांबे, अनिरुद्ध वाघमारे, सोहेब सय्यद, बाबासाहेब गायकवाड, सुरेश देशमुख, बाबुराव बनसोडे, मल्लिकार्जुन हिरेमठ, रविराज पोटे, विशाल ठोंबरे, विजय गायकवाड उपस्थित होते.

### सहकारी बँकांच्या बैठकीत पंढरपूर अर्बनचे मुख्य अधिकारी विरधेंचा सहभाग

**पंढरपूर, दि. २३ एप्रिल-**



सहकारात येणाऱ्या अडीअडचणी व अम्ब्रेला ऑर्गनायझेशन संदर्भात महाराष्ट्रातल्या प्रमुख सहकारी बँकांची बैठक मंगळवारी पुणे येथे पार पडली. दरम्यान या बैठकीत पंढरपूर अर्बन बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी उमेश विरधे यांनी सहकारी बँकेच्या अडचणी आणि अन्य विषयक बाबीं संदर्भातील मुद्दे मांडून त्या बाबतचे निवेदन सादर केले. पुणे येथील गणेशखिंड भागातील वैकुंठ मेहता राष्ट्रीय प्रशिक्षण संस्थे मध्ये मंगळवारी (ता.२२) सहकारा मध्ये येणाऱ्या अडचणी व अम्ब्रेला ऑर्गनायझेशन संदर्भात राज्यातील प्रमुख बँकांची बैठक आयोजित आलेली होती. या बैठकीस भारताच्या केंद्र सरकार मधील सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, रिझर्व बँकेचे संचालक सतीश मराठे, सहकार आयुक्त दीपक तावरे, अम्ब्रेला ऑर्गनायझेशनचे चेअरमन ज्योतींद्र मेहता आदी मान्यवर उपस्थित होते. या बैठकी मध्ये येथील पंढरपूर अर्बन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे यांनी सहकारी बँकेच्या अडीअडचणी, ग्री लोनमध्ये एग्रीकल्चर डेव्हलपमेंट फंड योजने अंतर्गत नॉन शेड्युल सहकारी बँक रजिस्ट्रेशन करणे आदि संदर्भातील मुद्दे प्रकर्षाने मांडले. यावेळी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ आणि रिझर्व बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी विरधे यांच्या मुद्यांवर सखोल चर्चा देखील करून त्या संदर्भातील निवेदन देखील स्वीकारले.

### मोहोळ भाजपा मंडल अध्यक्षपदी माने, काळे व दडे

**मोहोळ, दि. २३ एप्रिल-**





भारतीय जनता पार्टीच्या मोहोळ विधानसभेतील तीन मंडल अध्यक्षपदाची निवडणूक प्रक्रिया मोहोळ येथील शासकीय विश्राम गृहामध्ये पार पडली. यावेळी झालेल्या निवडीमध्ये मोहोळ दक्षिण मंडल अध्यक्षपदी रमेश माने, मोहोळ शहर मंडल अध्यक्षपदी सतीश काळे तर माढी मंडल अध्यक्षपदी संभाजी दडे यांची निवड जाहिर करण्यात आली. यावेळी जिल्हा सरचिटणीस शशिकांत चव्हाण, जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे, निवडणूक प्रभारी संतोष मोगले, सिद्धेश्वर कोकरे, इंद्रजीत पवार, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष सुदर्शन यादव, काशिनाथ राऊत, माजी तालुकाध्यक्ष सुनील चव्हाण, माजी नगरसेवक सुशील क्षीरसागर, अनुसूचित जाती मोर्चाचे संजीव खिलारे यांची प्रमुख उपस्थिती होती. मोहोळ विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टी मध्ये यावेळी प्रथमच तीन मंडलअध्यक्ष नेमण्यात आले असून यामध्ये १३९ बूथ चे मिळून मोहोळ दक्षिण मंडल तर १३६ बूथचे मिळून मोहोळ शहर मंडल आणि ६७ बूथचे मिळून मोहोळ माढी मंडल असे विभाग करण्यात आले आहेत. नूतन पदाधिकाऱ्यांमध्ये यापूर्वी रमेश माने यांनी मोहोळ विधानसभा निवडणूक प्रमुख, निरीक्षक म्हणून तर सतीश काळे यांनी यापूर्वी तालुकाध्यक्ष व जिल्हा उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांच्या हस्ते नूतन तालुकाध्यक्षांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर सर्व उपस्थित पदाधिकाऱ्यांनी महापुरुषांना अभिवादन करून जल्लोष केला. यावेळी अविनाश पांढरे, ज्ञानेश्वर भोसले, काशिनाथ कदम, विनायक सुतार, मच्छिंद्र गाडे पाटील, महेश सोवनी, रंगनाथ गुरव, सौदागर खडके, गणेश मुळे, विशाल पवार, संजय वाघमोडे, तानाजी पुजारी, पिंटू राऊत उपस्थित होते.

### ॲट्रासिटी मधील संशयित आरोपीचा अटकपूर्व जामीन मंजूर

**बार्शी, दि.२३ एप्रिल-**

संशयित आरोपी वैभव गोरख कोडलिंगे यांचा जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण प्रकरणात दि.२१ एप्रिल रोजी बार्शी येथील मे. अति.जिल्हा व सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला. फिर्यादी आकाश खुने याने संशयित आरोपी वैभव गोरख कोडलिंगे व इतर आरोपी विरुद्ध जातीवाचक शिवीगाळ करीत लोखंडी गंज व लाथाबुक्यानी मारहाण केल्याप्रकरणी बार्शी शहर पोलीस स्टेशन शमध्ये गु.र.नं. २०८/२५ अन्वये फिर्याद नोंदविली होती. संशयित आरोपी विरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. आरोपीने वकीलांमार्फत बार्शी येथील मे. अति. जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन दाखल केला. सदर जामीन अर्जावर सुनावणी होवून आरोपींच्या वकीलांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन मे.अति.सत्र न्यायाधीश व्ही. के. मांडे यांनी आरोपीचा जामीन अर्ज मंजुर केला.यात आरोपीतर्फे ॲड. अमोल अलाट व ॲड. विशाल गोणेकर यांनी कामकाज पाहिले.

# पंढरपूर बाजार समिती जिल्ह्यात अव्वल

**पणन संचालनालयाची क्रमवारी जाहीर**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ एप्रिल-**

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पा (स्मार्ट) अंतर्गत पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सन २०२३-२०२४ करिताची महाराष्ट्र राज्याची वार्षिक कमवारी जाहिर केली. यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती, पंढरपूरने राज्यस्तरीय पाचवा तर पुणे विभागातून दुसरा क्रमांक तर सोलापूर जिल्ह्यातून पहिला कमांक पटकाविल्याची माहिती पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड व उपसभापती राजू गावडे यांनी दिली

या संदर्भात माहिती देताना सभापती गायकवाड आणि उपसभापती गावडे यांनी सांगितले की, सदर कमवारी करिता प्रकल्प अंमलबजावणी कक्ष पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे वतीने राज्यातील बाजार समित्यांची वार्षिक कम वारी घेण्यात आली. त्यानुसार राज्यातील बाजार समित्यांची तालुका व जिल्हास्तरीय समितीने पडताळणी केलेले बाजार समि त्यांचे कमवारीचे प्रस्ताव संबंधीत जिल्हा उपनिबंधक सो, सहकारी संस्था यांच्या कार्यालयाकडून पणन संचालनालय कार्यालय, म हाराष्ट्र राज्य, पुणे. यांचेकडे प्राप्त झाले होते. गुणांकन पध्दतीनुसार प्राप्त झालेल्या गुणांकनाच्या आधारे राज्यातील ३०५ बाजार समित्यांची सन २०२३-२०२४




या वर्षाची वार्षिक कमवारी जाहिर करण्यात आली आहे. यामध्ये पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीने १५५.५ गुण मिळविले. कर्मयोगी स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या आशिर्वादाने व सोलापूर जिल्हयाचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या नेतृत्वाखाली, उमेश परिचारक, चेअरमन युटोपियन शुगर्स लि., कचरेवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आज पर्यंतचे आजी-माजी सभापती, उपसभापती, संचालक मंडळ, शेतकरी, आडते, व्यापारी, सचिव, अधिकारी, कर्मचारी, हमाल, तोलार व सर्व संबंधीतांचे सहकाऱ्याने पंढरपूर बाजार समितीचे कामकाज उत्तम प्रकारे चालू आहे. २०२२-२०२३ सालामध्ये कृषि उत्पन्न बाजार समितीचा राज्यस्तरीय १२ क्रमांक होता. यामध्ये या वर्षी सुधारणा झालेली आहे. पंढरपूर बाजार समिती नेहमीच शेतकरी यांचे हितासाठी काम करित असल्याचे पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती गायकवाड व उपसभापती गावडे यांनी दिली. त्यांनी सर्व संबंधीतांचे अभिनंदन केले. यावेळी सचिव कुमार घोडके, सहा. सचिव संजय माने, लेखापाल गजेंद्र जोशी उपस्थित होते.

## जातीवाचक शिवीगाळ करून खंडणी मागणाऱ्या तिघांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

सोलापूर सत्र न्यायालयात जातीवाचक शिवीगाळ करून खंडणी मागितल्याप्रकरणी एका महिलेसह तिघांविरुद्ध जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी नागनाथ हरिदास काळे (वय ४९, रा. कुरुल, ता. मोहोळ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मारुती जाधव (रा. कुरुल), मारुती याची पत्नी (नाव माहित नाही), राजाभाऊ गुरुप्रसाद दिंडोरे (रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नागनाथ काळे व त्याचा मित्र प्रमोद अभिमान लांडे हे ७ एप्रिल रोजी कामानिमित्त सोलापूर सत्र न्यायालयात आले होते. त्यावेळी म रूती जाधव, त्याची पत्नी, दिंडोरे या तिघांनी नागनाथ काळे यास जातीवाचक शिवीगाळ करून तु आमच्या गावात जगायला आला आहे, नीट जग, करून खा असे म्हणून शिवीगाळ केली. तसेच प्रमोद लांडे यांना महिलेकडून तुझ्यावर विनयभंगाची केस करतो असे सांगून दोन लाख रुपयांची खंडणी मागितली. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस आयुक्त पोमण पुढील तपास करीत आहेत. याप्रकरणात गुन्हा दाखल झालेल्या मारुती जाधव याच्यावर सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलिसांकडून एमपीडीएअंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे. मारुती जाधव याच्यावर अनेक गुन्हे दाखल असून त्याच्या गुन्हेगारी कारवायांवर अंकुश लावण्यासाठी सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलिसांकडून त्याच्यावर कारवाई करण्यात आली होती.

## बार्शी तालुक्यातील सरपंच आरक्षण जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ एप्रिल-**

बार्शी तालुक्यातील सन एप्रिल २०२५ ते मार्च २०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्राम पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी तालुक्यातील १२९ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण हे सोडत काढून तहसीलदार एफ आर शेख यांनी आरक्षण जाहीर केले. येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात आरक्षण सोडतीचा कार्यक्रम झाला. यावेळी निवासी नायब तहसीलदार सुभाष बदे, निवडणूक नायब तहसीलदार संजीवन मुंडे, महसूल नायब तहसीलदार रविंद्र सानप उपस्थित होते.

बार्शी तालुकयातील १२९ सरपंचपदापैकी ६५ ग्रामपंचायतीचे आरक्षण हे महिलांसाठी तर ६४ ग्रामपंचायतीचे आरक्षण हे सर्वसाधारण (पुरुष/म हिला) आरक्षण जाहीर झाले. त्यामुळे निम्म्यापेक्षा अधिक ग्रामपंचायतीत महिला सरपंच होणार आहेत. बार्शी तालुक्यात सरपंचपदासाठी अनु.जाती साठी एकूण ११ ग्रामपंचायती राखीव असून त्यापैकी ६ ग्रामपंचायती या महिलांसाठी राखीव आहेत. तर सरपंचपदासाठी नामाप्र प्रवर्गासाठी एकूण ३५ ग्राम पंचायती आरक्षित असून त्यापैकी १८ ग्रामपंचायती महिलांसाठी राखीव आहेत. तालुक्यातील ८२ ग्रामपंचायतीचे सरपंचपद खुल्या प्रवर्गासाठी असून यापैकी ४१ ग्रामपंचायती महिलांसाठी राखीव आहेत. १२९ पैकी ४१ ग्रामपंचायतीचे सरपंचपद सर्वांसाठी खुले असून संबंधित गावातील सर्वच प्रवर्गातील पुरुष व महिला सरपंचपदासाठी रिंगणात उतरू शकतात. त्यामुळे या ४१ गावांत सरपंचपदासाठी अधिक चुरस रंगणार आहे.

**सरपंचपदासाठी जाहीर झालेले आरक्षण गावनिहाय :**

**अनु.जाती : सर्वसाधारण :** वांगरवाडी, गौडगांव, मांडेगांव, धामणगांव आ, मळेगांव, अनु. जाती : महिला : जामगांव पा, दहिटणे, तांदुळवाडी, गोरमाळे, दडशिंगे, सावरगांव,

**अनु. जमाती : सर्वसाधारण :** शेलगांव मा, नामाप्र : सर्वसाधारण : पिंपळगांव पान, मुंगशी आर, रातंजन, खडकोणी, भानसळे, वाणेवाडी, घारी, कापसी, महागांव, बोरगांव झा, हळदुगे, ज्योतिबाचीवाडी, कासारवाडी, कासारी, हत्तीज, रऊळगांव, जामगांव आ,

**नामाप्र : महिला :** चिंचोली-ढेंबरेवाडी, कोरेगांव, काटेगांव, भोयरे, ममदापूर, अरणगांव, घाणेगांव, सुर्डी, ढोराळे, मालेगांव, संगमनेर, तुळशीदासनगर, भोईजे, शेलगांव व्हळे, तडवळे, आंबेगांव, कुसळंब, गुळपोळी

**सर्वसाधारण खुला प्रवर्ग : सर्वसाधारण :** आगळगांव, पिंपळगांव धस, गाडेगांव, ताडसौंदणे, बाभुळगांव, चारे, पिंपळवाडी, उक्कडगांव-वाघाचीवाडी, शिराळे, धानोरे, जहानपूर, पांगरी, पांढरी, घोळवेवाडी, नारी-नारीवाडी, सौंदरे, कव्हे, कळंबवाडी पा, गाताचीवाडी-फपाळवाडी, खांडवी-गोडसेवाडी, श्रीपतपिंपरी, साकत, मानेगांव, इर्लेवाडी, तुर्कपिंपरी, यावली, मुंगशी वा, भातंबरे, उपळे दु, झरेगांव, सर्जापूर, रूई, भांडेगांव, सारोळे, उंबरगे, पुरी, पिंपरी आर, नागोबाचीवाडी-लक्ष्याचीवाडी, रस्तापूर, इर्ले, राळेरास,

**खुला प्रवर्ग :** महिला : चुंब, कळंबवाडी आ, बेलगांव, देवगांव, बोरगांव खु, वालवड, पाथरी, पिंपळगांव (पांगरी), येळंब, खामगांव, इंदापूर, तावडी, बळेवाडी, बावी, पानगांव, कोरफळे, अलिपूर, उपळाई ठों, शेंद्री, उंडेगांव, काळेगांव, मालवंडी, सासुरे, तांबेवाडी, हिंगणी पा, निंबळक, लाडोळे, शेळगांव आर, धामणगांव दु, भालगांव, अंबाबाईचीवाडी, आळजापूर, खडकलगांव, कांदलगांव, कारी,घोत्रे, चिखर्डे, पिंपरी (पानगांव), नांदणी, झाडी, मिर्झनपूर

## तडवळे येथे उद्या श्री भगवती देवीचा आराधखाना

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २३ एप्रिल-**

बार्शी तालुक्यातील तडवळेचे जागृत ग्रामदैवत व नवसाला पावणारी आई म्हणून श्री भगवती देवीचा उल्लेख केला जातो. उद्या शुक्रवार रोजी दि. २५ एप्रिलला देवीच्या आराधखान्याचे आयोजन करण्यात आले असून रात्री नऊ वाजता श्री भगवती देवीची छबिना व पादुका मिरवणूक गावातून निघणार आहे. यावेळी छबिन्यापुढे आराध्यांची गाणी, बँड बाजा, संपूर्ण गावात नयनरम्य विद्युत रोषणाई, आकर्षक दारूकाम बघायला मिळणार आहे.

श्री भगवती देवीचा छबिना मि रवणूकीत बावीस गावातील आराधी मंडळ सहभागी होणार असून त्यांच्यामध्ये आराधी गाण्यांची स्पर्धा लावली जाते. आराधखाना दिवशी देवीची मोठ्या भक्तीभावाने पूजाअर्चा करून धार्मिक कार्यक्रम घेतले जातात.

पूजारी आनंद गुरव, कम लाकर क्षीरसागर, तुकाराम गुरव, लहू गुरव श्री भगवती देवीची विविध पूजाअर्चा करतात. सुमारे साडेतीनशे वर्षापूर्वी तडवळे गावाच्या पश्चिमेला असलेल्या भोगावती नदीमध्ये दररोज स्नान



करण्यास जाणाऱ्या महंत बल्लाळ यांच्या हातात देवीची मुर्ती आली. गावकऱ्यांनी आई राजा उदो उदो करीत वाजतगाजत मुर्ती गावात आणून विधीवत पूजा केली. मुर्ती भोवती आकर्षक मंदीर उभारले अशी आख्यायीका सांगितली जाते.

श्री भगवती देवीची मूर्ती अतिशय सुंदर , मनमोहक असून भक्तांना पूजा पूजा डोळे भरून पहावी वाटते . मुर्ती दोन फूट उंचीची शिवकालीन व स्वयंभू आहे.शालीग्राम सारखी मऊ गुळगुळीत चल स्वरूपातील असून अष्टभूजाधारी आहे. देवी सिंहावर आरूढ होऊन दैत्याचा संहार करीत असल्याच्या रूपात आहे. उजवीकडील हातात बाणांचाभाता, सुदर्शन चक्र, खड्ग , त्रिशूल,आहे. तर डावीकडील हातामध्ये शंख ढाल,धनुष्य आणि दैत्याची शेंडी धरली आहे. देवीच्या पायाशी तिचे दैत्य शरण आलेले आहेत.देवीच्या डोक्याला हातात,कानात, कमरेस, पायात विविध अलंकार आहेत.

शुक्रवारी रात्री देवीचा छबीना निघतो. विधीवत पूजा करून गावातील मुख्य मार्गावरून छबिना मिरवणूक निघते. पालखी पुढे पारंपारिक वाद्य, टाळमृदंग आणि आराधी मंडळी गाणी म्हणतात. सध्या यात्रेचे खास आकर्षण विद्युत रोषणाई ठरत असून पालखी मार्गासह संपूर्ण मंदिराला नयनरम्य विद्युत रोषणाई केली जात आहे. ही आकर्षण विद्युत रोषणाई आणि शोभेचे दारूकाम पाहण्यासाठी भाविक मोठी गर्दी करीत आहेत.

या वेळी मंदिरात बावीस गावातील आराधी मंडळांची गाण्याची स्पर्धा रंगते यातून विजेता व उपविजेता ठरवून त्यांचा गौरव केला जातो. या निमित्ताने शनिवारी गावातील यशवंतराव चव्हाण प्रशालेच्या प्रांगणात करमणूकीचा कार्यक्रमही ठेवण्यात आला आहे.

## कुंभेजच्या बागल विद्यालयात झाडांना क्युआर कोड

### जागतिक वसुंधरा दिनानिमित्त जैवविविधता संवर्धन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२३ एप्रिल-**

कुंभेज (ता.करमाळा) येथील दिगंबरराव बागल माध्य. विद्यालयात जागतिक वसुंधरा दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक हनुमंत पाटील होते. महाराष्ट्र शासन व पर्यावरण विभागाने केलेल्या



आवाहनानुसार विद्यालयात हा वसुंधरा दिन आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी शिक्षक कल्याणराव साळुंके यांनी विद्यार्थ्यांना क्युआर कोड, वृक्षांचे महत्व आणि विद्यार्थ्यांची संवर्धनातील भूमिका या बाबी स्पष्ट केल्या. तसेच स्वतः तयार केलेली कृत्रीम घरट्यांचे मॉडेल दाखवण्यात आले. पर्यावरण रक्षणात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना यशकल्याणीनेचर कॉन्झर्वेशनच्या वतीने शालेय साहित्य प्रोत्साहन भेट देण्यात येईल व सहभागी झालेल्या सर्वांना प्रशस्तीपत्रक देण्यात येईल असे जाहीर केले. यावेळी पक्षीनिरीक्षक कल्याणराव साळुंके, सिताराम बनसोडे, संतोष शिंदे, विष्णू पोळ, दादा जाधव, बलभीम वाघम रे, किशोर कदम उपस्थित होते.

> शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यालयात पर्यावरणपूरक विविध प्रासंगिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणस्नेही जीवनशैली विकसित करण्यासाठी विद्यालय आणि संस्थेचे विशेष प्रयत्न आहेत.
> **- कल्याणराव साळुंके,** निसर्ग अभ्यासक शिक्षक

> उपक्रमशील शाळा म्हणून बागल विद्यालय सर्वांना सुपरिचित आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळवून देण्यासाठी मा.मंत्री स्व. दिगंबररावजी बागल यांचा आदर्श घेऊन आम्ही शाळा विकासासाठी प्रयत्नशील आहोत.
> **- दिग्विजय बागल,** जिल्हा नियोजन समिती सदस्य तथा संस्थेचे कार्यकारी विश्वस्त

> प्रथमतः विद्यालयातील वृक्षांची यादी केली नंतर या वृक्षांची माहिती ऑनलाईन स्त्रोतांमधून संकलित केली. त्यानंतर सरांच्या मार्गदर्शनानुसार क्युआर कोड तयार केले. त्यांच्या प्रती काढून नंतर शाळेतील झाडांना चिटकवण्यातळ आल्या. हा कोड मोबाइलने स्कॅन करताच महत्वपूर्ण माहिती तात्काळ मिळते.
> **- पृथ्वीराज कांबळे, विद्यार्थी**

### ईमामीने प्योर ग्लोचा चेहरा म्हणून केली अभिनेत्री राशी खन्नाची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

ईमामी लिमिटेड, ईमामी ग्रुपची प्रमुख पर्सनल केअर आणि हेल्थकेअर कंपनी ईमामी लिमिटेडने ईमामी प्योर ग्लो सादर करुन ४००० कोटिपेक्षा जास्त उलाढालीच्या ब्राइटनिंग क्रीम कॅटेगरीत प्रवेश करण्याची घोषणा केली आहे. ग्राहकांच्या प्रमुख चिंता दूर करण्यासाठी आणि ग्लो सेमेंटची पुनर्परिभाषा करण्यासाठी डिझाइन केलेले एक क्रांतिकारी स्किनकेअर सोल्युशन ब्रँडचे आकर्षण वाढविण्यासाठी आणि देशभरातील ग्राहकांशी जोडण्यासाठी, ईमामीने प्योर ग्लोचा चेहरा म्हणून राशी खन्नाला निवडले आहे. प्रादेशिक आणि हिंदी चित्रपट उद्योगात मजबूत उपस्थिती असलेली राशी खन्ना, ब्रँडमध्ये आकर्षण, आत्मविश्वास आणि सापेक्षता आणते, ज्यामुळे ती नवीन काळातील स्किनकेअर क्रांतिसाठी परिपूर्ण बनते.

## अक्कलकोटमध्ये गायक योगेश रामदास यांची सेवा

### धर्मसंकीर्तन महोत्सव : श्रीवटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२३ एप्रिल-**

येथे श्री स्वामी समर्थ महाराजांच्या १४७ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने आयोजित धर्मसंकीर्तन महोत्सवात आयोजित करण्यात आलेल्या धर्मसंकीर्तन महोत्सवात बेळगांव येथील ख्यातनाम गायक योगेश रामदास यांनी गायन सेवेतून आठवे पुष्प गुंफले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी देवस्थानच्यावतीने चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते गायक योगेश रामदास व सहकलाकारांचा श्री. स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ओंकार पाठक यांनी केले. या गायन सेवेत गायक



योगेश रामदास यांनी गायनाची सुरुवात शास्त्रीय बंदीश राग केदार आणि तराण्याने केली. त्यानंतर सुंदर भक्तीगीते स्वामी याहो....अमृताची फळे, हरी म्हणा कोणी, भाग्यदा लक्ष्मी बारम्मा, बाजे रे मुरलीया बाजे, राम रंगी रंगीले हो मन, दत्त दत्त नामाचा महिमा इत्यादी भावगीते अत्यंत लयबद्ध वाणीने गायले. शेवटी श्री स्वामी समर्थ महाराजांचा जयघोष करत भैरवीने कार्यक्रमाची सांगता करून या गायन सेवेने उपस्थित स्वामी भक्तांना मंत्रमुग्ध केले.

या गायन सेवेत त्यांना तितकीच सुंदर साथसंगत तबल्यावर अंगद देसाई, हार्मोनियमवर ओंकार पाठक, पखवाजवर ज्ञानेश्वर दुधाणे, टाळवर अक्षय सरदेशमुख, यांनी केले. यावेळी चेअरमन म हेश इंगळे, प्रथमेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, श्रीमुख जगदाळे, ओंकार पाठक, शिवशरण अचलेर, बाळासाहेब एकबोटे, अंकुश केत, शिवपुत्र हळगोदे, सुनिल कटारे, मनोज इंगुले, श्रीशैल गवंडी, धनराज स्वामी, दर्शन घाटगे, बंडोपंत घाटगे, आदीत्य गवंडी, मोहन जाधव, स्वामीनाथ लोणारी, प्रकाश कासेगांवकर, अभिषेक गवंडी, सागर गोंडाळ, ज्ञानेश्वर भोसले, अविनाश क्षीरसागर, चंद्रकांत गवंडी, गिरीश पवार, सचिन हन्नूरे, लखन सुरवसे, सिध्दार्थ थंब, विजयकुम र कडगंची, काशिनाथ इंडे, रविराज म हिंद्रकर, खाजप्पा झंपले, महेश मस्कले, संतोष पराणे, प्रसाद सोनार, संतोष जमगे, महादेव तेली यांच्यासह रविवार असल्याने राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले बहुसंख्य स्वामी भक्तांनी उपस्थित राहून या भक्ती संगीत स्वर श्रवणांचा आनंद लुटला.

> श्री स्वामींच्या चरणी आपली कला सादर करण्याची प्रत्येक कलाकारांची तीव्र इच्छा असते, आणि त्यांचा कृपाशीर्वाद मिळण्यासाठी सर्व कलाकार उत्सुक असतात. श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीच्या वतीने धर्मसंकीर्तन महोत्सवातून आमच्यासारख्या कलाकारांच्या कलेला वाव देण्याचे कार्य मंदीर समिती व चेअरमन महेश इंगळे यांच्या हातून घडत आहे ही बाब अत्यंत कौतुकास्पद आहे.
> **- योगेश रामदास,** शास्त्रीय गायक बेळगांव, कर्नाटक

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## शिवाजी पॉलिटेक्निकमध्ये पुस्तक दिन साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२३ एप्रिल-**

सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड, सचिव अंकुशराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक पुस्तक दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथदिंडीने झाली. महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.आर.ए. देशमुख होते. त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची आवड कशी जोपासावी आणि पुस्तके आपल्या जीवनात किती महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात यावर मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी पुस्तक प्रदर्शन, कथाकथन, वाचन स्पर्धा अशा विविध उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. पुस्तक प्रदर्शनात शैक्षणिक, तांत्रिक, सृजनात्मक आणि स्पर्धा परीक्षा साहित्य ठेवण्यात आले होते.

### महत्वाचे...



## जि. प. शाळांना उभारी देणे हे नागरिकांचे कर्तव्य : उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार

**अणदूर, दि. २३ एप्रिल-**

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा या देशाचे भावी कुशल उज्वल भविष्य, कार्यक्षम नागरिक निर्माण करण्याचे कारखाने आहेत. या शाळांना उभारी देण्याचं काम प्रत्येक नागरिकांचं कर्तव्य असून, या शाळा गावाला अभिमान आहेत, असे गौरवोद्गार उपसरंचपद डॉ. नागनाथ कुंभार यांनी काढले. ते येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत पुस्तक दिनानिमित्त शाळेत घेण्यात आलेल्या वर्षभरातील विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण, नवोदय निवडीतील विद्यार्थी, शिक्षक यांचा सत्कार कार्यक्रमात अध्यक्ष पदावरून बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोज मुळे, बाबुराव मुळे, सोमनाथ लंगडे, कोमल बिच्चे, दीपक जाधव, खंडप्पा व्हनाळे, सुनील चव्हाण उपस्थित होते. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वत्सलानगर अणदूर येथील नवोदय पात्र विद्यार्थी समर्थ निर्मळे, राम कदम, सृष्टी कांबळे, आदित्य गाढवे यांचा व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक शिवदास भागवत, शेखर गिरी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, तसेच सैनिक शाळेसाठी निवड झालेला विद्यार्थी सुहास राठोड याचाही सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे चावडी वाचन घेण्यात आले. सूत्रसंचालन सुरेखा क्षीरसागर यांनी तर आभार रेणुका डोंगरे यांनी मानले, कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राहुल घोडके, सुनीता माने, शोभा मिरजकर, मुख्याध्यापक गोविंद पवार यांनी परिश्रम घेतले.



## ग्रंथ वाचनामुळे निखळ आनंद मिळतो : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**अक्कलकोट, दि. २२ एप्रिल-**

ग्रंथ व साहित्याचे वाचन केल्यामुळे मनाची अभिरुची वाढवते. त्यातून निखळ आनंदाची प्रचिती येते म्हणून शिक्षक विद्यार्थी व सुजान नागरिकांनी ग्रंथाचे वाचन केले पाहिजे असे प्रतिपादक जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील वांग्मय मंडळाने आयोजित केलेल्या जागतिक ग्रंथ दिन निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी डॉ सुधांशू कोठाडिया, डॉ. विपुल शहा, रूपाली शहा, प्रा. डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस.आर. लोखंडे यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. शितल झिंगाडे यांनी केले. आभार प्रा. भीम सोनकांबळे यांनी मानले. कार्यक्रमास डॉ. बाळासाहेब पाटील, प्रा. राजेश पवार, प्रा. शिल्पा धूमशेट्टी, प्रा. मधुबाला लोणारी उपस्थित होते.

## सार्थक साळुंकेची आंबेगाव शाळेस अनोखी भेट

**वैराग, दि. २३ एप्रिल-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आंबेगांव येथील इयत्ता चौथीमध्ये शिकणारा विद्यार्थी सार्थक शरद साळुंके यांनी निरोप समारंभाच्यावेळी



आपली आठवण शाळेत रहावी म्हणून खाऊसाठी साठवलेल्या पैशातून त्यांनी एक हजार रुपये देऊन त्या पैशातून आंब्याच्या झाडाचे वृक्षारोपण जून महिन्यात करण्याचे ठरविले आहे, अशी त्यांनी अनोखी भेट शाळेस दिली आहे. या उपक्रमाबद्दल गावचे सरपंच सुशीलकुमार दळवे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. आनंद सुरवसे, मुख्याध्यापक नामदेव शेंडगे, श्रीमती गाडे आदींनी त्याचे अभिनंदन केले.

## बार्शीतील अमली पदार्थ प्रकरणी संशयित आरोपींची संख्या सहा

**बार्शी, दि.२३ एप्रिल-**

बार्शी-परंडा रस्त्यावर अमली पदार्थ विक्रीसाठी येत असल्याची माहिती समजताच पोलिसांनी सापळा रचून कारवर छापा टाकला. दोन लाख रुपयांचे मॅफेड्रान (एमडी), गावठी पिस्तूल, तीन जिवंत राऊंड, रोख आठ हजार रुपये, कार असा तेरा लाखांचा ऐवज जप्त केला. तिघांना अटकही केली होती. या प्रकरणात आणखी तिघांना अटक झाली आहे. न्यायालयाने त्यांना २२ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली होती. जमीर अन्सार पटेल (वय २८ रा. गाडेगाव रोड बार्शी), वसीम इसाक बेग (वय ३६), जावेद नवाबमुद्दीन मुजावर (वय ३६, दोघे रा. परंडा जि. धाराशिव) अशी पोलीस कोठडी मिळालेल्यांची नावे आहेत. यापूर्वी असद हसन देहलूज (वय ३७, रा. पल्ला गल्ली, परंडा जि. धाराशिव), मेहफूज महंमद शेख (वय १९ रा. बावची, ता. परंडा, जि. धाराशिव), सरफराज ऊर्फ गोल्डी अस्लम शेख (वय ३२, रा. काझी गल्ली, कसबा पेठ बार्शी) यांनाही २२ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी न्यायालयाने सुनावली होती. प्रकरणातील संशयित आरोपींची संख्या सहा झाली आहे. पोलिसांनी १७ एप्रिल रोजी बार्शी-परंडा रस्त्यावर पेट्रोलपंपाजवळ कारमधून आलेल्या तिघांना अटक केली होती. त्यांच्याकडून २०.४ ग्रॅम फिकट पिवळसर रंगाची पावडर असलेले मॅफेड्रॉन (एम. डी.) अंमली पदार्थाचे नऊ प्लास्टिक पाउच, गावठी पिस्तूल, तीन जिवंत राऊंड, आठ हजार रुपये रोख, तीन मोबाईल असा ऐवज जप्त केला होता. तपास पोलीस उपनिरीक्षक अभय माकणे करीत आहेत. तुळजापूर (जि. धाराशिव), लातूर येथे अंमली पदार्थाचा साठा सापडल्याने शहरातही अंमली पदार्थाची टोळी कार्यरत आहे का? या दृष्टीने तसेच टोळी-राज्यस्तरीय लागेबांधे आहेत का याचा तपास पोलीस यंत्रणेकडून सुरु आहे.

# यंदा आषाढी वारीवर असणार ड्रोनची नजर

## पालखी मार्गावरील गर्दीवर ठेवणार नियंत्रण; जिल्हा प्रशासनाचा निर्णय



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

आषाढी वारीमध्ये वारकऱ्यांची मोठी गर्दी होत असते. त्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा परिषदेकडून दहा ड्रोन भाडेतत्तवावर घेण्यात येणार आहेत. त्यामुळे आषाढी वारीतील दहा मानाच्या पालख्यांवर आता ड्रोनची नजर राहणार आहे. आषाढी वारीत विविध जिल्ह्यातून शेकडो पालख्या पंढरपूर येथे दाखल होत असतात. यातील प्रमुख दहा पालख्यांत वारकऱ्यांची मोठी गर्दी असते. या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आता ड्रोनचा वापर करण्यात येणार आहे. वारीसाठी आलेल्या वारकऱ्यांना जिल्हा परिषदेकडून देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची माहिती नसते. त्यामुळे एका विशिष्ट जागीच वारकरी मोठी गर्दी करतात. त्याची माहिती ड्रोनद्वारे घेऊन त्या ठिकाणची गर्दी कमी करता येणार आहे.

प्रमुख पालखी मार्गावर वारकऱ्यांची संख्या मोठी असते. ती गर्दी नियंत्रित आणण्यासाठी ड्रोनचा वापर करत असल्याने प्रमुख दहा पालखी मार्गावरील गर्दी कमी होणार आहे. त्यामुळे प्रशासनाचा भार हालका होणार आहे. अन्यथा एकाच ठिकाणी मोठी गर्दी झाल्यास चेंगराचेंगरी होण्याची शक्यता असते. आषाढी एकादशीसाठी दरवर्षी पंढरपुरात जवळपास १५ ते २० लाख भाविक दाखल होत असतात. आळंदी व देहू येथून मानाच्या पालख्या पंढरीकडे प्रस्थान करतात. मजल दरमजल करत ज्ञानोबा-तुकोबांचा गरज करत या पालख्या पंढरीच्या दिशेने येतात. संख्या मोठी असते. अनेक ठिकाणी म ुक्काम करत या पालख्या पंढरीत येतात. त्या पालख्यांमध्ये असलेल्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासन वेगवेगळ्या युक्त्या वापरत असते.

आता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी ड्रोनद्वारे गर्दीवर नियंत्रण ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी ते ड्रोन भाड्याने घेणार आहेत. वारकऱ्यांच्या सोयीसाठी जिल्हा परिषद प्रशासनाचा हा निर्णय सकारात्मक असल्याचे बोलले जात आहे.

### या पालख्यांवर असणार ड्रोनची नजर

संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत मुक्ताबाई, संत सोपानकाका महाराज, संत निवृत्तीनाथ महाराज, संत एकनाथ महाराज, संत गजानन महाराज, संत निळोबाराय महाराज, क्षेत्र कौडण्यपूर, संत योगीराज चांगावटेश्वर महाराज या दहा पालख्या मार्गावर ड्रोनद्वारे गर्दीवर नियंत्रण ठेवण्यात येणार आहे.

जुलै महिन्यात आषाढी वारी आहे. त्याआदीच विविध जिल्ह्यातून सोलापुरात मानाच्या पालख्या दाखल होतात. त्या पालख्यांतील वारकऱ्यांची गर्दी नियंत्रित ठेवण्यासाठी दहा ड्रोन भाडेतत्त्वावर घेण्यात येणार आहेत. त्या ड्रोनद्वारे पालखी मार्गावरील गर्दी नियंत्रित करण्यात येईल.

**- कुलदीप जंगम,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, सोलापूर**

## अंकोलीच्या श्री भैरवनाथाचा यात्रा महोत्सव उत्साहात



### भैरवनाथाच्या नावानं चांगभलंचा जयघोष

### अक्षदा सोहळा, कावडींसह पालखी, छबिना, शोभेचे दारूकाम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ एप्रिल -**

हजारो भक्तगणांचे कुलदैवत असलेल्या श्री क्षेत्र अंकोली भैरवनाथ यात्रा (ता. मोहोळ) उत्सव मोठ्या भक्तीमय व धार्मिक वातावरणा पार पडला. २० ते २३ एप्रिल या कालावधीत होणाऱ्या यात्रास उत्सवा देवाचा विवाह सोहळा, कावडींसह पालखी, छबिना व शोभेचे दारूकाम असे कार्यक्रम झाले असल्याचे मंदीर समितीच्यावतीने सांगण्यात आले.

श्री क्षेत्र अंकोली भैरवनाथ हे सोलापूरसह पश्चिम महाराष्ट्रातील हजारों भक्तगणांचे कुलदैवत आहे. दरवर्षी एप्रिल महिन्यात श्री भैरवनाथ यात्रा उत्सव साजरा करण्यात येतो. यंदाच्यावर्षी हा यात्रा उत्सव २० ते २३ एप्रिल या कालावधीत साजरा करण्यात आला. श्री क्षेत्र अंकोली भैरवनाथ यात्रेत २० एप्रिल रोजी रात्री १० पासून पहाटे ५ वाजेपर्यंत श्री जागर होऊन पहाटे ५ वाजता श्री भैरवनाथ व माता जोगेश्वरी यांचा विवाह सोहळ्यातील अक्षदा पार पडलय. त्यानंतर महाआरती झाली.

२१ एप्रिल रोजी सोमवारी गावकऱ्यांची अष्टमी दिवशी नाल बसवणे तसेच दुपारी ४ वाजता मानाच्या कावडींसह आरत्या निघाल्या. रात्री सवाद्य पालखी छबिना निघाला. २१, २२ आणि २३ एप्रिल या तिन्ही दिवशी पालखी छबिना निघाला. यावेळी यात्रेसाठी आलेल्या हजारो भक्तगाणांनी पालखीला खांदा देत कावडी नाचविल्या. बुधवारी २३ एप्रिल रोजी पालखी छबिना सोहळ्यात शोभेचे दारूकाम होऊन यात्रेचा समारोप झाला. या यात्रा उत्सवासाठी मंदीर समिती तसेच गावकऱ्यांकडून येणाऱ्या भक्तगणांच्या सोयी-सुविधांसाठी परिश्रम घेण्यात आले.



## जागतिक पातळीवर चमकले 'सुयश'चे विद्यार्थी

### बार्शीतील तीन जलतरणपटूंचा सागरी जलतरणात विक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. २३ एप्रिल-**

येथील सुयश विद्यालयातील रणवीर राहुल सातपुते, भार्गवी परीक्षित मुळे व शुभ्रा विरेश कडगंची या जलतरणपटूंनी दि. १० एप्रिल रोजी श्रीलंका ते भारत हे २८ किमीचे सागरी अंतर पोहून पूर्ण करीत एक विक्रम नोंदवला आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांसह सुयश विद्यालयाचे नाव जागतीक पातळीवर उज्वल केले.

दि.१० एप्रिल रोजी श्रीलंका ते भारत सागरी जलतरण २८ कि. मी. मॅरेथॉन इव्हेंट संपन्न झाला. यामध्ये सुयश विद्यालयातील जलतरणपटूंनी सहभाग नोंदवला. पहाटे ६ वाजून १० मी. श्रीलंका येथील तलाईम ुनारपासून पोहण्यास सुरूवात झाली. पहिल्यापासूनच समुद्र खवळलेला होता. पूर्ण स्विमिंग ही लाटांच्या उलट दिशेने करावी लागणार होती. सर्वसाधारणपणे ३-५ फूटांच्या काही ठिकाणी लाटा होत्या. श्रीलंका ते भारत हे अंतर तसं २८ किलोमीटर आहे. परंतु खवळलेला समुद्र पाहून श्रीलंका नेव्हीने रुट चेंज करण्यासाठी सांगितले. नंतर त्या रुटने स्विमिंग सुरु झाली. संध्याकाळी सहानंतर भारतीय नौदल त्या समूद्रात पोहण्यासाठी परवानगी देत नाहीत. तरीदेखील आठ वाजेपर्यंत स्विमिंग चालू ठेवली. शेवटी अर्चलमुनाई किनारा हा एक किलोमीटर अंतरावर राहिला होता. त्यातील ५०० मीटर अंतर हे चालतच यावं लागतं. सर्व प्रथम रणवीरने भारतीय किनाऱ्यावर पाय ठेवून हा इव्हेंट पूर्ण केला. त्या पाठोपाठ भार्गवी मुळे, शुभ्रा कडगंची यांनीही हा इव्हेंट पूर्ण केला. बदललेल्या रुटमुळे साधारण ३२-३३ किमी अंतर झाले. अशा प्रकारे अडथळ्यांचा सामना करत जलतरणपटुंनी श्रीलंका ते भारत समुद्री अंतर पोहून यशस्वीरीत्या पूर्ण केले. यशस्वी जलतरणपटूंचे सुयश विद्यालयाचे संस्थापक शिवदास नलवडे, मार्गदर्शिका प्रतिभा नलवडे, प्रसाद नलवडे, मुख्याध्यापक सागर मंडलिक, क्रीडाशिक्षक अतुल जाधव, मार्गदर्शक बाळराजे पिंगळे तसेच पत्रकार संतोष सूर्यवंशी यांनी कौतुक केले. कला, सांस्कृतिक व शारीरिक शिक्षण विभाग तसेच सुयश संकुलातर्फे अभिनंदन करण्यात आले.

## मार्डीच्या यमाई देवी यात्रेची छबिना मिरवणूकीने सांगता

### शक्तीपीठाच्या भेटीला आले वैराग्यपीठ

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि. २३ एप्रिल-**

श्रीक्षेत्र मार्डी येथील श्री यमाई देवीच्या यात्रेची मंगळवारी छबिण्याने सांगता झाली.

दरम्यान श्रीक्षेत्र मार्डीला शक्ती, भक्ती व वैराग्य पीठाचा वारसा लाभला असून श्री नागनाथ देवस्थानचे खर्गे नागेश स्वामी महाराज हे आवर्जून छबिण्याला उपस्थित राहिले त्यामुळे भाविकांना शक्ती व वैराग्य पीठाच्या भेटीचा सोहळा अनुभवता आला.

सोमवारी देवीचा पहिला छबिना तर मंगळवारी दुसरा छबिना काढण्यात आला. आद्यदेवीभक्त श्री रंगनाथ स्वामी मोकाशी यांचे विद्यमान वंशज बाळकृष्ण मोकाशी यांनी देवीची उत्सवमूर्ती व पादुका छबिन्यात ठेवल्या. ज्ञानेश्वर पाटील व गुरुदेव पाटील यांच्या हस्ते आरती करण्यात आली. प्रवीण भोई यांनी छबिण्याला खांदा दिला.श्रीराम गोंधळी,अजय गोंधळी यांनी संबळ वादन करुन देवीची गाणी म्हटली. प्रल्हाद मोकाशी,रेणुकादास मोकाशी, दत्तात्रय मोकाशी, दुर्गेश मोकाशी यांनी छबिण्यातील देवीच्या मूर्तीला वारे घातले. किरण सावळे, नवनाथ सावळे यांनी वंशपरंपरागत चालत आलेली दिवटीची सेवा केली.



उपसरपंच श्रीकांत मार्तंडे, तायप्पा शेंडगे, संजय इनामदार, देवस्थानचे मुख्य विश्वस्त रंगनाथ गुरव, दत्तात्रय गुरव, शिवाजी गुरव, पंकज गुरव, हनुमंत गुरव, विकास गुरव, निलेश गुरव यांच्यासह गावोगावचे आराधी, सोलापुरातील पद्मशाली समाजातील भाविकांसह जिल्ह्यातील देवीभक्त मोठ्या संख्येने छबिन्यात सहभागी झाले होते.

# झेंडा अन् टाळाच्या निनादात कालिका देवीची मिरवणूक

### पंढरपुरात सजीव देखाव्याने वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ एप्रिल-**

येथील कासार समाज व श्री कालिका देवी संस्थान यांच्या वतीने श्री कालिका देवीचा ६६ वा वर्धापनदिन २० व २१ एप्रिल रोजी साजरा करण्यात आला. या निमित्ताने श्रीस महापूजा व अभिषेक करुन श्रींची प्रदक्षिणा मार्गाने मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत महिलांचे नेत्रदीपक टाळ पथक व झेंडा पथक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

या उत्सवाच्या निमित्ताने २० एप्रिल रोजी माझे माहेर पंढरी- माहेरवाशीनींचा सन्मान हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या नंतर २१ एप्रिल रोजी श्री कालिका मातेचा उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी समाजाच्या वतीने दहावी, बारावी तसेच विशेष प्राविण्य मिळालेल्या गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास सोलापूर भाजपाचे शहर उपाध्यक्ष मोहन डांगरे,संस्थेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब होरणे व चेअरमन प्रताप शेठ अचलारे, समाजाचे अध्यक्ष विजय मोहोळकर, चेअरमन अभय भिवरे, सचिव शशिकांत वाडेकर, खजिनदार अमित मांगले, उपाध्यक्ष सुधीर सासवडे, राजेंद्र झरकर, प्रदीप येवनकर, मनोज होरणे, सोमनाथ होरणे, अविनाश जगधने,मिलिंद विभुते, मनोज भाळवणकर, भूषण मोहोळकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्टेज व माईक व्यवस्था शुभम वाडेकर, हर्षल तिवाटणे, समर्थ कोकीळ, ओंकार मांगले यांनी केली. सूत्रसंचालन प्रा.अमित डोंगरे यांनी केले. यावेळी सर्व कासार समाज बांधव तसेच समाजातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मिरवणुकीत सजीव देखावा देखील सादर करण्यात आला होता. या देखाव्यात अरूणा येवनकर (कालिकामाता), सोनाली केजकर (पांडुरंग) आणि जानवी विभुते आराध्ये व शुभ्रा कोकीळ यांनी (राही आणि रूक्मिणी मातेची) वेशभूषा केली होती.

टाळ पथकात अमृता भाळवणकर, सारिका भिवरे, अनघा भाळवणकर, पुजा डोंगरे, पुनम मांगले, अंजू सासवडे,दीपिका होरणे,वैभवी वेळापुरे पल्लवी कोकीळ प्रियंका भाळवणकर शारदा भाळवणकर सारिका भाळवणकर प्रिया होरणे,वर्षा अचलारे,सुचित्रा भाळवणकर, श्रध्दा वेळापुरे स्नेहल गाडे राधा मोहोळकर, राणी झरकर, सारीका झरकर,देवकी सासवडे,प्रियंका गाडे, स्नेहल रोकडे, दिपाली कांचनकोटी, चंदा होरणे,चंदा अचलारे, नंदीनी होरणे, शिल्पा मोहोळकर, पायल वाडेकर, सुविधा पालकर रेश्मा गाडे,सारिका पालकर,सारिका कासार मिरा होरणे, मीनाक्षी अचलारे,गीता डोळ आदी सहभागी झाले होते.